

IRBK-0120599

IRBK-0120599

मायाबाजार

– व. पु. काळे

कलासक्त शशी आणि उषास

कथानुक्रम

मायाबाजार
षंढ
झिंटू
श्रोता
किस्सा कुर्सी का
अधांतरी
मृदंग
हनीमून

वाचनालय
कथा
२०५९९
२११/०४

कथासंग्रह

# मायाबाजार

वसंत पुरुषोत्तम काळे

IRBK-0120599
IRBK-0120599

मेनका प्रकाशन प्रा. लि., पुणे ३०

मेनका प्रकाशन : ३३२

मायाबाजार । वसंत पुरुषोत्तम काळे

आवृत्ती पहिली : जानेवारी १९७७

आवृत्ती दुसरी : मे १९८४

© सौ. वसुंधरा काळे

११, झपूर्झा, साहित्य सहवास, वांद्रे ( पू. ) मुंबई ४११००[redacted]

प्रकाशक : पु. वि. बेहेरे

मेनका प्रकाशन प्रा. लि.

५६० नारायण, पुणे–४११०३०

मुद्रक : पु. वि. बेहेरे

मेनका मुद्रणालय,

५६० नारायण, पुणे–४११०३०

**मूल्य वीस रुपये**

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
२०५९६ ... २।९।८२
... १२८६

# मायाबाजार

अनेकांनी पाहिला त्याप्रमाणेच, कामावरून घरी येताना बोरकरांनीसुद्धा तो प्रचंड तंबू पाहिला आणि ते स्वतःशी पण मोठ्यांदा म्हणाले,

“ सर्क[illegible]ी वाटतं ! ”

[illegible]रिचित गृहस्थ म्हणाला,

[illegible] गंडा घालतील.”

“[illegible] वास्तविक सगळं तेच तेच असतं. सायकलवरच्या पोरी, [illegible]ा गोल...”

[illegible]सारखंच हो ! नवीन काही नाही. त्या त्या वयाला त्या त्या [illegible]त. आता तुम्ही आणि आम्ही राणीचा वाग पाहण्यात वेळ [illegible]आहे का ?”

[illegible] बस स्टॉप येईतो तो बडबडत राहिला. बोरकरांची करमणूक [illegible] आपण किती गोष्टी आपोआप सोडल्या ह्याचा आढावा [illegible]शीर होतं.

[illegible] अनेक वर्षांत खाल्ली नव्हती.

फुग्याची शिट्टी तीस वर्षांत वाजवली नव्हती.

चटक्यांच्या बिया घासून एकमेकांना चटके दिले नव्हते.
परिस्थतीनं दिलेलंच सहन करता करता पुरेवाट होत होती.
कॅलिडोस्कोपमधल्या बांगड्यांचे पॅटर्न्स पाहचले नव्हते.
कापसाच्या म्हातारीनं उडता उडता आपला 'बालपणीचा सुखाचा काळ' स्वत:बरोबर कधी नेला हे कळलंच नाही.
आता त्या ट्रिप्स नाहीत. दोन दोन मुलांच्या जोड्या करून चालणं नाही. विटीदांडू नाही. साबणाचे फुगे नाहीत.
दिवाळीतले किल्ले नाहीत.
त्या उडणाऱ्या म्हातारीनं हे सगळे आनंद नेले. त्याच्या बदली तिचं वार्धक्य तिनं आपल्याला दिलं.
म्हणून ती अजून उडू शकते.
आपण जमिनीवरच आहोत.

बोरकर घरी आले.
नेहमीच्याच संध्याकाळच्याप्रमाणे मावळणारी आणखी एक संध्याकाळ.
चहा पिता पिता स्वामिनी म्हणाली,
"कपबशा केव्हा आणताय् ?"
"ॲरिअर्स मिळाल्यावर."
"त्यात काय काय करणार आहात ?"
"जमेल तेवढं."
"दोन कपांचे टवके गेलेत्. एकाला बशी नाही."
"चलता है !"
बाहेरच्या खोलीत आल्यावर स्वामिनी म्हणाली, "किती दिवस सांगतेय हा फोनो विका."
"रजा घेऊन चौकात..."
"नेहमीचंच उत्तर."
"प्रश्न नेहमीचाच नव्हता का ? मान उडवली की प्रश्न उडत जात नाहीत. हजारदा सांगितलं, घरोघरी टेपरेकॉर्डर्स, स्टिरियोज, रेकॉर्डचेंजर्स, ट्रॅन्झिस्टर्स पडलेत. आता हा किल्लीचा फोनो कोण घेणार ?"

एखादा दैवी चमत्कार घडला तरच छोटे–मोठे सगळे प्रश्न सुटणार होते. दैवी चमत्कार आपल्या हयातीत घडणार नव्हता. माणसांच्या इच्छेवर–गरजांवर ते घडत नाहीत म्हणूनच ते दैवी.

मग काय काय व्हायला हवंय् ह्याच्या उच्चारानंच समाधान मानायचं. एकमेकांवर खापर फोडायचं. मग जरा हलकं वाटतं. आपल्या परिस्थितीला दुसरा कुणीतरी जबाबदार आहे हा विचारच समाधान मिळवून देतो.

तसलंच समाधान मिळवून बोरकर आणि स्वामिनी गप्प बसली, तेवढ्यात चिरंजीव धावत आले.

" दादा, मला माळ्यावरची स्कूटर काढून द्या."

" त्याला एकही चाक राह्यलेलं नाही, माहीत आहे ना ?"

" मी नवी स्कूटर आणणार आहे."

" नवी स्कूटर आणणार म्हणजे..."

" ती आमची एक गंमत आहे, तुम्ही फक्त स्कूटर काढून द्या."

स्वामिनी म्हणाली,

" थांब रे ! ते आताच कामावरून आलेत. त्यांना त्रास देऊ नकोस."

" अग पण, माझे सगळे मित्र निघाले तिकडे."

" तिकडे कुठे ?"

" ते आम्ही नंतर सांगू."

" माझ्याजवळ पैसा औषधालाही नाही."

" मी पैसे कुठं मागतोय् ?"

" मग नवी स्कूटर काय आभाळातून पडणार आहे ?"

" आभाळातून नाही, तंबूमधून."

" तू काय बडबडतोय्स ?"

मग [illegible] अगोदर काही सांगणार नव्हतो. आता सगळं सांगायला हवं."

" रनळ [illegible] चंच नाही कुठे."

जुन्या रेक [illegible] मायाबाजारात."

" आपण [illegible] णार ?"

बोरकरांनी [illegible]

—आलटून पालटून उलटतपासणी घेणाऱ्या आईवडिलांकडे पाहत चिरंजीव म्हणाले,
" नवीन मायाबाजार आलाय. तिथं जुनी वस्तू द्यायची आणि नवी वस्तू घ्यायची. मोठ्ठा तंबू बांधलाय. साड्या, कपडे, पुस्तकं, खेळणी, यंत्रं, सगळं मिळतं. फक्त बदलायला आपल्याजवळ जुनी वस्तू हवी, की झालं."
काहीशा नाईलाजानं बोरकरांनी चिरंजिवांना जुनी, गंजलेली स्कूटर माळ्यावरून काढून दिली. चिरंजीव पसार झाले.

आणि कमालीची धक्कादायक घटना म्हणजे तासा-दीड तासानं चिरंजीव नाचत आले ते नव्या स्कूटरसहित. नवी म्हणजे कोरीकरकरीत.'
कोऱ्या रंगाला जो एक प्रकारचा वास असतो त्या वासासहित.
स्वामिनी आणि बोरकर पाहतच राहुयले.
" एक पैसाही मागितला नाही ?"
" शप्पत नाही."
" काय काय घडलं ते सांग पाहू! "
चिरंजीव सांगायला लागले.
" मी, जंव्या, मुक्या, मुक्याचे वडील, चिंगटी, चिंगटीची मोठी बहीण... आम्ही सगळे निघालो. चिंगटीच्या बहिणीला कंडक्टर, जागा नाही म्हणून येऊनच देईना..."
" ते सांगत नको बसू. तिकडे काय घडलं ते सांग."
" तिकडे तर काहीच घडलं नाही. चिक्कार गर्दी होती. सगळी दुकानं भरलेली. आम्ही खेळण्यांच्या दुकानात गेलो. त्यानं विचारलं,
' काय हवंय ?'
मी सांगितलं, ' ही स्कूटर दुरुस्त करायची आहे.'
तो म्हणाला, ' बाळ, ही इथं ठेवून जा आणि नवी, हवी ती घेऊन जा. बाहेर पाटी नाही का वाचलीस ?'
—मी मुद्दाम ' नाही ' म्हणालो,
तो म्हणाला,
' जुने द्या, नवे घ्या, म्हणजेच मायाबाजार.'

तरी बोरकरांचा विश्वास बसेना.

" उद्या घरी पोस्टानं बिल पाठवतील."

" नावसुद्धा विचारलं नाही. बिल येईलच कसं ?"

बोरकरांनी दुसऱ्या दिवशी चक्क दांडी मारली. त्यांनी मायाबाजारला भेट द्यायचं ठरवलं. सुरुवातीला तिथं विषय कसा काढायचा आणि काय बदलून मागायचं हेच त्यांना कळेना. अर्थात् तो प्रश्न त्यांच्या स्वामिनीनं झटकन् सोडवला. दर गाणं संपलं की किल्ली द्यावी लागणारा आणि दोन गाणी संपल्यावर पिन् बदलायला लावणारा. वडिलोपार्जित, सासऱ्याचा फोनो तिला खुपतच होता. तिनं पटकन् त्याच्याकडे बोट केलं.

बोरकर अर्ध्या तासात घरी आले.

ते हात हलवत आलेले पाहताच त्यांच्या स्वामिनीनं विचारलं,

" हे काय ? फोनोचं काय केलंत ?"

" देऊन आलो."

" त्याच्या बदली काही आणलं नाहीत ?"

" हातगाडीवरून रेडिओग्रॅम येतोय्."

" काय सांगता काय ?"

" पाहशीलच."

अर्ध्या तासात खरोखरच हातगाडीवरून कोरा–करकरीत, लॅकरपॉलिशचा रेडिओग्रॅम घरात येऊन धडकला.

" रेकॉर्डस् ?"

" पहिल्या कुठं नेल्या होत्या ?"

मग बोरकरांच्या स्वामिनीनं भराभरा जुन्या रेकॉर्डस् काढल्या.

" रमला कुठे ग कान्हा, आता कोण ऐकणार ?"

जुन्या रेकॉर्डस्चं खोकं बोरकरांसमोर ठेवताच बोरकर म्हणाले,

" आपण दोघं जाऊ आणि काय ते एका खेपेतच बदलून आणू."

बोरकरांनी एवढं सांगायची खोटी, त्यांची स्वामिनी आयुष्यात पहिल्यांदा

जातीनिशी माळ्यावर चढली. 'माळ्यावर चढ' सांगितल्यावर इतर माणसं टाळाटाळ का करतात हे त्या माऊलीला आज प्रथम समजत होतं. पुन्हा असली कामं इतरांना सांगताना, आपण जिभेवर साखर ठेवून बोलायला हवं ह्याची तिला कल्पना येऊन, तिनं तसा निश्चयही केला. त्याच वेळी आता आपल्याला आपली स्वामिनी, " त्यात काय ? त्या दिवशी मीसुद्धा माळ्यावर चढले होते ' असं म्हणून, केव्हाही माळ्यावरची वस्तू मागेल—अशी बोरकरांना धास्ती वाटत होती. बोरकरांच्या स्वामिनीनं अर्धाअधिक माळा रिकामा केला. 'केव्हा तरी लागेल' असं म्हणत म्हणत आपण काय काय गोळा करून ठेवतो त्याचा त्या दोघांना हिशोब लागत होता.

" तुम्ही सांगितल्याबरोबर फेकून दिलं!"—असं म्हणून, माळ्यावरच आपल्या स्वामिनीनं काय काय साठवलंय हेही माळ्याखाली उभं राहून एकेक वस्तू खाली घेणाऱ्या बोरकरांना कळत होतं. त्यांना आता माळ्याखालून हलता येणार नव्हतं. ते तिथं गहाण पडले होते. मान आणि हात वर करून करून थकले होते. खरोखरच अपुरी उंची असलेल्या माळ्यावर, उकीडवं बसून वस्तू खाली फेकणं सोपं, की माळ्याखाली उभं राहून, 'दे दान सुटे गिराण' टाईप वर हात करून, अवघडून घेणं सोपं, हा पी. एचडी. ला संशोधनाला विषय द्यावा.

" तू काय काय जमवतेस ग ? ह्यातल्या निम्म्या वस्तू मी तुला फेकून द्यायला सांगितल्या होत्या."

" आता उपयोगी पडताहेत ना ? माझं कधी चुकत नसतं." स्वामिनीनं आकाशवाणी केली आणि माळ्यावरचा खकाणा घशात गेल्यानं ती दोनदा शिंकली.

अर्ध्या-पाऊण तासानं, न पडता, बोरकरांच्या स्वामिनीनं पृथ्वीतलावर अवतार घेतला. दोन पत्र्याच्या ट्रंका, एक कातडी सूटकेस, होल्डॉलचे नुसतेच चामड्याचे पट्टे, त्यातही मधलं हँडल हरवलेलं, एक थर्मास, प्लॅस्टिकच्या बादलीची नुसतीच अर्धगोल कडी, घरात डायनिंग टेबल आल्यावर, वर टाकलेले चार पाट, देवांचं उच्चाटन केल्यावर पाटामागोमाग वर गेलेला चौरंग, मोडका देव्हारा, कोणत्या तरी दिवाळीत आणलेलं इलेक्ट्रिकचं

तोरण, समया, प्रेशर कुकर आल्यानं निकामी झालेलं मोदकपात्र आणि गॅस आल्यावर रिटायर्ड झालेला, त्या काळातला एकमेव चांगला प्रायमस स्टो.
माळ्यावर काय काय मिळावं ?
मागची पिढी कशी जगत होती ह्याचं सामाजिक, सांस्कृतिक दर्शन, फक्त माळा साफ केल्यानं बोरकरांना झालं.

तास-दीड तासानं बोरकर, मेहूण बोलवावं त्याप्रमाणे हातगाडीवर रचता येईल तेवढं सामान रचून बाहेर पडले. माळ्यावरच्या सामानात घरातल्या सामानाची भर पडली. त्यांचं नशिब आज इतकं मार्गी होतं की, कोणतं तरी एक जुनं बिल वसूल करायला, इलेक्ट्रिशियन त्याच वेळेला आला. त्याच्याकडून बोरकरांच्या स्वामिनीनं गीझर, सिलिंग फॅन्स, सगळं काढून घेतलं आणि झालेल्या रकमेपेक्षा पाच रुपये जास्त दिले. त्या औदार्यानं डोळ्यांसमोर आलेली अंधेरी सावरत सावरत इलेक्ट्रिशियन निघून गेला. नवीन पंखे आणि गीझर बसवून देण्यासाठी त्यानं लगेच येण्याचं कबूल केलं.

एकूण एक कोऱ्या वस्तू घरी येऊन पडल्या. वेष्टनांसकट. प्लॅस्टिकच्या–कार्डबोर्डच्या–थर्मोकोलच्या वेष्टनांनीच एक खोली भरून गेली. रिकाम्या झालेल्या माळ्यावर त्या सगळ्या वेष्टनांना प्रमोशन मिळालं.
इलेक्ट्रिशियन कबूल केल्याप्रमाणे आला. त्यानं गीझरपासून सगळी फिटींग्स बसवली.
सिलिंग फॅनपासून जमिनीवरच्या गालिच्यापर्यंत सगळं घर कोरं झालं.
हिंदी चित्रपटातला जायदादवाला आणि बोरकर ह्यांची घरं सारखीच दिसायला लागली.

बोरकरांच्या स्वामिनीनं रेडिओग्रॅम लावला.
सगळी नवीन गाणी.
ताजे आवाज.
सायगलऐवजी रफी, पंकज मलिकच्या ठिकाणी मुकेश, सी. एच. आत्मा-ऐवजी महेंद्र कपूर, ज्युथिका रे ऐवजी आशा आणि नूरजहानऐवजी लता.

आणखीन काय हवं ? भिंती आणि माणसं सोडल्यास सबकुछ नवं. तीन-चार गाणी ऐकल्यावर बोरकरांना काय करावं कळेना. तोच त्यांच्या स्वामिनीनं नव्या ट्रेमधे नवे कप, नव्या बशीतून खायला आणलं. त्याचाही समाचार घेऊन झाला. तरी काय करावं कळेना.

जुन्या घराचा कंटाळा आला होता.
नव्या घराचा का कुणास ठाऊक ' थकवा ' आला. रात्री खूप वेळ झोप येईना. मधेच डोळा लागला आणि बोरकर दचकून जागे झाले ते एका भयानक स्वप्नानं. मायाबाजारानं एकूण एक सामानाचं एकवीस हजारांचं बिल पाठवलं होतं. बोरकर उठून बसले. नव्या कोऱ्या फॅनखाली कॉट असूनही ते घामानं थबथबले होते.
सगळी रात्र ह्याच मनस्तापात गेली.
त्यांची स्वामिनी मात्र गाढ झोपली होती.

बोरकर दुसऱ्या दिवशी कामावर गेले नाहीत. डनलॉप गादीची सवय नसल्यामुळे त्यांच्या स्वामिनीचं रात्रभर झोपूनही अंग दुखत होतं. ऐषआराम पचवायलाही ताकद लागते हा शोध लागलेला पाहून बोरकरांना हसायला आलं. दिवसभर बोरकर घरीच होते तरी बेचैन होते. आपल्याला ही बेचैनी का आली आहे ह्याचा त्यांना पत्ता लागत नव्हता. घरामध्ये जिथं नजर जाईल तिथं तिथं मायाबाजारमधली कोणती ना कोणती तरी वस्तू होतीच. त्या सगळ्या वस्तू परक्या वाटत होत्या. ' जशाच्या तशा परत करीन ' ह्या वचनावर, कुणाकडून तरी त्या वस्तू उसन्या आणल्या आहेत असंच त्यांना वाटत होतं.
तेवढ्यात त्यांची स्वामिनी म्हणाली,
"एखादी रेकॉर्ड लावा ना !"
"तू लाव, आपल्याला ते तंत्र जमायचं नाही."
मानेला हिसका देत स्वामिनीनं रेकॉर्ड लावली. ती रेकॉर्ड संपताच दुसरी आपोआप, थप्पड मारावी तशी पडली. ती संपल्यावर तिसरी अडकून राहुचली मग पुन्हा दुसरीच वाजू लागली. हातातलं काम टाकून स्वामिनी

धावली. तिनं ते सगळं प्रकरण ठाकठीक केलं. संध्याकाळी चिरंजिवांचे एक–दोन मित्र आले. ते बुटासकट गालिच्यावरून चालत गेल्यावर बोरकरांच्या स्वामिनीचा जीव खालीवर झाला. पूर्वीच्या सतरंजीवर कुणी नाचलं तरी काही वाटत नव्हतं.

ह्या ना त्या स्वरूपाच्या चिंतेत बोरकरांचा दुसरा दिवस संपला. त्यांची स्वामिनी मात्र मजेत होती. तिचा पुष्कळसा वेळ मायाबाजारातून बदलून आणलेल्या साड्यांच्या तैनातीतच गेला. एका जुन्या, न बदललेल्या साडीला प्रत्येक नवी साडी लावून ती संपूर्ण सहा वार आहे की नाही हेच तिचं पाहणं चाललं होतं आणि एकीकडे बदलून आणण्यासाठी मुळातच आपल्याकडे आणखीन काय काय असायला हवं होतं ह्याची यादी ती बोरकरांना ऐकवीत होती. हिला अजून एवढा लोभ कसा ?...ह्या प्रश्नानं बोरकर आणखीन हैराण झाले होते. संध्याकाळी–संध्याकाळी मात्र मनावर आलेलं समृद्धीचं दडपण कमी झालं. कॉलनीमधली सगळीच माणसं धावून धावून नवं सामान आणीत होती. ऐपतीप्रमाणे घरोघरी नव्या नव्या वस्तू येत होत्या. सणासुदीला, दिवाळीला जो जल्लोष हल्ली अनेक दिवसांत दिसला नव्हता, तो जल्लोष आज सर्वत्र दिसत होता.
बोरकर हळूहळू त्या भुलभुलैयात रमू लागले.

रात्री डनलॉपचा नवा डबलबेड, डनलॉपच्या उशा, नव्या चादरी आणि नव्या शाली, मंद प्रकाशाची बरसात करणारा नवा लाईटलँप आणि उशाशी नवा टेबलफॅन, ह्या सगळ्या पार्श्वभूमीवर बोरकरांच्या चित्तवृत्ती बहरून आल्या. नव्या स्कूटरवर दिवसभर नाचून नाचून चिरंजीव लवकर झोपले होते. त्यामुळे ‘ नाही आनंदा तोटा ’ अशी परिस्थिती होती.
डबलबेडवर झोपायची ही पहिलीच वेळ. स्वामिनी शेजारी येताच बोरकरांनी तिच्या गळ्यात हात टाकला. त्याबरोबर ती म्हणाली,
“आज अंगाला हात लावू नका. दिवसभर माझा पिट्टचा पडलाय. ह्या नव्या गादीची सवय नाही. अंग धरलंय.”
रात्र रंगायला, अंगाखाली पलंग आहे की जमीन आहे ह्याला महत्त्व नसून,

शेजारी कोण आहे ह्यालाच महत्त्व असतं. हा आणखी एक लागलेला शोध. पण रात्री साडेदहानंतर, 'एक नवा शोध तर लागला' ह्याचा आनंद मानायला बोरकर काय संशोधक–शास्त्रज्ञ होते काय ? अशा आणीबाणीच्या प्रसंगी हुकमी झोप कशी लागेल ह्याचा शोध लावणं आवश्यक होतं.

दोन दिवसांच्या गैरहजेरीनंतर बोरकर कामावर आले तेव्हा, त्यांच्याप्रमाणेच, प्रत्येकाच्या अंगावर नवा कपडा, नवे बूट, हातात नव्या बॅगा होत्या. सगळेजण खुषीत होते.

एकटा नेरूरकर एका कोपऱ्यात चिंताग्रस्त मनःस्थितीत बसला होता.

बोरकर त्याच्यासमोर जाऊन बसला.

"तब्येत बरी नाही का रे ?"

"झकास आहे."

"मग असा किंकर्तव्यमूढ होऊन का बसला आहेस ?"

"बोरकर, तुझं त्या मायाबाजाराबद्दल काय मत आहे ?"

"ते सांगता येणं कठीण आहे. मी तिथून जमेल तेवढं सगळं घेऊन आलो. का, तुला काय वाटतं ?"

"मला वाटतं, सरकारनं तातडीनं तो मायाबाजार बंद करावा."

"का ?"

"सगळ्या जनतेची मनं शांत ठेवायची असतील तर."

"माझ्या लक्षात आलं नाही."

नेरूरकर आपला मुद्दा पटवायचा ह्या आवेशानं म्हणाला,

"तुझ्याच काय अनेकांच्या लक्षात मला काय म्हणायचं ते येणार नाही. आणि ज्यांच्या लक्षात येईल ते कदाचित् माझ्याशी सहमत होणार नाहीत."

"मला सांग ना काय ते !"

"हा मायाबाजार तुम्हा आम्हाला एका न संपणाऱ्या दुःखाकडे नेतोय्."

"तेच सांग."

नेरूरकर अंतर्मुख होत म्हणाला,

"दोन दिवस धावून धावून मी सगळ्या वस्तू घेऊन तिथं गेलो आणि यच्चयावत् एकूण एक नव्या वस्तूंनी घर भरून टाकलं. माझ्या काही काही जुन्या सवयी

मला इथं वरदान ठरल्या. चोरबाजारात चकरा मारून, स्वस्तात जेवढ्या वस्तू घेता येतील तेवढ्या घेऊन ठेवायचा छंद. त्यापायी नातेवाईक, मित्र ह्यांच्या कायम चेष्टेचा विषय मी आणि मुलं–बायको ह्यांच्या टीकेचा. पण मायाबाजार ही मला पर्वणी ठरली. घरात फ्रीजपासून सगळ्या नव्या सुख-सोयींची बरसात झाली. आज ऑफिसला मी एका फटक्यात चालू होणाऱ्या करकरीत मोटारसायकलवरून आलोय. सगळ्यांच्या अगोदर इथं पोहोच-लोय् आणि चिंतन करत बसलोय."

नेरूरकरचं निवेदन चालू झाल्यावर बोरकरही गंभीर झाला. नेरूरकर पुढे म्हणाला,

"माझ्या आयुष्याची आता मला भीती वाटते."

"का ?"

"सुखसोयींनी खच्चून भरलेल्या माझ्या फ्लॅटमधून काल फिरत असताना मला उदास वाटायला लागलं. त्याचं कारण शोधायला लागल्यावर मला कळलं की आपला आनंद ह्या चार बाजारी वस्तूंवर मुळीच अवलंबून नव्हता. काही गोष्टींचा लाभ झाला तर आपल्यासारखे भाग्यवान् आपणच ह्या समजुतीला काल जबरदस्त सुरुंग लागला. कर्ज काढायचं, हवी ती वस्तू खरेदी करायची, हप्ते भरून कर्ज फेडायचं, मग दुसऱ्या वस्तूंसाठी पुन्हा कर्ज काढायचं ह्या पळापळीत आयुष्य फार मजेदार झालं होतं. जगण्यात आनंद होता. तो कर्ज फेडायच्या जबाबदारीचा होता. कर्ज काढणं म्हणजे स्वतःच्या हिंमतीवरचा विश्वास प्रकट करणं. रक्ताचा घाम करून संसार उभा करणं ह्यात जो गर्व आहे त्याचाही एक डौल असतो.

"आयुष्य कसं सपतं हे कळतही नव्हतं. वार्धक्य जवळ येत आहे ह्याची जाणीव नव्हती. हे सगळं काल संपलं. मिळवायचं होतं ते एका रात्रीत समोर आलं. कष्ट न करता आलं. सगळी गंमतच गेली त्या क्षणी. एकदम आठ वर्षांचा कृष्ण समोर उभा राहिला तेव्हा यशोदा म्हणाली होती, "तू लहान हो. एकदम तान्हा हो. तुझ्यासाठी मला खस्ता काढू देत, जागरणं होऊ देत. तू रड, तुला लागू दे, आणि खूप त्रास देत देत तू मोठा हो.' यशोदाच्या ह्या मागणीचा अर्थ काल समजला. बोरकर, Just imagine वयाच्या चाळी-साव्या वर्षीच, इथल्या एकाही गोष्टीवर आपला आनंद अवलंबून नव्हता हे

कळलं तर उरलेलं आयुष्य कसं संपवायचं ? आता कशामागं धावायचं ?"

बोरकर विचार करीत स्वतःच्या जाग्यावर आला. स्वतःच्या उदासीनतेचं कारण त्याला अकस्मात् सापडलं आणि तो जास्तच उदास झाला.
तोच पाठीवर सणसणून थाप बसली.
"वा, झकास ! ए वन् चॉईस !"
बोरकरनं पाहूयलं तर सदाबहार, हसतमुख ताम्हाणे. ह्या गृहस्थाला कधी रागावलेलं जसं कुणी पाहूयलेलं नव्हतं, तसंच कधी ऑफिसचं काम प्रत्यक्षपणे करतानाही पाहूयलेलं नव्हतं.
'हसण्यासाठी जन्म आपुला' ह्या ओळीतलं मर्म समजलेला ताम्हाणे. त्याचं सगळं आयुष्य त्यालाच पडलेल्या प्रचंड टकलासारखं, smooth होतं.
"ए वन् चॉईस !" ताम्हाणेनं पुन्हा त्याच शब्दात प्रशस्तीपत्रक दिलं.
"कशाबद्दल ?"
"नवीन कपड्यांबद्दल."
"त्यात काय बाबा ? मायाबाजारची कृपा."
"अरे, मायाबाजार तर मायाबाजार ! आनंद लुटायचा कसा हेही समजायला हवं."
ताम्हाणेच्या आवेशाकडे बोरकर पाहत राहूयले.
"बघताय् काय बोरकर ? अरे life is for living असं नसुन life is for living happily असं आहे. कितीही किंमत मोजावी पण हसत जगावं. पर्वा करू नये. "आत्मानं सततं रक्षेत् !' काय? —स्वतःचं रक्षण करावं, पण कशापासून ? —परचक्रापासून —no ! राजा, no ! युद्ध वारंवार होत नाहीत आणि झालीच तर मिलीटरी आहे. भारतानं अणुबॉम्ब पण बनवला आहे. आपण सिव्हिलीयन. आपला बुद्धिभेद करणारी माणसं सतत भोवती हिंडत असतात, त्यांच्यापासून स्वतःचं रक्षण केलं पाहूयजे. जाना देव ! मायाबाजारातून काय काय आणलं ?"
कळत न कळत बोरकर उत्तेजित झाले... त्यांनी सगळ्या वस्तूंची यादी वाचली. ताम्हाणे म्हणाला.
"बस् ? इतकंच ?"

" आणखीन काय आणणार ?–वस्तू बदलायची म्हणजे जुनी मूळात हवी ना?"

"दोस्त, तिथून काय बदलून आणायचं हेच कळायला हवं. अरे बाबा, गालिच्यासारख्या वस्तू, फर्निचर, दागिने, कपडालत्ता, उसमे क्या है ?–आयुष्य काय वस्तूंवर अवलंबून असतं काय ? What is required is a good company. "

" ताम्हन्या, काय म्हणतोस काय ?"

ताम्हाणेनं न बोलता खिशातून एक पाकीट काढलं. त्यातला फोटो त्यानं बोरकरांसमोर धरला.

" अरे, वहिनींच्यात एवढा बदल कसा काय झाला ?"

ताम्हाणे डोळे मिचकावीत म्हणाला,

" वहिनींच्यात काहीही बदल नाही. तिच्यात बदल होण्याची इतके दिवस वाट पाहयली. बदल होत नाही म्हटल्यावर तिलाच बदलली. "

" काय सांगतोस काय ?"

" मग ? मायाबाजारसारखी संधी चालून आल्यावर कपडे बदलायचे काय ? ते फाटल्यावर आपण झक् मारीत नवे शिवतोच. जाऊ दे, विचार करू नकोस किंवा अवश्य कर. "

ताम्हाणे उठून जायला लागला. बोरकरांनी त्याला अडवलं.

" एक मिनिट थांब. तू मायाबाजारच्या मॅनेजरला काय सांगितलंस ?"

" चक्क बोललो, बायको बदलायची इच्छा आहे. त्यांनी बायकोसहित बोलावलं. गेलो. तिला पातळाच्या दुकानात सोडलं. गुंगारा दिला. मॅनेजरकडे आलो. त्यांनी अप्सरा महालात नेलं. डोळे फाटून जातील अशा बायका. कोणती निवडायची कळत नाही. सगळ्या तुमच्यावर खूष. खूण करायची खोटी. व्हरायटी किती म्हणून सांगू ?– शंभर पौंडांपासून, दीडशे–दोनशे पौंडापर्यंत चार फूट उंचीपासून सहा फूट तीन इंच उंचीपर्यंतच्या शंभर बायका. काळ्या, गुलाबी, गोऱ्या, निमगोऱ्या, कांती, चाफ्यासारखी कांती. छे छे ! भय्या, आपण रोज एक बाई बदलणार. आपण म्हणू ती आपल्यावर खूष रे ! आणखीन काय हवं ? मी एवढा टक्कलवाला, तरी त्या खूष ! तू जा. थोडे का होईनात, तुला केस आहेत. जा. "

ताम्हाणेनं भलतेच विचार डोक्यात भरजून दिले. बोरकरांची अवस्था आणखीन बिकट झाली पण ताम्हाणेच्या बोलण्यानं, नेरूरकरांशी झालेल्या गप्पांमुळे जो ताण वाढला होता, तो खूप सैल झाला. जगायला, आणि त्याहीपेक्षा आनंदानं जगायला शिकलंच पाहिजे.

संध्याकाळी बोरकर आले ते काहीशा भडकलेल्या मन:स्थितीतच.

त्यांची स्वामिनी पलंगावर लोळत होती. आज तिच्या पाठीत उसण भरली होती. बोरकरांच्या स्वामिनीला नेहमी काही ना काही होत असे. समाधान इतकंच होतं, की एकदा झालेली गोष्ट दुसऱ्यांदा कधी झाली नाही. डॉक्टरी व्यवसायातल्या सगळ्या स्पेशॅलिस्टना तिनं एकेकदा संधी दिली होती. डॉक्टरी व्यवसाय पत्करला असता तर शरीरविज्ञान जितकं समजलं असतं, त्यापेक्षा जास्तच माहिती एकट्या स्वामिनीनं दिली. आज आता उसण. साहजिकच उसण म्हटल्यावर पाठीला बेलॅडोना प्लॅस्टर आणि शेकायची पिशवी. त्या 'तसल्या' सोहळ्याच्या वेळी बेलॅडोना प्लॅस्टरची पाठ कुणाला रुचेल? चिरंजीव आठ दिवसांसाठी आजोळी गेले होते, पण त्याचाही उपयोग नव्हता.

रात्रभर बोरकर पुन्हा जागे.

पण ते नुसते जागे नव्हते. त्यांना खऱ्या अर्थानं जाग आली होती. डोळ्यांसमोर फक्त अप्सरा महाल दिसत होता.

ह्या नव्यानं सजवलेल्या घरात स्वामिनीही नवी हवी.

हे धाडस करायलाच हवं. चिरंजीव परत यायच्या आत.

नवं प्रकरण नाही झेपलं तर आणू हिला परत.

ताम्हाणेकडून दुसऱ्या दिवशी बोरकरांनी सगळ्या 'टिप्स' घेतल्या सगळ्या प्रसंगाची मनातल्या मनात तालीम केली. आणि संध्याकाळी घरी आल्याबरोबर त्यांनी स्वामिनीला तयार व्हायला सांगितलं. नवीन साड्यांचा स्टॉक मायाबाजारात आल्याचं शुभवर्तमान कानावर घातलं. त्यांची स्वामिनी पटकन् तयार झाली.

साड्यांच्या दुकानात स्वामिनीला गुंगारा देताना, बोरकरांनी स्वामिनीला

एकदा पाहून घेतलं आणि स्वतःचा विचार बदलायच्या आत त्यांनी मॅनेजरकडे धाव ठोकली.

अप्सरा महालात त्यांनी पाय ठेवला. पण त्यांना काहीच सुचेना.
कुरूक्षेत्रावर प्रथम आपलेच आप्त आणि नंतर विश्वदर्शन पाहून अर्जुनाचं जे झालं तेच बोरकरांचं झालं. ह्यातली कोणती निवडायची ?
कोणतीही निवडली तरी ती स्वामिनीपेक्षा नवीन, ही किमान जमेची बाजू होती. तरी कोणती ?
शेवटी दीड तास निरीक्षण करून झाल्यावर डोळे, जिवणी, वर्ण, केसांचं वळण, बांधा, ठेवण आणि मुख्य म्हणजे जमेल अशी उंची एवढ्या गोष्टी. ती लगेच जवळ आली.

शृंगार, प्रियाराधन, कामचेष्टा ह्याबाबत बोरकरांच्या ज्या काही कल्पना होत्या, आणि ज्या गोष्टी स्वामिनीनं कधीही मनसोक्त करून दिल्या नव्हत्या त्या सगळ्यांचा वचपा बोरकरांनी तीन दिवसांत काढला.
आयुष्याला नवा मोहर फुटला.
नेरूरकरची बोरकरांना हजारदा कीव आली.
कल्पनाशक्ती तरल असली आणि धडाडी असली म्हणजे आयुष्य चाळीशीला थांबत नाही.
सुखं कधी संपत नाहीत. ती नित्य नवी उगवतात. सुकलेल्या फुलांना टाकण्याचं फक्त धैर्य आपल्याजवळ हवं.
नव्या सुखांना जागा करून दिली की ती न बोलावता येतात.
ह्या नव्या सुखात बोरकर सचैल न्हाऊन निघाले.

आणि अशाच नाजूक प्रसंगी, तिसऱ्याच दिवशी दारावरची बेल वाजली.
"कोण आहे एवढ्या अपरात्री ?"—बोरकर पुटपुटले.
"अपरात्र नाही. सकाळचे दहा वाजलेत." अप्सरा कानात पुटपुटली.
आपल्या मोकळ्या सोडलेल्या केसांनी तिनं बोरकरांना गुदगुल्या केल्या.

बोरकर उठले.
त्यांनी दार उघडलं.
पोस्टमननं पत्र दिलं.
बोरकरांनी पत्र फोडलं.
पत्र त्यांच्या स्वामिनीचं होतं.

श्री. बोरकर ह्यांना—
स. न. वि. वि.
पातळांच्या दुकानात मला सोडून आपण गुंगारा दिलात. तुम्हाला वाटलं, माझं लक्ष नाही. पण मी बारकाईनं बघत होते. मी तुम्हाला मुद्दाम अडवलं नाही. कारण तुमच्याबरोबर मला मुळीच यायचं नव्हतं. मायाबाजार निघाला त्याच दिवशी नवरा बदलण्याचा विचार मनात आला होता. केव्हातरी पोट न सुटलेला, टक्कल न पडलेला, न चिडणारा, बायकोच्या प्रकृतीविषयी आस्था असलेला नवरा मिळावा अशी फार इच्छा होती. मी आपण होऊन, तरीही तुम्हाला सोडलं नसतं. तुम्हीच पुढाकार घेतल्यानं माझं काम सोपं झालं.
मी ह्या क्षणी फार सुखात आहे.
मायाबाजाराच्या जिवावर मोठेपणा मिरवण्याची ज्याला मुळीच गरज नाही असा मूळचाच बड्या बापाचा बडा मुलगा मला मिळालेला आहे. त्याच्या तीन गाड्या आहेत. मुख्य म्हणजे तो वयानं माझ्यापेक्षा लहान आहे. पण माझ्यासाठी पागल झाला आहे.
हे पत्र मी ओबेराय शेरेटनमधून लिहीत आहे. दोन दिवसांनी काश्मीरला जाणार आहे. तेव्हा शोध घेऊ नका. मी फार मजेत आहे. तुम्ही पण एन्जॉय करा.
आपली
स्वामिनी शहा.
ता. क. उपेन्द्र मला स्वामिनीच मानतो.

बोरकरांच्या हातून पत्र गळून पडलं. त्यांचा चेहरा उतरला.

सजवलेली खोली खायला उठली.

आपलाही कुणाला कंटाळा येऊ शकतो ह्याची जाणीव फार भयप्रद होती. इंगळीचं विष जसं हळूहळू भिनतं तसं स्वामिनीच्या पत्रातलं वाक्य न् वाक्य भिनायला लागलं. अप्सरेनं बोरकरांची अवस्था पाह्यली. ती जवळ आली. तिनं त्यांना मिठी मारली. चुंबनासाठी ओठ पुढे केले.

पण आता परक्या बाईच्या मिठीतली किक् गेली.

आणि चुंबनातलं 'थ्रिल' ही नाहीसं झालं.

ते थंड पडले होते.

सगळे वार परतवता येतात. पण, अहंकारावर झालेला वार परतवता येत नाही.

आणि पचवताही येत नाही.

बोरकर पुतळ्यासारखे उभे होते.

अप्सरा पाहत राह्यली होती.

□

# षंढ

नीळकंठच्या मिठीतून स्वतःची सुटका करून घेत मंदोदरी दूर झाली.
नीळकंठ पुढं झाला. थोडं आक्रमक होण्याची हीच वेळ आहे ह्या जाणीवेनं त्यानं पुन्हा मंदोदरीला जवळ ओढलं. सुखाचा तो वर्षाव पेलवत नव्हता आणि सोडवतही नव्हता. हा क्षण तर कधीच उगवायला हवा होता आणि तरीही खोलवर कुठं तरी एक भयनगरी पाय पसरून बसलेली होती.
तो वर्षाव पुन्हा एकवार परतवून लावीत, स्वतःचंच मन मारीत मंदोदरी म्हणाली,
" नीळकंठ, आपण इथंच थांबायला हवं."
" भिऊ नकोस. ही मर्यादा ओलांडून पुढे जाण्याचं धाडस माझ्याही अंगात नाही."
दोघं शांत झाली.
एकमेकांच्या आयुष्यात येणं न येणं त्यांच्या हातात नव्हतं.
'आपण एकमेकांना का भेटलो ?'—हा अर्थहीन प्रश्नही त्यांनी विचारला नव्हता. पण थांबायचं कुठे ?—हे न ठरवताही ठरलेलं पाहून दोघांना अर्ध्या वाटेतच संपूर्ण यात्रा केल्याचं समाधान वाटलं

आता दोघं एकमेकांकडे पाहत नव्हती.

" जाऊ ?" नीळकंठनं विचारलं.

मंद हसत, अतृप्त नजरेनं ती ' नको ' म्हणाली.

त्याच्या परवानगी मागण्यात अर्थ नव्हता.

तिच्या नकारात उत्तराचं समाधान नव्हतं.

तो निघाला.

ती जवळ आली.

एक कडकडून युगायुगाची खोळंबलेली मिठी, चुंबनांचा वर्षाव, आणि ' पुन्हा केव्हा 'चं उत्तर न देता निरोप.

नीळकंठ एक जिना चढून वरच्या मजल्यावर आला. शेजारच्या वासूला त्यानं घराकडे लक्ष ठेवायला सांगितलं होतं. ' वासू ' नावाची मुलं घराकडे लक्ष ठेवण्यासाठीच असतात असं नीळकंठला वाटायचं.

दरवाजातच तो रसरंग वाचत बसला होता. नीळकंठ जिन्यावर दिसताच तो त्याच्या घरात गेला.

नीळकंठ घरात आला. त्यानं दार लोटून घेतलं, आणि तो तसाच बसून राहिला. नुकत्याच घडून गेलेल्या प्रसंगाची तो नकळत उजळणी करू लागला. अजून धग ओसरली नव्हती. छाती उडतच होती. जे घडलं ते खरंच घडलं का ह्याचाही विचार आता एकीकडे सुरू झाला होता. अनेक दिवसांची प्रतीक्षा आजच संध्याकाळी संपणार आहे ह्याचा मागमूसही आजच्या सकाळला नव्हता. सकाळच कशाला ?

–दुपारलासुद्धा हे माहीत नव्हतं. ' दुपार ' असंही म्हणायचं कारण नाही. कामावरून घरी आल्यावर, चहा झाल्यावर, ' कोपऱ्यावरून जाऊन येते ' असं सांगून जान्हवी जेव्हा बाहेर पडली तेव्हासुद्धा, ती परत यायच्या आत हे असं काही होणार आहे, हे माहीत नव्हतं. खरं तर, जान्हवी जाताना म्हणाली होती,

" मंदोदरी बरोबर येते का बघते."

त्यानंतर नीळकंठ सहज गॅलरीत येऊन उभा राहिला.

जान्हवी एकटीच जात आहे हे त्यानं पाहिलं आणि तो घरात आला.

"माझ्या लक्षात नाही आलं."
"मला असं वाटलं की माणसं गावं वसवतात म्हणजे हे असेच वाडे बांधतात. तिथं आपण समोरासमोर राहतो, शेजारी राहतो, वरच्या किंवा खालच्या मजल्यावर राहतो. मधे एक विटांची रेघ मारायची, त्या रेषेला रंग लावायचे. एका बाजूला एक रंग. दुसऱ्या बाजूला दुसरा रंग. स्वतःच्या रंगाला अभिरुची म्हणायचं, दुसऱ्याच्या रंगाला एक हुंकार टाकायचा. रंगाला, विचाराला आणि आयुष्यालाही. संपलं! ह्यापलीकडे आपण एकमेकांसाठी काय करतो?"

नीळकंठच्या ह्या दीर्घ खुलाशावर मंदोदरीनं विचारलं,
"हे सगळं तुम्हाला आजच का वाटलं?"
"वाटलं खरं! का ते सांगता यायचं नाही."
मंदोदरी नुसती हसली.
"केव्हा का वाटेना, ह्यात काही खोटं आहे का?"
प्रश्नाचं उत्तर न देता मंदोदरी म्हणाली,
"माझी कुणाकडूनही कसलीही अपेक्षा नाही."
"नसली तरी विचारतो, तुमच्यासाठी काय करू?"
मंदोदरी बोलून गेली,
"दिवसाकाठी एकदा नुसते दिसलात तरी मला बरं वाटतं."
ह्या अनपेक्षित उत्तरानं आपण पुढे कधी झालो हे नीळकंठला समजलंच नाही. नीळकंठ पुढे होण्याचाच काय तो अवकाश होता. मंदोदरी त्याच्या हातांच्या विळख्यात आली. ट्रॅन्झिस्टरच्या बटणापाशी जसा स्वर थांबलेला असतो तशीच जणू ती इतके दिवस थांबलेली होती.
एक संध्याकाळ चुकली.
कंटाळा गेला.
पण एक न संपणारी हुरहूर सुरू झाली.

जान्हवी कोपऱ्यावरून परतली, तरी नीळकंठ त्याच मन:स्थितीत होता. गॅलरीत उभं राहून तो अजून त्या चौकाकडे पाहत होता. नेहमीच्या वेळेला

शंतनुरावांची फियाट वाड्याच्या मोठ्या दरवाजातून मधल्या चौकात आली. जिन्याजवळच्या स्वतःच्या घरासमोर ते थांबले. गाडीतून एक मुलगी उतरली. आज शंतनुरावांबरोबर कोणती मुलगी असेल हे पाहण्याची त्या वाड्याची उत्सुकताही आता संपली होती.

रोज कोणी तरी असणारच. आज ही इतकंच.

ताडपत्रीच्या टेंपररी गॅरेजमध्ये शंतनुरावांनी गाडी उभी केली.

ते पाहून नीळकंठ हसला.

ह्याच शंतनुरावांना पहिल्या काही दिवसांत पुणतांबेकरांनी गाडी रस्त्यावर पार्क करायला लावली होती. शंतनुरावांनी थैलीचं तोंड नुसतं सोडलं तेव्हा गाडी मधल्या चौकात आली आणि थैली उलटी करताच, ताडपत्रीचं गॅरेजही तिथं उभं राहिलं. मग वाड्यातले वाडेकर, चंदू बोर्डे, सोळकर, अबीद-अल्लीचे मोर्चे मालकांकडे गेले. 'काचा फुटल्यास आम्ही जबाबदार नाही' असं म्हणत एक्ट्रॉसकट सगळ्या टीमचे हात कानावर गेले. पुणतांबेकर गप्प बसले.

त्यानंतरच्या गणपती उत्सवासाठी शंतनुरावांनी सार्वजनिक वर्गणीच्या यादीत पाचशेएक रुपयांचा आकडा टाकताच, टेंपररी गॅरेज, बाउंडरी लाईनच्या बाहेर असल्याचं सगळ्यांच्या लक्षात आलं.

थैलीचं तोंड सुटलं की सुटणारी तोंडं गप्प बसतात. मग मोटारीतून येणाऱ्या मुलीसुद्धा कुणाला खुपल्या नाहीत. माणूस राजबिंडा आहे आणि राजासारखा उदार आहे— मुली यायच्याच, इतकंच नव्हे तर त्याला तो अधिकारच आहे—इथवर पुणतांबेकरांचा वाडा मोठ्या मनाचा झाला.

नीती—अनीतीच्या चौकटी शेवटी बँकेच्या काऊंटरवरच ठरतात ह्याची नीळकंठला आत्ताही गंमत वाटली. कारण शंतनुरावांना मुक्त विहाराचं स्वातंत्र्य आदरानं बहाल करणारा वाडा इथंच थांबला नाही तर मंदोदरीतच काही तरी कमीजास्त असणार हे त्या वाड्यानं बहुमताला ठराव न टाकता पक्कं केलं, आणि पोरी आणि मोटारी बाळगणारा शंतनूराव 'गरीब बिचारा' ठरला.

पैसेवाल्यांना त्यांच्या भानगडी निस्तरणं सोपं जातं, कारण समाजानंच त्यांना 'स्वाभाविक' पणाची लेबलं बहाल केलेली असतात.

आपण गरीब, सामान्य !

आणि ह्याच विचाराच्या पाठोपाठ नीळकंठच्या मनात पुढचा विचार आला तो मंदोदरीचा.

तिचा स्पर्श अजून मागं उरला होता.

आठवणीनंही शहारा आला. ओठांची हालचाल झाली. खरं तर स्त्रीस्पर्श नवा नव्हता. मिठी या शब्दाची आणि आपली ही पहिली ओळख नव्हती आणि चुंबनातलं काव्य प्रथम भिडलं नव्हतं.

तरीही, शरीर हे सारखंच. जान्हवी काय किंवा मंदोदरी काय, हे मानायला नीळकंठचं मन तयार नव्हतं.

व्यक्ती बदलली की सगळं बदलतंच.

पण पुढे काय ?

पुढे काही नाही.

ह्यापुढे जे आहे ते झेपणारं नाही.

आपल्याजवळ फियाट नाही.

शंतनुरावांच्या बाबतीत जे जे 'स्वाभाविक' आहे ते ते सगळं आपल्या बाबतीत 'पाप' आहे.

व्यभिचार आहे.

"मंदोदरी, खरंच, आपल्याला इथंच थांबायला हवं."

"तुम्हाला भेटायला कुणी बाई आल्या आहेत."

शिपायाच्या ह्या निरोपाचं अतिशय आश्चर्य करीत नीळकंठ ऑफिसच्या बाहेर आला.

बाहेरच्या बागेत, मेन पोर्चजवळ मंदोदरी उभी होती.

नीळकंठ वाढत्या वेगानं चालत मंदोदरीसमोर जाऊन उभा राहृला.

"तुम्ही ?"

त्याच्या प्रश्नाचा रोख समजून घेत मंदोदरी म्हणाली,

"ऑफिसात यायला नको होतं ना ?"

"नाही, तसं नाही."

"इलाज नव्हता म्हणून आले."

पटकन् एक विचार येऊन नीळकंठनं विचारलं,

" काल कुणी पाहिलं नाही ना ?"

मंदोदरीकडून नकार येईपर्यंत, तरीसुद्धा दोन–चार ठोके चुकलेच.

न बोलता दोघं चालू लागली. फाटकाबाहेर आल्यावर नीळकंठनं रिक्षाला हात केला.

" रिक्षा कशाला ?"

" ह्या एरियात एकही बऱ्यापैकी हॉटेल नाही."

" नको."

" का ?"

" कुणी पाहचलं तर?"

" तसं काय, अगदी ह्या क्षणीही आपल्याला कुणी पाहू शकतं."

" मी आत्ताच जाते."

" वा, कमाल आहे तुमची."

" काही तरी सणक आली आणि घर सोडलं. आता वाटतं वेडेपणा घडला हातून. तसा तो कालच घडलाय, पण..."

" करा, वाक्य पुरं करा. मला काही वाटायचं नाही."

" तुमच्यासाठी नाही थांबले. घडून गेलेल्या गोष्टीवर बोलण्यात अर्थ नाही म्हणून थांबले. जाऊ ?"

" मी नको म्हणालो तर थांबणार आहात ?"

" गाही."

" मग बिनअर्थाचे प्रश्न तरी कशाला विचारायचे, नाही का ?"

नीळकंठच्या ह्या प्रश्नावर न बोलता मंदोदरीनं रिक्षाला हात केला.

रिक्षा थांबली.

मंदोदरी प्रथम बसताच नीळकंठ म्हणाला,

" नीट जा."

" घरी निघालेले नाही, रिक्षावाल्याला हॉटेलचा पत्ता सांगा."

रिक्षा निघून गेल्यावर, हॉटेलच्या पायऱ्या चढताना मंदोदरीनं विचारलं,

" आपला वाडा इथून किती लांब आहे ?"

" दोन चौक पलीकड."
" हो ?"
" का ?"
" इतक्या जवळ आपण... "
" उगीच आलो, असंच ना ? चला आता. जास्त विचार करू नका."
फॅमिली रूममधे येताच नीळकंठनं विचारलं,
" माझं ऑफिस सापडलं कसं हे अगोदर सांग."
" मागे एकदा तुम्हीच सांगितलं होतं. एकदा ह्यांनी गाडीतून जाताना दाखवलंही होतं."
" तुम्ही मिस्टरांच्या गाडीत बसला ?"
" प्रथम प्रथम बसत होते. त्यांच्या मैत्रिणी सर्रास वाड्यावर यायला लागल्यावर सोडून दिलं."
मंदोदरीनं शांत स्वरात सांगितलं, तरीही नीळकंठ अस्वस्थ झाला. त्याच्या अस्वस्थ चेहऱ्याकडे पाहत ती म्हणाली,
" जाऊ दे. तुम्ही तुमचा मूड खराब करून घेऊ नका."
" माझ्या मूडचा प्रश्न नाही, तरी पण हे किती दिवस चालणार ?"
" कायम ! ते किंवा मी आहोत तोपर्यंत."
" आणि तुम्ही ते सहन करणार."
" दु:ख किती वर्षं करू ?"
" दु:खही करायचं नाही."
" मग ?"
" बंड करायचं."
" बायको बंड करू शकते ?"
" का नाही ?"
" नवऱ्याचं बायकोवर त्यासाठी प्रेम लागतं. ते नसेल तर बंड म्हणजे फक्त तमाशा ठरतो." मंदोदरी शांतपणा न सोडता उत्तरं देत होती.
" तुम्ही किती शांत आहात !"
" ती सरावानं मिळवलेली शांतता आहे."
" ह्या शांत स्वभावापायी गैरसमज पसरतात, त्याचं काय ?"

" कसले गैरसमज ?"

" शंतनुरावांचं हे सगळं वर्तन क्षम्य ठरतं."

" त्यांची ती सगळी धडपड तेवढ्यासाठीच आहे."

" माझ्या लक्षात आलं नाही."

मंदोदरी गप्प बसली.

तिचे शब्द थांबले, पण बोलणं संपलेलं नाही ते चेहऱ्यावरून सहज समजत होतं.

नीळकंठ काही वेळ तिच्याकडे पाहत राहिला.

तेवढ्यात वेटर आला.

" काय घेणार ?"

" नुसती कॉफी."

नीळकंठनं ऑर्डर दिली आणि तो पुन्हा मंदोदरीकडे पाहत राहिला.

दोघांच्या नजरा क्षणभर भेटल्या. क्षणभर म्हणजे क्षणभरच. रांगेत चालणाऱ्या मुंग्या-समोरून येणाऱ्या मुंगीसमोर जेवढ्या वेळ थबकतात तितक्याच वेळ, ह्या नजरा थांबल्या आणि खाली वळल्या.

कालच्या धावत्या भेटीच्या आठवणी दोघांच्या मनात 'कोरस' गाऊन गेल्या.

" तुम्ही काही तरी सांगत होतात."

" हो, सांगत होते खरी. पण..."

" आजच बोला, पुन्हा संधी मिळेल, न मिळेल..."

" मिळाली तरी हुकवायची !" मंदोदरी गडबडीनं म्हणाली आणि जरा श्वास घेऊन, निग्रह करून पुढे म्हणाली,

" हेच सांगायला मी आले होते."

" आला नसतात तरी माझ्या मनात मी हाच विचार केला होता."

" खरंच ?"

मंदोदरीच्या ह्या प्रश्नावर, तिच्याकडे सरळ पाहत नीळकंठ एकेरी संबोधून म्हणाला,

" होय मंदोदरी, तुला आणि मला हा प्रवास पेलवणार नाही. जान्हवी इतकी

म्हणजे इतकी लाख बाई आहे की..."
" तेच सांगणार होते. आज दुपारी आम्ही सगळं जेवण एकत्र करून जेवलो. त्यांच्या हातचं जेवत असतानाच मी एकीकडे आजच्या आज तुम्हाला भेटायचं हे ठरवलं. मागचा पुढचा कसलाही विचार न करता, हातावर पाणी पडताच मी तडक निघाले. तुमच्या ऑफिसात आल्यावर मग विचारात पडले की, हा शहाणपणा झाला की मूर्खपणा ?"
" जाऊ दे. आता कसलाही विचार करू नकोस. हेही केव्हातरी बोलायचं होतंच. तेव्हा आलीस ते छानच झालं. आपण असेच मजेत राहू. चालेल ?"
मंदोदरीनं मान हलवली आणि त्याचवेळी तिच्या डोळ्यांत पाणी आलं.
नीळकंठनं ते आपल्या रुमालानं पुसलं. तेवढ्या स्पर्शानं ओढून ताणून आणलेलं बळ, कसं आणि कुठं गेलं ते दोघांनाही कळलं नाही.
नीळकंठच्या खांद्यावर मान टेकून मंदोदरीनं अश्रूंना वाट करून दिली.
" नीळ, मी फार फार सोसलंय्. दिवस कसे काढले, ते फक्त मलाच माहीत आहे."
वेटरची चाहूल लागताच ती सावरली.
सरळ बसली.
तिनं डोळे कोरडे केले.
कॉफीच्या वाफेकडे दोघं पाहत राहचली.

" मंदा, जान्हवीकडून मला तुझी फार थोडी थोडी माहिती समजत आली. मला फक्त एकच समजलं नाही, तुझ्या आईवडिलांनी शंतनुरावांना कधी आवरलं कसं नाही ?"
" तसं जर होऊ शकलं असतं तर लग्नानंतर आठच दिवसांत घडलं असतं."
" शंतनुरावांचा हा नाद इतका जुना आहे ?"
" ह्या नादाचं काहीच नाही. तो एक केवळ मुखवटा आहे. जन्मतः असलेला डाग झाकण्याचा एक दुबळा प्रयत्न."
" मला नाही समजलं."
" आणखीन स्पष्ट कसं सांगू ?"
" माझ्यावर विश्वास ठेवा, मी कुठं बोलणार नाही."

" ती शंकाही मला शिवली नाही, तरी संकोच वाटतो."
" माझा ?" मंदोदरीच्या खांद्यावर हात ठेवीत नीळकंठनं विचारलं.
तो स्पर्श मंदोदरीला फार काही सांगून गेला. पुढचे शब्द मग ओघळलेच.
" नीळकंठ, बाईला पुरुषाचा आधार, मैत्री, सहवास आणि खरी ज्या प्रेमाची वात्सल्याची भूक असते ती शंतनुराव कधीही पुरी करू शकणार नाहीत, हे कठोर ज्वाळेसारखं लख्ख आणि आपली राख करू शकणारं सत्य मी लग्नाच्या पहिल्या रात्री पचवलं."
" का ? पचवायचं कशाला ?"
" पाच बहिणी लग्नाच्या होत्या आणि वडिलांना कर्ज होतं."
" म्हणून तुझा बळी ?"
" दुसरा इलाज नव्हता. मांजरीला पिल्लं झाली म्हणजे त्यातलं एक खाण्यासाठीच असतं. फक्त आईच्या पोटात आपल्यापैकी पुन्हा कोण जाणार आहे हे एकाही पिल्लाला माहीत नसतं. एक पोर खाणं हेच म्हणे त्या मांजरीचं ट्रॉनिक असतं. वडिलांच्या आणि आईच्या संसारासाठी एक बळी द्यायलाच हवा होता."

नीळकंठ सुन्न झाला.
आपल्यात काही कमतरता नाही हे दर्शविण्यासाठी रोज पोरींना घेऊन भटकणारा शंतनू डोळ्यांसमोर येऊन गेला आणि त्या माणसाची त्याला किळसच आली. दरिद्र्यापेक्षा तो दरिद्री होता. कॉफीच्या वाफेकडे स्थिर नजरेनं पाहणाऱ्या मंदोदरीनं काय काय पचवलं असेल ह्याची त्याला पूर्ण कल्पना आली. क्षणभर वाटलं की मंदोदरीला निसर्गानं बहाल केलेली एकूण एक सौख्यं कोणत्याही मार्गानं मिळविण्याचा पूर्ण अधिकार आहे.
आवेगानं तिचा हात पकडीत तो म्हणाला,
" मंदा, राहिलेलं आयुष्य आपण खूप चांगलं जगू. शंतनुरावांचा विचारही करू नकोस."
" त्यांचा विचार नाही करीत मी, जान्हवीचा करते. त्यांच्याशी मला प्रतारणा करवणार नाही. आज त्यांच्या हातचं जेवताना हाच विचार मनात

आला म्हणून तुम्हाला भेटायला आले. वाड्यात एवढं बोलायला मिळालं नसतं."

"तुला खरंच सांगतो. ह्या एका बाबतीत मला कन्व्हिन्स करायचा प्रश्नच नाही. तिचे गुण, तिचं प्रेम ह्या सर्वांना माझ्या मनात फार मोठं स्थान आहे."

"मला ते माहीत आहे, आणि माहीत असूनही मी काल स्वत:ला आवरू शकले नाही. मी थांबवलं असतं तर तुम्ही थांबला असतात."

"नक्कीच ! आनंद जसा लादता येत नाही तसाच जबरदस्तीनं मिळवताही येत नाही."

अत्यंत समाधानानं मंदोदरी म्हणाली,

"मला आता अतिशय हलकं वाटतंय."

"कशाबद्दल ?"

"तुम्ही जर काही गैरसमज करून घेतला असतात तर मला सहन न होणारं दु:ख झालं असतं !"

"का ?"

"स्पष्ट सांगू ?"

"जरूर."

"तुम्ही माझी गेले अनेक दिवस झोप उडवली आहेत. माझा अपुरा संसार मी कल्पनेनं तुमच्या सहवासात पुरा करत आहे."

"मंदा..."

"आणि आता इथून पुढे मी मला सावरू शकणार नाही. तुमच्यावरचं माझी सगळी मदार आहे."

"Don't worry."

"दोघांची जबाबदारी उचलाल ?"

"दोघांची कुणाची ?"

"स्वत:ची आणि माझी ?"

उत्तर न देता नीळकंठनं मंदोदरीला जवळ ओढलं.

६ शब्दांचा व्याकरणातला अर्थ आणि स्थान हे परीक्षा देताना समजतं आणि

त्याच उब्दांचं जीवनाशी काय नातं असतं ह्याचा अर्थ जगताना समजतो. परीक्षेचा हॉल सोडला की परीक्षेचं ओझं झटकता येतं, कारण पदवीपुरताच त्या हॉलशी संबंध असतो. पण जगताना शब्द जेव्हा झटकता येत नाहीत तेव्हाच त्याचा खरा अर्थ समजतो.

'मी दोघांना सावरीन' ह्या वाक्यातला 'सावरणं' हा शब्द किती अर्थपूर्ण होता याची भयाण जाणीव नीळकंठला जाता-येता होत होती.

शत्रूच्या सैन्याची ताकद किती आहे हे समजलं म्हणजे पुढचे पवित्रे ठरवता येतात. मग ते चढाईचे असोत किंवा पांढऱ्या निशाणाचे असोत.

इथं 'सावरणं' ह्याच शत्रूशी युद्ध होतं. त्या शब्दाची ताकद समजत नव्हती. चोवीस तास जागरूक राहणं झेपत नव्हतं. मंदोदरीचा विचार सुटणं अशक्य झालं होतं. आपल्याला बायको असतानाही आपण आणखीन कुणाला तरी आवडू शकलो ह्या अहंकाराचं सुख अफाट होतं.

आणि तरीही जान्हवीचा विचार तळ ठोकून होताच.

एकीकडे हिची छावणी, चार पावलांवर तिची. न संपणारी कसरत.

एके दिवशी मंदोदरींकडून निरोप आला. नीळकंठ गेला.

"मला तुम्ही किती छळणार आहात ?"

"काय झालं ?"

"सावरणं म्हणजे नजरेलाही न पडणं असा अर्थ होतो काय ?"

"मी मनापासून लांब राहतो, अशी तुझी समजूत आहे का ?"

"मुळीच नाही."

"तू गैरसमज करून घेणार नाहीस ह्या खात्रीवर स्वतःला सावरायला मला बळ येतंय्."

"म्हणून नुसतं दिसायचं पण नाही ?"

मंदोदरीच्या प्रश्नावर नीळकंठ म्हणाला,

"दिसलीस की भेटावंसं वाटतं. भेटलीस की बोलावंसं वाटतं. बोललीस की जवळ यावंसं वाटतं. जवळ आलीस की आवरणं कठीण होतं."

"जवळ यायचं नाही."

"तेच जमत नाही."

" का ?"
" जे जे वाटतं ते ते सगळं व्यक्त करण्याची शक्ती फक्त स्पर्शातच आहे. वाटणं, वाटणं म्हणतात तो प्रवास तिथं संपतो तिथं जर पोहोचायचं नसेल तर प्रवासाच्या प्रारंभीच थांबणं आणि थांबवणं योग्य नाही का ?"
" मला ते काही कळत नाही."
" मंदा, दारू सोडण्याचा क्षण, पहिला थेंब घेण्यापूर्वीच असतो, असं गडकऱ्यांनी दारूबद्दलच का म्हणावं कळत नाही. ह्या अशा प्रेमाच्या बाबतीतच त्यांनी असं म्हणायला हवं होतं."
" माझी समजूत घालण्याच्या भानगडीत पडू नका. मी फक्त काय करू सांगा."
" तूही काही करू नकोस आणि मीही काही करणार नाही. मन मारणं ह्यातच माझी शक्ती मी घालवतोय. मोर्चे पुन: पुन्हा बांधायचे ते मनाविरुद्ध, डोळ्यांविरुद्ध, स्पर्शाविरुद्ध. स्वत:च्याच देहाशी, मनाशी आणि पंचेंद्रियांशी मला युद्ध खेळावं लागेल असं वाटलं नव्हतं."
" पण..."
" त्यातूनही मंदा, ह्या गचाळ वाड्यात जर आपण राहचलो नसतो तर कदाचित, कदाचित......"
" मला समजलंय्."
" रागावलीस ?"

" मुळीच नाही. फक्त इतकंच सांगते, मी जास्त तग धरू शकणार नाही. भेटला नव्हतात तेव्हा प्रश्न नव्हता. पण आता पुढची वाट कठीण आहे."
" मंदा, तुला माझी शपथ आहे. माझ्यासाठी तुला..."
" जगावं लागेल, असंच ना ? हे सांगणं खूप सोपं आहे नीळकंठ."
" तुझ्या यातना..."
" तुम्हाला मुळीच समजायच्या नाहीत. लाटेच्या तडाख्यासरशी किनाऱ्यावर फेकल्या गेलेल्या माशाला, 'तू माझ्यासाठी जग' असं पाण्यातल्या माशानं म्हणण्यासारखं आहे हे!"
" मंदा..."
" घाबरू नका. तरीही मी जगणार आहे."

मंदोदरी खूप दिवसांत न दिसणं ह्यात नवल नव्हतंच.
तो तर जाणीवपूर्वक केलेला प्रयत्न होता. फार दिवस झाले की एखादी भेट व्हायची. भेटीच्या सुरुवातीला भांडण, मग सांत्वन आणि मग निरोप घेता-घेता आलिंगन–चुंबन एवढ्याच लक्ष्मणरेषेपाशी थांबून वारंवार हे असं भेटायचं नाही, भेटल्यावर भांडायचं नाही असे करार.

त्यामुळे मंदोदरी आठ–दहा दिवसांपासून निजून आहे हे जान्हवीकडून समजताच नीळकंठला नवल वाटलं.
" डॉक्टरांना दाखवलं का ?"
" कधीच."
" काय म्हणतात ?"
" पॅरा–टायफाईड असावा असा अंदाज."
जान्हवीनं जेवढं माहीत होतं ते सांगितलं.

पॅरा–टायफाईड हा अंदाज ठरला.
ताप हटेना.
अंदाज चुकत राहिले.
शंतनुरावांना काय कमी ?–स्वतःच्या गाडीतून तो रोज नव्या स्पेशालिस्टला घेऊन यायचे.
शेवटी मंदोदरीला जहांगीर नर्सिंग होममध्ये हलवण्यात आलं.
शंतनुरावांनी तिथं फक्त चार दिवस वाट पाहून, स्पेशल गाडीनं मंदोदरीला मुंबईला नेलं ते थेट बॉम्बे हॉस्पिटलमध्ये.

मुंबईला जाऊन वीस दिवस झाले तरी मंदोदरीबद्दल काही समजलं नाही."
एके दिवशी जान्हवी म्हणाली,
" ह्या शनिवारी ऑफिस सुटल्यावर जाऊ या का ?"
" कुठे ?"
" मुंबईला. दादांना खूप दिवसांत भेटले नाही. मंदोदरीलाही भेटून येऊ."
" एक हिरवी नोट जाईल."

" नेहमी तोच विचार करावा लागतो आणि त्यापायी कुठं जाणं होत नाही."
" ऑलराईट, जाऊ."

दोन्ही मुलांना घेऊन नीळकंठ–जान्हवी मुंबईला आली. रविवारी सकाळी शंतनुरावांनी देऊन ठेवलेल्या नंबरवर नीळकंठनं फोन केला. मंदोदरी अद्यापि हॉस्पिटलमध्येच होती, इतकंच नव्हे तर सर्वांनी तिची आशा सोडली होती. गले आठ दिवस तर ती बेशुद्धच होती.
हॉस्पिटलसमोरच्या असंख्य मोटारींतून, शंतनुरावांची परिचित फियाट लगेच ओळखायला आली.
खोलीबाहेर सात–आठ अपरिचित, चिंतातुर चेहेरे बसलेले होते.
मंदोदरीबद्दल जान्हवीनं बाहेरच चौकशी केली. एका उत्साही बाईनं सगळा तपशील पुरवला. आणि मग ती म्हणाली,
" आता शंतनुरावांची समजूत तुम्हाला घालता येते का पाहा."
" कशाबद्दल ?"
" गेले आठ दिवस ते मंदोदरीच्या उशापायथ्याशी बसून आहेत. कुणालाही खोलीत पाऊल टाकून देत नाहीत."
" काय सांगता काय ?"
" आठ रात्र झोपले नाहीत."
" हे बरं नव्हे."
" बरं नव्हे, म्हणजे परवा डॉक्टरांनीच सांगितलं, त्या पद्धतीनं आता एक दिवस काढलात तर परिणाम त्रासदायक होतील, तुम्हाला इथं पेशंट म्हणून ह्यांच्याशेजारी कॉट टाकावी लागेल."
" मी सांगतो." असं म्हणत नीळकंठ खोलीत आला.

पलंगावर, पलंगमय झालेली मंदोदरी दिसतच नव्हती, जान्हवीच्या डोळ्यांत पाणी आलं. नीळकंठनं आपलं मन प्रयासानं आवरलं. मोकळेपणी दुःख दर्शवू शकणाऱ्या जान्हवीचा त्याला हेवा वाटला.
मंदोदरी डोळे मिटून पडली होती. तिच्या नाकात ऑक्सिजनची नळी होती. एकदा चेष्टेत, मिठीत असताना नीळकंठनं तिच्या नाकाचा शेंडा दातात

पकडला होता. तेव्हा तो चावेल ह्या निव्वळ कल्पनेनंच ती ओरडली होती,
"मला हे असं जराही सहन होत नाही."

आता हिला ही नळी कशी सहन होत असेल ? सतत आठ दिवस तो नाकातच असल्यामुळे नाक जरासं सुजल्यासारखं वाटत होतं.

मंदोदरी तशी मूळची गोरी, पण आता ती पांढरी दिसत होती. ओठ कोरडे पडले होते. धाप लागल्याप्रमाणे ते आता काहीसे उघडे होते.

खोलीत औषधाचा वास पसरला होता.

शंतनुरावांनी त्या दोघांना पाहून खोलीत सगळीकडे स्प्रे उडवला. खोली सुगंधानं दरवळली.

बोलण्या–विचारण्यासारखं काही नव्हतंच.

नीळकंठ म्हणाला,

"शंतनुराव, तुम्ही खूप ओढल्यासारखे दिसताय्."

ते नुसते हसले.

"मी मुद्दाम जान्हवीला घेऊन आलोय्. ती इथं राहील दोन दिवस."

शंतनुराव नुसते हसले.

"खरंच, तेवढ्यासाठीच मी आले आहे."

"थँक्यू व्हेरी मच वहिनी."

"नुसतं थँक्यू नको." जान्हवी म्हणाली.

"तुम्हाला खरं सांगू का, इथं कुणालाच बसवायचं नाही असं मी ठरवलंय्. माझी बहीण, वहिनी, मंदोदरी आई, तिच्या तीन बहिणी, सगळ्या मुंबईत आल्या आहेत. त्याशिवाय जिवाला जीव देणाऱ्या माझ्या मैत्रिणी किती आहेत हे तर सगळ्या वाड्याला माहीत आहे. पण तरीही मी सगळ्यांना 'साभार परत' पाठवलंय्. इथं फक्त मी, आमची रुसलेली बायको आणि हा टेपरेकॉर्डर. ही गाणारी मंडळी आपल्याला किती सोबत करतात त्याची कल्पना ह्या आठ दिवसांत प्रकर्षानं आली."

तो प्राणी वाकणारा नव्हता आणि जिच्याशी जिवाभावाच्या गोष्टी केल्या ती बोलणार नव्हती. बोललेलं ऐकणार नव्हती. खिडकीपाशी वाट पाहणारे डोळे आता फक्त अंधाराचीच वाट पाहणार होते.

थांबण्यात काय अर्थ होता ?

नीळकंठ-जान्हवी बाहेर पडलीं

त्या तशाही प्रसंगी शंतनुरावांनी आपल्या मैत्रिणींचा उल्लेख करावा हे दोघांनाही आवडलं नव्हतं.

"ह्या माणसापायीच मंदोदरी आजारी पडली. आता मारे शुश्रूषा करतोय. ह्या सेवेला आता काय चाटायचंय्? त्या बाईला काय छळलंय् ते मलाच माहीत आहे."

जान्हवी त्राग्यानं बोलत होती.

नीळकंठ चूपचाप होता.

पुण्याला आल्यावर सातव्या दिवशीच, मंदोदरी गेल्याचं पत्र दादांनी पाठवलं. डॉक्टरांनी शंतनुरावांना जे म्हटलं होतं तेही दुर्दैवानं खरं ठरलं होतं. शंतनुरावांना त्याच खोलीत, त्याच कॉटवर पेशंट म्हणून पडावं लागलं होतं. पत्र मिळाल्यावर दोन दिवसांनी येणाऱ्या रविवारी मुंबईची वारी करायचं नीळकंठनं ठरवलं.

बोरीबंदरला उतरून तो तडक बॉम्बे हॉस्पिटलमध्ये गेला. तोच मजला, तीच खोली आणि मागच्या वेळेस जी मंडळी भेटली होती त्यांपैकी एक चेहरा सोडल्यास, दुसऱ्या दोन व्यक्ती नव्या होत्या.

तो परिचयाचा चेहराच पुढे आला.

नीळकंठ काहीही न बोलता गप्प बसला.

"काय योगायोग असतात." तो म्हणाला.

"पाहा ना, अगदी अकल्पित!" नीळकंठ म्हणाला, "वहिनींचं अकल्पित, शंतनूनं ओढवून घेतलेलं."

"त्यांनी शेवटपर्यंत कुणालाही येऊन दिलं नाही का हो?"

"नाही ना! वहिनी गेली हे त्यानं आम्हाला बाहेर येऊन सांगितलं तेव्हा आम्ही आत गेलो."

*

"Simply strange!"

दरवाजा लोटून नीळकंठ आत गेला. एअरकण्डिशण्ड खोलीत पाय पडताच प्रवासाचा शीण आणि वैचारिक ताण ह्या दोन्हीचा त्याला क्षणभर विसर पडला.

शंतनुरावांची दरवाजाकडे पाठ होती. टेबलावरच्या औषधाच्या बाटल्या बदललेल्या होत्या आणि कॉटवरचा पेशंट.
बाकी सगळं तसंच होतं.
खोलीत, हवेत मारायचा स्प्रे, टेपरेकॉर्डर सगळं तेच.
क्षणभर शंतनुरावाच्या ऐवजी नीळकंठला मंदोदरी दिसली. त्याच्या डोळ्यांत पाणी आलं. शंतनुरवांनी कूस बदलली. तेवढ्यात नीळकंठनं डोळे कोरडे केले.
तो पुढे झाला.
चाहूल लागून शंतनुरावांनी डोळे उघडले.
नीळकंठ पटकन पुढे झाला आणि त्यानं शंतनुरावांचा हात हातात घेत विचारलं,
"कसं काय वाटतंय् ?"
"ठीक आहे."
प्रेमापेक्षा कर्तव्याचाच अंश ह्या भेटीमागं जास्त असल्यानं पुढे काय बोलावं हे नीळकंठला समजेना.
तेवढ्यात दार उघडलं गेलं आणि दोन-तीन बायका सरळ खोलीत आल्या. त्यांपैकी एकीला शंतनुरावांच्या मोटारीत नीळकंठनं बरेचदा पाहूचलं होतं. तीच पुढं झाली आणि हक्कानं ती पलंगावरच बसली.
"पत्र का पाठवलं नाहीत ?" तिनं सरळ सरळ हल्लाच केला.
"मी त्या मनःस्थितीत नव्हतो."
"मी गावाला गेले होते. पुण्याला आले, तुझ्या ऑफिसात फोन केला आणि बातमी समजल्याबरोबर मला धक्काच बसला. तडकाफडकी निघणार होते, पण..."

" अग बाई, जरा श्वास घे, मग बोल. मी पळून जात जात नाही. आजारी आहे मी. "

" तो आजारही तू ओढवून घेतलास. असं का केलंस ?"

नीळकंठ मधेच म्हणाला,

" मी तेच विचारणार होतो."

शंतनुरावांनी सगळ्यांकडे पाहिलं. मग नीळकंठकडे पाहिलं आणि मग आपल्या सख्यांना तो म्हणाला,

" तुम्ही सगळ्या बाहेर थांबता का ? हे आमचे मित्र खास पुण्याहून आले आहेत त्यांच्याशी जरा बोलतो. चालेल ?"

त्या सगळ्या गेल्यानंतर, एकाएकी उठून बसत शंतनुराव नीळकंठवर जवळ जवळ ओरडले,

" हलकटा, तुझ्यासाठी मी हे सगळं केलं. समजलं ?"

नीळकंठ विजेचा धक्का बसावा तसा बसल्या जागी उडाला.

" बावळटासारखा पाहू नकोस, आणि इथं थांबूही नकोस. "

पहिला धक्का ओसरला होता. तशाही परिस्थितीत तो पुढं झाला. समजुतीच्या स्वरात म्हणाला,

" शंतनुराव, मी जातो. मनस्ताप करून घेऊ नका. तुमच्यावर फार ताण पडलाय्. "

" तो मंदोदरी गेली म्हणून नाही, तुझ्यामुळे पडलाय्. मी वातात बडबडत नाही. पूर्ण शुद्धीवर आहे. पुन्हा बोलायचं नाही म्हणून आत्ता बोलणार आहे. तूही जे विचारायचं ते विचारून घे."

" मला काहीच विचारायचं नाही. "

" That's fine! तू जाऊ शकतोस. पुन्हा भेटू नकोस. संसार एकदा उधळलास तो खूप झाला. "

नीळकंठचा आता मात्र तोल गेला.

" मी काय केलं एवढं सांगाल का ?"

ह्या प्रश्नासरशी शंतनुराव धडपडत उठले. त्यांचा तोल जात होता तरी ते उठले. त्यांनी टेपरेकॉर्डरमधली कॅसेट बदलली.

"एक मूर्खा. तुझी मंदोदरी तुला काय ते सांगेल."

टेपमधून परिचयाची हाक आली.
"नीळकंठ–"
पायांपासून डोक्यापर्यंत, मूळच्याच दुखावलेल्या अंगठ्यावरच पुन्हा ठेच बसली की जशी कळ जाते, तशी कळ गेली.
"नीळकंठ, नको...इथंच थांबायला हवं...नाव...सांभाळायला...समाज... नको, नीळकंठ...हा वाडा आहे...थांब...मन मारायला हवं...नीळ...ह्या जन्मी नाही...नुसती मैत्री...तुमचा संसार...माझा संसार...नको, रागावू नको...मर्यादा आपणच...ठरवायची...नीळ..."

न राहवून नीळकंठ ओरडला,
"मला काही ऐकवू नका. टेप बंद करा. बंद करा."
शंतनुराव धडपडत उठले. त्यांनी टेप बंद केला.
पुन्हा ते वरच्या पट्टीत म्हणाले,
"समजलं आता? ही टेप तुझ्या बायकोनं, माझ्या आईनं, मंदोदरीच्या बहिणींनी किंवा कुणीही ऐकली असती तर तुझा संसार टिकला असता का?–मी राजरोस मोटारीतून पोरी फिरवत होतो. तू काय केलं असतंस? एकाएकी ती वातात बडबडायला लागली. तिचं बोलणं अस्पष्ट असतं तर पर्वा केली नसती. पण सगळं समजत होतं. तेव्हापासून पहाराच केला तिच्यावर. तिसऱ्या चौथ्या दिवशी ते बोलणं टेप करावं असं वाटलं. तेही तुझ्यासाठी. तू किती भ्याड, नामर्द आहेस हे तुला पुराव्यानं पटावं म्हणून– माझ्या मंदाला तू मारलंस."
"शंतनुराव, तुम्ही आजारी आहात म्हणून मी गप्प बसतो. बरे असतात तर..."
"काही केलं नसतंस. तुझी ती हिंमतच नाही. असती तर माझ्या बायकोला असं उपाशी तडफडत ठेवलं नसतंस."
बोलता बोलता शंतनुराव ओक्साबोक्सी रडायला लागला.
रडता रडताच तो म्हणाला,

"निसर्गानं जन्मतःच मला हा शाप दिलेला. प्रतिष्ठेसाठी मी तिचा गळा कापला. तिच्या बापाला पैसा हवा होता, मला 'पुरुष' ही पदवी हवी होती. पण मग कळलं की 'नांदा सौख्यभरे' ही अक्षरं पत्रिकेवर छापल्यानं संसार सुखाचे होत नाहीत आणि 'अष्टपुत्रा भव' म्हटलं पुरुषाचा बाप होत नाही. तरी मी गाढवासारखा वागलो. तिच्यात दोष असल्याचं सर्टिफिकीट मी विकत घेतलं आणि स्वतःभोवती मैत्रिणी गोळा केल्या. ह्या समाजात वाट्टेल त्या मार्गानं हवं ते मिळवणाऱ्यांना न मागता मानमरातबही मिळतो. आणि तुझ्यासारखी भ्याड, नामर्द माणसं ह्या असल्या ठिसूळ समाजाला भितात, आणि उपाशी मरणाऱ्या माणसाकडे, प्रतिष्ठा सांभाळत मेला म्हणून गौरवानं पाहतात."

धाप लागून शंतनुराव थांबले.

नीळकंठला अजून पत्ता लागत नव्हता. जावं की नाही कळत नव्हतं. ती भांबावलेली नजर ओळखून शंतनुराव म्हणाले,

"पापसुद्धा पुण्यासारखं मिरवावं असे काही क्षण असतात. पाहतोस काय ? मी हे केलं हे तुझ्यासाठी मुळीच केलं नाही. माझ्या मंदासाठी केलं. सौख्य न उपभोगता ती बदचाल ठरली असती. जो भोगतो तो बोलत नाही—हे समजणारी किती माणसं तिच्या नात्यात होती ? माझ्याही नव्हती. फक्त मीच ते ओळखलं होतं. जा आता. मला काही सांगायचं नाही, जा."

नीळकंठ दरवाजापाशी आला.

त्या उंच माणसाकडे क्षणभर पाहण्याचा त्याला मोह झाला, म्हणून त्यानं वळून पाहिलं. त्याला शंतनुराव दिसेचनात. ती थंड खोली, सुगंधानं भरलेली हवा, हे सगळं व्यापूनही तो प्रचंड स्वरूपात उरला होता. काही दिसतच नव्हतं.

दिसला तो टेपरेकॉर्डर आणि टीचभर पट्टीत मावणारं स्वतःचं एवढंसं, नगण्य व्यक्तिमत्त्व. पण तरीही त्या टीचभर पट्टीतला तो आवाज फार मोठा होता.

नीळकंठला शंतनुराव दिसत नव्हते, पण शंतनुरावांना त्या टीचभर जिवाच्या

सगळ्या हालचाली कळत होत्या. टेपरेकॉर्डरमधली कॅसेट, हिसक्यासरशी काढून त्यांनी ती नीळकंठच्या अंगावर भिरकावली.

जमिनीवर पायाशी पडलेली ती कॅसेट उचलण्यासाठीसुद्धा लागणारी ताकद नीळकंठकडे नव्हती.

□

# झिटू

जी गोष्ट केल्याबद्दल पश्चात्ताप होत नाही अशी कोणती गोष्ट आहे ?
परमार्थाकडे गेलेला माणूस पटकन् सांगेल, " नामजप."
पैशाच्या मागे लागलेला माणूस सांगेल, " ओव्हरटाईम."
हे दोन्ही शब्द माझ्या तोंडून येणार नाहीत.
एकच गोष्ट अशी आहे, की मला ती केल्याबद्दल अजून पश्चात्ताप झालेला नाही. आणि ती म्हणजे, ' दांडी मारणे! '
आजची दांडी मोजली तर ती चारशे तेरावी दांडी होईल. अर्थात् ही गेल्या वीस वर्षांच्या नोकरीतली साधना आहे. आजची दांडी मात्र माझ्या अंगी लागणार नाही, अशीच चिन्हं दिसत होती.
सकाळपासून दार उघडण्याचं काम किती वेळा करायचं ? बेल् वाजली की हातातलं काम टाकून धावायचं, म्हणजे काय ?
आता मी कामात नव्हतो म्हणून हातातलं काय टाकायचं हा प्रश्न मला नव्हताच. पण पलंगावर लोळता-लोळता, डोळ्याच्या उंबऱ्याशी थांबलेली डुलकी लोटायची आणि दार उघडायचं म्हणजे......

पुन्हा बेल् वाजली.

काहीशा रागानंच उठलो.

दार उघडलं तर समोर एक कुणीतरी.

अवाढव्य वाढलेल्या आणि डोळ्यांवर आलेल्या केसांमुळे त्याचे डोळे मला दिसलेच नाहीत. त्यानं मला कसं पाहृयलं कुणास ठाऊक !

" झिट् आहे का ?"

" इथं झिटू–बिटू कुणी नाही."

" वा, असं कसं होईल ?"

" इथं झिटू नाही."

" तरी त्याला सांगा, मला लगेच भेट."

" कुणाला ?"

" सू. "

" सू कोण ?"

" ते त्याला माहीत आहे."

" ते मलाही समजायला हवं. मी कोण आहे माहीत आहे ?"

" शुअरली ! "

" कोण ?"

" झिटूचे डॅडी. '

" मला डॅडी म्हटलेलं आवडत नाही. "

–मी जरा दरडावल्यावर त्या व्यक्तीनं मानेला हिसडा दिला. डोळ्यांवरचे केस मागे गेले आणि मग मला कळलं की त्या केसांच्या आत गॉगलही होता.

" तेही मला माहीत आहे. झिटू सांगत होता."

" काय ?"

" डॅडी हे नाव रुबाबदार बापांसाठी असतं. आमच्या बापाचं पोट सुटलंय्. आणि डोक्याला टक्कल..."

मी मधेच दार लावलं.

हे ऐकायला मी दांडी मारली होती काय ? चिरंजिवांना सुनवतोच आज.

तेवढ्यात बाईसाहेब बाहेर आल्या.

" कोण होतं हो ?"
" माहीत नाही."
" तुम्ही नाव नाही का विचारलंत ?"
" नाही."
" का ?"
" त्या व्यक्तीचा अवतार पाहून विचारावं असं वाटलं नाही."
" काय काम होतं ?"
" झिंटूला सांगा 'सू' ला भेट."
बाईसाहेब घाईघाईनं म्हणाल्या,
" सू कोण, लगेच विचारायचं."
" विचारलं."
" मग ?"
" माझी 'क्रॉस' घेऊ नको. स्वत: दार उघडायला का नाही आलीस ?"
" तुम्ही घरात आहात म्हणून."
" मी दारं उघडण्यासाठी दांडी मारली ? '
" समजलं, रोज माझं काय होत असेल ते ?–सारख्या अभयच्या मैत्रिणी कोसळत असतात."
" मला एकदा नावं दे सगळ्यांची आणि त्यांच्या घरचे पत्ते दे. सगळ्या पालकांना पत्रं टाकतो."
" पत्रं ? पत्रकं म्हणा, पत्रकं."
" काय सांगतेस काय ?"
" सू नावाच्याच पाच मैत्रिणी आहेत अभयच्या. सुचेता, सुजाता, सुलोचना; सुमन, सुचित्रा. आत्ता कोणती आली होती ह्यातली ?"
कपाळावर हात मारून घेत मी विचारलं,
" ती मुलगी होती ?"
" मग ? अभयकडे मुलगा कशाला येईल ?"
–मी सुन्न झालो.
बाईसाहेब तावातावानं म्हणाल्या,
" मुलांकडे तुमचं अजिबात लक्ष नाही."

" मी आता ऑफिस बंद करून त्यांच्यामागे फिरत राहतो."
" फिरायला कशाला हवं ? धाक हवा."
" म्हणजे नक्की काय हवं ?"
" जे तुमच्यात नाही, ते हवंय्. समजलं ?"
–मी आणखीन काही बोलणार तोच दार वाजल. अभयनं लॅच् कीनं दरवाजा उघडल्याचं आम्ही ओळखलं आणि गप्प बसलो.
" माझ्याकडे कुणी आलं होतं ?"
" म्हणजे एखादी पोरगीच ना ?"
" तसं नाही की डॅडी ! मला फार कंटाळा आला म्हणजे चेंज म्हणून मी मित्रांना पण आणतो."
" अभय..."
मी ओरडल्यावर तो आईकडे वळला.
" ममी, कुणी आलं होतं ?"
" सू."
" कोणती सू ?"
" त्यांना विचार."
" डॅडी, कोणती सू ?"
" पत्ता लागला नाही."
" म्हणजे काय ?"
" तिचे डोळेसुद्धा मला दिसले नाहीत. हे एवढे केस."
" हात्तिच्या, पटकन दोन्ही हातांनी ते बाजूला करायचे."
" काय ?" मी किंचाळलो.
अभय निर्विकारपणे म्हणाला,
" सू तशीच आहे. ती मुद्दामच केस तसे ठेवते. आम्ही मग ते मागे करतो."
" आम्ही म्हणजे ?"
" समोर जो असेल तो ! कधीकधी मी, कधीकधी शिगटचा, तर कधी कोक्या..."
" कोक्या ?"
" कोक्या म्हणजे किरण हो !"

"अरे मग किरण नाव वाईट आहे का ?"

"ते राहू दे हो! तू काय म्हणाली ?"

तेवढ्यात पुन: बेल वाजली. अभय धावला. मी मागेच राहुचलो.

दार उघडल्याबरोबर, शंटिंगचं इंजिन असं केव्हा केव्हा कारण नसताना किंचाळतं, तसा आवाज आला.

"झि ऽऽऽ टू ?– आलास ?"

"आत्ताच आलो. तू इथं बसली का नाहीस ?"

"अरे माझी अगदी भेंडी करून टाकली रे ?"

"कुणी ?"

"तुझ्या डॅडींनी ! काय लाज आणली रे त्यांनी..."

मी हाताच्या मुठी वळल्या.

बाईसाहेबांनी मला आवरलं.

पुन: त्यांचा संवाद सुरू झाला.

"लाज आणली म्हणजे काय केलं ?"

"अंगात शर्ट नसतानाच दार उघडलं त्यांनी. पायजम्याची नाडी लोंबत होती तीसुद्धा त्यांनी खोचली नाही."

"डॅडी म्हणजे..."

"झिटू, You should never call him daddy."

"मग काय म्हणू ?"

"तात्या म्हण."

मी रागारागानं बाहेर येणार तो पुन: बेल. दार उघडलं गेलं आणि चार-पाच आवाज कानावर आले.

"हाय्... हा ऽऽय्. क ऽऽ ड ऽऽ क–"

बाईसाहेबांनी मला आत खेचून नेलं. ती म्हणाली,

"आता त्यांच्या नुसत्या गप्पा ऐका."

तोपर्यंत त्या सुरूच झाल्या. मी बाहेरच्या खोलीत जायला निघालो.

"कुठं निघालात ?"

"एकदम तिथं जातो आणि त्यांच्याच भाषेत सांगायचं झालं तर त्यांच्या

गप्पांचा ‘ पचका ’ करतो. ”
“ त्यांनी केलेले कॉमेंट्स नंतर ऐकत बसावं लागेल. ”
“ फायर करीन एकेकाला. ”
“ मुळीच गरज नाही. मुलं उगीच बोलत नाहीत. ”
आमच्या बाईसाहेबांचं हे नेहमीचं धोरण. मी मुलांच्या विरुद्ध बोललो की तिनं बाजू घेतलीच. मग मी चिडलो.
“ उगीच काय... ”
“ ओरडू नका. लेंग्याची नाडी आत्ताही लोंबतेय्. ”
तेवढ्यात बाहेर त्या पोरांनी टाळ्या दिल्या आणि पुन्हा शंटिंगचं इंजिन कोकललं.
मी दाराजवळ लपून राहूयलो. शब्द न् शब्द ऐकू येऊ लागला.
“ बरं का कोक्या, मी परवा सगळ्यांचा पचका केला. ”
“ काय केलंस् ?”
“ जपानी पद्धतीनं शिवलेला माझा चायनीज् ड्रेस घालून मी पार्टीला गेले. ” सू म्हणाली.
“ बरं मग ?”
“ तो फ्रॉक सगळा बटणांचा बनवलाय्. मी चॅलेंज दिला, ह्यातली दाखवायची बटणं कोणती आणि सोडायची कोणती हे ओळखून दाखवा. ”
“ आयला; सॉलीड आयडिया ! ”
“ पंचवीस रुपयांची पैज लावली, पण सगळ्यांची भेंडी करून टाकली. मग टोणग्या काय म्हणतो माहीत आहे ?—लांबून काय कळणार ?—मी मग त्याची दांडी गुल केली. मी सांगितलं, चल हात लावून बघ. ”
“ आयला... ग्रेट! ”
“ हात लावून शोध म्हटल्यावर, सगळ्यांनी लाजच आणली. सगळेच शोधायला लागले. ”
“ मार्व्हलस् ! ” आमचा वंशाचा दिवा फडफडला.
“ आयला, पुढे ?”
“ सगळ्यांचा पचका ! ”
“ कसा काय ?”

वा. क्र. २०५८८

"अरे सोडायची बटणं नव्हतीच फ्रॉकला. सूममधे एकेकाला घुमवला. प्रत्येकाकडून मग वीस-पंचवीस घेतले. फ्रॉकला 'झिप्' होती. सव्वाशे रुपये मिळाले."
"किती ?"
"एकशेपंचवीस."
"Then you have to celebrate"
"कंडा आयडिया ! चल साले, पिक्चर काढ."
"शोले... शो ऽ ऽ ऽ ले, शो ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ले." कुणीतरी जाहिरातीसारखं किंचाळलं.

"चला आत्ताचाच 'शो' पाहू या."
"कोक्या, तू हा सिनेमा किती वेळा पाहणार ?"
"एस्. एच्. ओ. एल्. ए. वाय्–म्हणजे सहा वेळा कमीत कमी."
"तू अगदी गवार आहेस."
"सू, This is nothing. अग स्पेलिंगच्या संख्येप्रमाणे त्यानं 'चिराग कहाँ, रोशनी कहाँ' तेवीस वेळा पाहचला."
"उगीच तुला आम्ही कोक्या म्हणत नाही. समोर चित्रं दिसली की झालं. तू कोक्या म्हणजे फक्त कोक्या."
"आयला ! अग माझे डॅडी मघाशी..."
"झिटू, please daddy म्हणायचं नाही. तात्या."
"ऑलराईट, तात्या तर तात्या– काय तडतडले, म्हणजे..."
"का, तडतडले का ?"
"मला म्हणाले, कोक्या काय ? किरण नाव वाईट आहे काय ?"
"ए. you are just wasting time हं ! शोलेचं काय ?"
"चला !"

आमची परवानगी गृहीत धरून झिटू म्हणाला,
"ममी, मी जाऊन येतो. वाट पाहू नका. बाहेरच जेवू आम्ही. सू ला कापायची आहे."

सगळे गेले, घर शांत झालं.
" मला आधी पाणी आण. "
" आणते. "
" फ्रीजमधल्या सगळ्या बाटल्या आण. "
" कशाला ? "
" ह्यातली एक पितो आणि बाकीच्या सगळ्या डोक्यावर ओतून घेतो. "
एक बाटली खरोखरच मी संपवली आणि मग मात्र एकदम गंभीर झालो. अस्वस्थ झालो. खरोखरच ह्या मुलांचं काय होणार ह्या विचारानं माझी घालमेल व्हायला लागली. माझा एकूण नूर पाहून ती पण गंभीर झाली.
" आज तुम्ही घरी होतात म्हणून तुम्ही सगळं पाहृथलंत तरी!"
" मला इतकी कल्पना नव्हती. "
अस्वस्थ होऊन मी गॅलरीत आलो. आणि एक निराळाच विचार मनात येऊन, मी बाईसाहेबांना बोलावून विचारलं.
" सध्या गोखले फॅमिली कुठे आहे ? "
" इथंच आहे की ! आमंत्रणं करून थकले ते. "
" आता जायला हवं. "
" मध्येच त्यांची आठवण कशी झाली ? "
" त्यांची मुलगी आता कॉलेजला असेल ना ? "
" असणारच ! अभयपेक्षा ती फक्त पंधरा दिवसांनी मोठी आहे."
" पंधरा दिवसांनी मोठी ? "
" बरोब्बर पंधरा दिवसांनी. मला ज्या दिवशी त्रास व्हायला लागला त्याच दिवशी त्यांच्याकडचं बारशाचं आमंत्रण होतं. "
" मग पंधरा दिवस कसे ? "
" तुम्हाला काही आठवत नाही. मी गेले आणि दुसऱ्या दिवशी पुन्हा घरी आले. "
" असं ? "
" मग ? डॉक्टर म्हणाले, 'अजून सात-आठ दिवस सहज जातील.' तारीखही पुढचीच होती. "

" मग पुन्हा केव्हा गेलीस ? "

" मधे एकच दिवस गेला आणि जावंच लागलं. "

मी म्हणालो,

" आत्ता लक्षात आलं. "

" काय ? "

" चिरंजीव पहिल्यापासूनच बेभरवशाचे. "

" ते असू दे ! गोखल्यांचं काय ? "

" आता काही नाही. "

त्यानंतरच्या रविवारी, सकाळीच मी बाहेर पडलो. बसस्टॉपकडे जात असंताना, समोरून येणाऱ्या एका मुलीनं माझं लक्ष वेधून घेतलं. अठरा-एकोणीस वर्षांची जसावी. बोलके डोळे, चपळ चालणं. हसतमुख चेहरा. बांधा तर असा की पाटणकरांच्या शायरीतली एक ओळ पटकन आठवली.

' चालता नागीन वाटे, आता उभ्याने चालते. '

तिनं मला नमस्कार केला. मग मात्र मी विचारात पडलो. ती हसली. मग मी थांबलो. माझ्या चेहऱ्यावरचे भाव पाहून ती म्हणाली,

" तुम्ही अभयचे वडील ना ? "

अनवधानानं मी म्हणालो, ' नाही. मी झिटू... "

" तुम्ही पण त्याला झिटूच म्हणता ? "

मग मी सावरीत म्हणालो,

" खर सांगू , अभयचे मित्र आणि मैत्रिणी आणि त्याहीपेक्षा खरं बोलायचं म्हणजे, इष्टमित्र आणि अनिष्टमैत्रिणी... "

ती छान हसली. मला हुरूप आला.

" त्या द्वाड पोरट्यापायी हे नाव तोंडात आलं. "

" मला अभय नाव फार आवडतं. "

" असं ? "

" खरं तर सगळ्याच पुरुषांचं नाव अभय ठवायला हवं. "

" म्हणजे काय होईल "

" नावासारखं वागावं असं त्यांना वाटेल."

" आमचे चिरंजीव तसेच आहेत."

" असं ?"

" हो! निर्भयतेनं कोणत्याही मैत्रिणीला घरी आणतो. फक्त परीक्षेला भितो. उलट व्हायला हवं होतं. पण..."

थोडचा नाखुषीच्या स्वरात ती म्हणाली,

" तुमचा अभयवर राग का ? तो चांगला आहे."

" चांगला आहे म्हणूनच जास्त अपेक्षा आहेत. जाऊ दे ! तुमचं नाव ?"

" अय्या ! मला अहो काय म्हणताय ? मी अभयच्याच वर्गात आहे."

" अरे, मग एकदा या ना!"

" पाहा, तुम्ही पुन्हा..."

" बरं, कधी येशील ?"

" पुढच्या आठवडचात येईन. पण जमलं नाही तर रागवू नका."

" म्हणजे काय ?"

" स्कॉलरशिप टिकवून काहीही कर, अशी घरची ऑर्डर आहे."

" मग काय आग्रह नाही करत, पण येत जा."

" नक्की ! अच्छा, जाऊ ? अभयला सांगा भेटले होते म्हणून."

" अभयनं विचारलं तर कोण भेटलं म्हणून सांगू ?"

" अय्या ! मी नाव नाहीच सांगितलं. मी अलका सोहनी."

" ऑलराईट !"

तिच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहत मी म्हणालो, 'पोरगी अशी हवी!"

दोन-चार दिवसानंतर रात्री झोपता-झोपता बाईसाहेबांनी विचारलं,

" परवा कोण भेटलं होतं हो ?"

" कधी ?"

" अभयच्या वर्गातलं–"

" अलका सोहनी. काय मुलगी आहे म्हणून सांगू ! अभयला म्हणावं, मैत्री जोडावी तर अशा मुलीशी !"

" तुम्हाला ती बरीच आवडली म्हणे ?"

" म्हणे म्हणजे काय ? सरळ बोल की ! 'तुका म्हणे' च्या पद्धतीवर काय बोलतेस ?"

" तुम्ही बऱ्याच गप्पा मारल्यात. "
" कोण म्हणतं ?"
" ज्याचं लक्ष होतं ते. "
" सरळ बोलायचं असलं तर बोल. "
" तुम्हाला पोरांच्या भाषेत सांगू का ?"
" पोरं म्हणजे ती सू, नू, मू हीच ना ? "
" तीच! ती अभयला म्हणाली, तुझ्या वडिलांना तात्या म्हणू नकोस, डॅडीच म्हण. "
बाईसाहेबांनी हे सांगताच मी आताही लेंग्याची नाडी नीट आहे ना पाहिलं.
" का, डॅडी का ? "
" सांगते ना ! सू म्हणाली, झिटच्या, तुझे डॅडी त्या अलकाबरोबर पंधरा मिनिटं गूळ काढीत उभे होते. "
त्या सूच्या नाकातून 'सूं, सूं' आवाज होईतो बर्फाच्या लादीवर तिला झोपवावी असं मला वाटलं. मनातला प्लॅन बायकोला सांगावा तर ती कोणत्या अर्थानं कोणती गोष्ट घेईल ह्याची गॅरंटी नाही.
केव्हा केव्हा इतकं ऐकते की 'पति हाचि देव ललनांना' हे कोणत्या तरी नाटकातलं गाणं हिच्यावरूनच लिहिल्यासारखं वाटावं, तर कधीकधी ह्याच्या उलट परिस्थिती. काय करू ?
अभयला कसं वाचवू ?
कुणाकुणापासून वाचवू ?
" ही मुलं एवढी पुढे कशी गेली ?
बोटातली आंगठी बोटातल्या बोटात फिरवीत मी विचार करीत पडून राहिलो. ही अंगठी जादूची हवी होती. मी ती घातली असती. त्यातून मग एक राक्षस आला असता. हात जोडून उभा राहिला असता. मग कोणताही प्रॉब्लेम त्यानं चुटकीसरशी सोडवला असता. ह्या विचारासरशी उगीचच चाळा म्हणून मी हातातली अंगठी पलंगावर घासली.
आणि काय चमत्कार सांगावा ?

पलंगाशेजारी एक आवाढव्य पण गुलामासारखा राक्षस उभा.

" आज्ञा व्हावी,"
" अभयचं रक्षण करायचं आहे."
" कुणापासून ?"
" तेच नेमकं कळत नाही."
" मी दाखवू ?"
" जरूर."
" लक्षात ठेव. तुझ्या अभयला शत्रू खूप आहेत. त्यातले काही अजिंक्य आहेत."
" तुलासुद्धा ?"
" मलासुद्धा."
" बरं, दाखव तर खरं."
" चल माझ्याबरोबर."

राक्षसाचं बोट धरून बाहेर पडलो, कुणालाही न सांगता. बाहेर पडल्याबरोबर राक्षस म्हणाला,
" आता माझ्या खांद्यावर बस, म्हणजे तूही अदृश्य होशील आणि आपल्याला आकाशमार्गानं जाता येईल."
त्याच्या खांद्यावर बसताच त्यानं उड्डाण केलं. उडता-उडता तो बोलत होता.
" आपण प्रथम अभयच्या कॉलेजात जाऊ."
राक्षस मला थेट वर्गात घेऊन गेला. जत्रा भरावी तसा वर्ग भरला होता. प्राध्यापक निर्विकार चेहऱ्यानं भराभर बोलत सुटले होते. किल्ली संपेतो ते बोलणार होते. काही ऐकत होते, काही तसं दाखवत होते. मागच्या बाकापर्यंत त्यांचा आवाज पोहोचतही नव्हता. तिथं काही पोरं डिटेक्टिव्ह कादंबऱ्या वाचत होती. काही पत्रं लिहीत होती. तर एक-दोन पोरं चक्क झोपली होती. प्राध्यापक आणि विद्यार्थी ह्यांच्यात काही नातंच निर्माण झालेलं नव्हतं. मी फार अस्वस्थ झालो.
तिथून राक्षसानं मला कोणत्या तरी थिएटरमधे नेलं. हाताची तर्जनी वहीत मध्यभागी ठेवून वह्या गोल गोल फिरवीत शेकडो मुलं रांगेत उभी होती. सर्व कॉलेजला दांड्या मारून आली होती.
आत जो 'शो' चालू होता त्या 'शो'ची बाल्कनीही पोरांनीच भरली

होती. मुलगा–मुलगी ह्यासारख्या क्षुल्लक भेदभाव तिथं नव्हताच. हातात हात गुंफलेले होते. क्वचित् ह्याही पुढचे खेळ तिथं आपपरभाव न मानता चालले होते.

पडद्यावर तर विचारायला नको, असे देखावे होते. सूर होते असेच असूरही. रंग होते आणि कापडाचं रेशनिंग होतं. जे काही तोडकेमोडके कपडे अंगावर होते तेही काढण्याची तिथं तयारी आणि शर्यत होती. मला हिरॉइनच्या जागी तिथं जपानी पद्धतीने शिवलेला चायनीज ड्रेस घालून आलेली 'सू' दिसली. आणि बटणं शोधायच्या निमित्तानं अंगाला झोंबणारी अभयची हिरोच्या जागी दिसली.

राक्षस मला बाहेर घेऊन आला तर समोर सुमारे पाचशे लोक इंपोर्टेड कापडाचे सूट घालून उभे.

"हे कोण ?"

"राक्षस म्हणाला, 'हे प्रोडयूसर्स, फायनान्सर्स आणि डिस्ट्रिब्यूटर्स"

"ह्या सगळ्यांचे चेहरे एवढे हुबेहूब एकच कसे ?"

"एकाचसारखे चित्रपट काढून काढून ते तसे झाले आहेत. शेळपट हिरो आणि तरीही त्यांच्यावर फिदा होणाऱ्या सुंदर पोरी... ह्यांची पैदास ह्यांनी केली. तुला ह्यांच्याशी लढायचं आहे."

तिथून आम्ही एका हॉटेलात गेलो. हॉटेलच्या आतल्या भागात परमिट रूम होती, तिथंही दोन-चार विद्यार्थी होतेच.

तिथून राक्षसानं मला एका डिपार्टमेंटल स्टोअरमध्ये नेलं ट्रॅन्झिस्टर्स, टेप-रेकॉर्डर्स, रेकॉर्ड, चेंजर्स, स्टिरियोफोनिक स्पीकर्स, ॲम्प्लिफायर्स आणि टेलि-व्हिजन्स–ह्या सर्वांकडे बोट करीत राक्षस म्हणाला,

"तुला ह्यांच्याशी पण युद्ध करायचं आहे."

"ह्यांनी काय केलं ?"

"आवाज वाढवले, आतला आवाज मारला."

"कसा ?"

"दोष यंत्राचा नाही. माणसांचाच आहे. टेपरेकॉर्डरचा उपयोग एका तरी मुलानं लेक्चर्स, चांगली भाषणं, उत्तम वैचारिक काव्यं टेप करण्यासाठी केला का ? जे थिएटरात तेच घरात ! हम तुम एक कमरेमे बंद...."

"खरं आहे."
" आणि टी. व्ही. नंतर घराघराची थिएटर्स बनवली." राक्षस चिडून म्हणाला.
मी हसलो.
दुकानातून बाहेर पडताना राक्षस म्हणाला,
" हे उघड उघड दाखवता येणारे शत्रू ! त्यानंतर, सध्याच्या परिस्थितीत ज्यांची नावं घेता येणार नाहीत असे शत्रू अनेक आहेत. त्यांच्याबद्दल मी बोलत नाही."
मी म्हणालो,
" तू कुणाबद्दल बोलतोस ते कळलं. तेच खरं तर जबाबदार आहेत."
" त्यांच्याशी पण लढावं लागेल. ही सगळी एका बाजूला आणि एका बाजूला अभय आणि तू."
दरदरून घाम येऊन मी जागा झालो.

त्यानंतर चार-पाच दिवसांनी म्हणजे पुन्हा एका रविवारीच मला अलका दिसली.
मी तिला खूप आग्रह करून माझ्याबरोबर घरी घेऊन आलो.
अभय काहीतरी करीत होता. त्याला मी बाहेरच्या खोलीत बोलावलं.
" तू होय ?"
" हो, चालेल ना ह्यावेळी आलं तर ?"
" हो, त्यात काय ?"
मी अलकाला म्हणालो,
" मी आता माझं काम करून येतो. तू बस. चालेल ना ?"
" हात्तिच्या ! चालेल ना ! अभय आहेच की ! बोलशील ना रे ?"
तिनं निर्व्याज स्वरात विचारलं.
" आयला, आपलं काय भांडण झालंय न बोलायला ? झपसटच आहेस."
कमीत कमी ह्या मुलीशी तरी ह्या भाषेत बोललं जाऊ नये असं मला वाटून गेलं. पण मी तसं न दर्शवता बाहेर पडलो.

बरोबर अर्ध्या तासात मी परतलो तर बाहेरूनच मला मोठमोठ्या आवाजात

म्हटलेली गाणी ऐकू आली. झिटूचा आवाज सर्वांत मोठा होता.
ही अलका पण अशीच ? असा विचार करीत मी बेल वाजवली.
बाईसहेबांनी दार उघडलं.
दार उघडल्याबरोबर गाण्याचा आवाज वाढला.
" बाराखड्या आल्या वाटतं सगळ्या !"
" कोण ? "
" म्हणजे सू, नू, मू... "
" आणि कोक्यासुद्धा.' बाईंनी यादी पुरी केली.
" अलका पण आहे का आत ? "
" छे ! ती कधीच गेली. "
" गेली ? "
" मग ! त्या धांगडधिंग्यात ती कशी रमणार ? ती जाते म्हणाली. चिरंजीव ऑलराईट म्हणाले. "
वाईट वाटून घेऊन फायदा नव्हता तरी वाईट वाटलं.

अभयबद्दलचे विचार डोक्यात असतानाच एके दिवशी एक पत्र आलं.
केळकर नावाच्या गृहस्थानं, सव्वीस वर्षांनंतर पत्र पाठवलं होतं.
त्यानं कळवलं होतं,
" आपण वर्गबंधू. पण मॅट्रिकनंतर भेट नाही, बहुतेक सर्व मित्रांबद्दल हे असंच झालं आहे. मरेपर्यंत मैत्री सोडायची नाही, अशी आपण त्या वयात वचनं दिली-घेतली होती. मोठ्या मिनतवारीनं मी मिळतील तेवढ्यांचे पत्ते मिळवून माजी विद्यार्थ्यांचा मेळावा जमवीत आहे. तेव्हा अवश्य यायला हवं. "
मी बाईसाहेबांना सांगितलं,
" काय वाटेल ते करून आपण जायचंच बरं का !"
" तुमचे क्लासमेट्स-मी येऊन काय करू ? "
" स्वत:च्याच मित्रांच्या ओळखी पुन्हा करून घ्याव्या लागतील, इतका काळ मधे गेलाय. "
" मग जाऊच नका. "
" स्वत:साठी जायचंच नाही. मी फक्त अभयचा विचार करतोय. मुद्दाम

ओळखी करून घेणार आहे. त्यांच्यापैकी कुणाचीही पोरगी घरात आली तर मला काही वाटणार नाही. गोखल्यांची आठवण एवढ्याचसाठी झाली होती. आणि अलकाची ओळख पण त्याचसाठी वाढवायची होती. "

आणि ह्याच उद्देशानं गेलो आणि मी भूतकाळात हरवलो. चाळीस-पंचेचाळीस मित्रांपैकी फक्त सोळा मित्र येऊ शकले. केतकर डॉक्टर झाला होता. वाईकरचं स्वतःचं ऑफिस होतं बापट प्राध्यापिका झाली होती. सावरकरच्या फॉरीनच्या वाऱ्या झाल्या होत्या. देशमुख मात्र जसा होता तसाच राहचला होता. तो सचिवालयात हेडक्लार्क होता.

मी आवर्जून सगळ्यांचे पत्ते घेतले. कुणाकुणाला मुली किती हे विचारून घेतलं.

आमचं चहापाणी झालं. परस्पर ओळखींचा–ओळखींचा म्हणण्यापेक्षा, गेल्या सव्वीस वर्षांतली प्रगती सांगण्याचा कार्यक्रम चालू असताना एक काळी, जाडजूड बाई एका अतिशय हँडसम पुरुषाबरोबर आली. ही यमुना तर नव्हे ?

होय, यमुना कार्लेकरच ही !

तिनंही मला ओळखलं. वर्गात असताना तिच्या रूपामुळे आणि राहणीमुळे तिच्याशी फारसं कुणी बोलत नसे. आता तिच्या अतिसामान्य व्यक्तिमत्वात अवाढव्य स्थूलपणाची भर पडली होती.

आणि हिला एवढा रुबाबदार नवरा भेटावा ?

मी तिला खूण करताच ती माझ्या शेजारीच येऊन बसली. मी माझ्या बायकोची आणि तिनं तिच्या यजमानांची ओळख करून दिली.

" तुझी मला सगळी हकीकत सांग. "

" सगळ्यांना एकदम सांगते. "

यमुनानं मोकळेपणानं आम्हा सगळ्यांना तिची माहिती सांगितली. तिच्या छोट्या भाषणानं तिनं सर्वांना जिंकलं. ती म्हणाली,

" मी इथं पाऊल टाकताच सर्वांनी मला ओळखलं असणार ह्यात शंका नाही. जशा अप्सरा लक्षात राहतात तशाच माझ्यासारख्या मुलीसुद्धा. मी पूर्वाश्रमीची यमुना कार्लेकर. माझं आत्ताचं आडनाव पोतनीस. यमुना नाव मला शोभत म्हणून ते बदललेलं नाही. तेव्हा शोभत होतंच आणि आता

तर मी, पावसाळ्यात त्या यमुनेचं पात्र जसं विशाल दिसतं तशीच झाले आहे म्हणून आता जास्त शोभतं. माझ्या अंगावरची साडी मला मुळीच शोभत नाही, पण कोणतीही साडी नेसली तरी तोच कॉमेंट येणार आणि काहीतरी नेसायला हे हवंच. असो ! माझे मिस्टर इथं बिझिनेस करतात. ते फार गुणी आहेत. त्यांनी मला पसंत केली म्हणून मी हे म्हणत नाही. एवढ्या रुबाबदार माणसानं मला कसं पसंत केलं असं विचाराल तर सांगते, जातीच्या सुंदरांना काहीही शोभतं. माझ्यासारखी पत्नीसुद्धा !"

टाळ्यांच्या गजरात ती हसत-हसत खाली उतरली. तिचा चातुर्यावर मी खूष झालो.

" सुरेख बोललीस, पण सगळी माहिती सांगितली नाहीस."

" सगळी म्हणजे..."

" मुलं ... बाळं... "

" तीनही मुलीच आहेत आणि आश्चर्य म्हणजे सगळया ह्यांच्यासारख्या देखण्या आहेत."

मुली म्हटल्यावर मी कान टवकारले.

" एकदा आलं पाहुचजे."

" जरूर ये, ऑफिसात फोन करून कळव."

" नोकरी पण करतेस ? "

" होय, सचिवालयात आहे."

" माझं ऑफिस फाऊण्टनजवळ आहे."

" मग ऑफिसातच ये."

आम्ही दिवस ठरवला.

हॉटेल ठरवलं.

" ह्या पुढच्या पिढीला कुणाबद्दल आदर नाही. कॉलेज आणि शिक्षणाचा खेळखंडोबा ह्यावर मी बोलत नाही. पण हे सिनेमे हे तर विष आहे विष!"

मी तावातावानं बोलत होतो. यमुना शांतपणे ऐकत होती.

" यमुना, पूर्वी आईवडील आधी सिनेमे बघत आणि मग मुलांना पाहण्यासारखा आहे की नाही हे सांगत आता मुलं अगोदर पाहतात आणि आई-

वडिलांना दाखवण्यासारखा आहे की नाही हे सांगतात."
"तू एवढा निराश का होतोस ?"
"माझं पोरगं फार गोड आहे ग! तो खूप कुणीतरी मोठा व्हावा, चांगला व्हावा ह्यासाठी मी मासळीसारखा तडफडतोय. पण त्याच्या अहोरात्र टी. व्ही. नटनट्या, सिनेमे ह्याच्या गप्पा, भटकणं आणि मैत्रिणी ह्यापायी हैराण झालोय, त्याची नुसती भाषा ऐक एकदा!"
"अरे पण..."
"आणि मैत्रिणी तर अशा आहेत, त्यांच्या पालकांना मुलीचं वागणं कसं टॉलरेट होतं ? सून व्हायच्या लायकीची एकही नाही. कमीत कमी त्याचा चॉईस् उच्च हवा. यमुना, I want your help in this matter."
"काय करू सांग."
"मला चार-पाच चांगल्या घराण्यातल्या मुलींची ओळख करून दे. त्यांचा सहवास..."
"थोडक्यात म्हणजे कंट्री पिऊ नकोस, भारी पी..."
"तसंच! कारण हा आयुष्याला आलेला विलक्षण वेग मी थोपवू शकत नाही."
"आता खरं बोललास."
"मला ते समजतंय ग, आणि तरीही मी गोंधळलोय. आम्ही आमच्या लहानपणी आईवडिलांपासून जेवढी दूर नव्हती तेवढी ही पिढी आत्ताच दूर गेलीय असं वाटतं."
ह्यावर यमुना म्हणाली,
"हे खरं आहे. आपली पिढी, पिढीच वाटत नाही. माझं सांगते, माझ्या लहानपणी मी आईवडिलांच्या गाद्या घातल्या आणि आता मुलींच्या घालते. आपली पिढी गाद्या घालणाऱ्यांचीच."
"माझी ह्यालाही हरकत नाही. त्यांनी फक्त प्रगती दाखवावी, अभिरुची वाढवावी."
आणि तेवढ्यात अचानक समोर झिटू. मागे त्या सगळ्या बाराखड्या, शिवाय कोक्या.
मी मग सगळ्यांची ओळख करून दिली. सगळे आमच्या देखत फॅमिली रूममधे गेले.

ह्यानंतर दोन दिवसांनंतरची गोष्ट.

कामावरून येऊन मी विश्रांती घेत पडलो होतो. तेवढ्यात दार लोटून अभय आला. त्याच्याबरोबर एक चाळीस-बेचाळीस वर्षांची बाई होती. चाळीशीतदेखील सौंदर्य कसं टिकवावं, हे कोणत्याही ब्यूटी पार्लरमधे न जाता प्रत्येकीनं हिच्याकडे शिकावं, असा विचार मनात येऊन गेला.

" डॅडी, ही सूची आई."

" या बसा ना !"

तेवढ्यात चिरंजिवांचा एक मित्र आला. दोघं आतल्या खोलीत गेली.

आता, ह्या सूच्या आईशी मी काय बोलणार ? बरं, आज ही का आली ? चिरंजिवांनी काही मामला वाढवला नाही ना ?

सूची आई म्हणजे पंचकन्यांपैकी कुठल्या ' सू ' ची ही आई ?

हे सगळं विचारण्यासाठी मी चिरंजिवांच्या खोलीकडे निघालो आणि दाराशीच थांबलो.

चिरंजीव सांगत होते,

" आयला ! परवा आमच्या डॅडींनी लाजच आणली रे !"

" काय केलं ?"

" हॉटेलात एका हॉरिबल, टेरिफिक बोअर बाईला घेऊन बसले होते. बरं फॅमिली रूममधे तरी बसायचं. तेही नाही."

" सू म्हणते ते बरोबर आहे. ते तात्याच आहेत."

" माझा साला भेजाच त्या दिवसापासून आऊट झालाय. साला, माणसाला काही चांगला चॉईस हवा की नको ? मला डॅडींची कीव आली, म्हणून आज एक गुगली टाकलाय डॅडींवर."

" साला सरस ! बापावर गुगली ? ग्रेट ! काय केलंस ?"

" मुद्दाम सू च्या आईला घेऊन आलो. ती सू सारखीच सोशल आहे. I want to teaeh daddy. त्यांनी अशा बायकांशी फ्रेंडशिप करावी. आईला तेवढ्यासाठी दुपारच्या सिनेमाला फुटवली.'' झिटू म्हणाला.

दोन थेंब जमिनीवर टाकून, चिकटवून उभ्या केलेल्या मेणबत्तीसारखा मी उभा राहृयलो. पाय चिकटलेले आणि डोकं पेटलेलं. झिटूला मित्रानं विचारलं,

" What is our plan ?"

" आपण आता इथून फुटायचं.'

" Daddy needs privacy."

" साला कडक ! "

" सूची आई पुन्हा ह्या घरी कोणत्याही निमित्तानं आली किंवा पुन्हा नाही आली की मी एक ठरवणार."

" काय ?"

" बापाला तात्या म्हणायचं की डॅडी ! "

☐

# अधांतरी

" भूपालची दृष्ट काढलीत की नाही अजून ?" माईंनी खालूनच विचारलं. मी नुसती हसले. त्या न बोलता निघून गेल्या. ही बाई अशी कशी, ह्या अर्थाची त्यांची नजर मला स्पष्टपणे जाणवली.

ही बाई अशी कशी ?

खरंच, मी अशी कशी ?

भूपाल तापानं फणफणला आहे. आठ दिवस झाले, तापाला उतार नाही. आठ दिवसांपूर्वी गॅदरिंगहून जो आलाय त्यावर बाहेर पडलेला नाही. त्याची राजकुमारची भुमिका पाहायला आख्खी कॉलनी लोटली होती. प्रत्येकानं पडदा पडताच सांगितलं,

" भूपालची दृष्ट काढा."

मी नुसती हसले.

मी अशी कशी ?

कशी होते ? कशी झाले ?

" आज अमावास्या आहे. आज पाहायला येऊ नका." असा निरोप जेव्हा

बाबांनी पाठवला तेव्हा मी मुळीच हरकत घेतली नाही. गडबडीत त्यांच्या लक्षात आलं नसेल, तेव्हा कळवलं ते बरं केलं असंच मला वाटलं.

नंतर कळलं, आज अमावस्या आहे हे त्यांना माहीत नव्हतं असं नाही, त्यांनी पुन्हा निरोप पाठवला.

" सगळे दिवस सारखेच असतात, मला नंतर आठ दिवस सवड मिळायची नाही."

" तरीही आज नको. आठ दिवस थांबू." आमचाही दुसरा निरोप गेला.

संध्याकाळी खरा हा भेटण्याचा, म्हणजे पाहण्याचा कार्यक्रम ठरलेला होता. आणि सकाळी ही निरोपानिरोपी झाली. त्यांच्या घरातल्या एकूण एक नातेवाईकांनी माझा फोटो पाहिलेला होता. पसंत केला होता. आता प्रत्यक्ष बघण्या–बोलण्याचा सोहळा व्हायचा होता. आमच्याकडून दुसरा निरोप गेल्यावर त्यांचं दोन शब्दांचं उत्तर आलं, " ठीक आहे."

आता उषाला हे सांगायला हवं. संध्याकाळी ती यायची होती. मला सोबत म्हणून आणि घरात काही मदत करावी म्हणून. घरात सांगून मी बाहेर पडले. ऑफिसची वेळ. तेव्हा बस मिळणं कठीणच. पाऊण तास तपश्चर्या केली तेव्हा मिळाली.

" आगे बढते रहिये "–कंडक्टर बिचारा जीव तोडून ओरडत होता. त्याची कीव आल्याने मी खूप पुढे झाले. खरं तर मला दोन तीन स्टॉप्स नंतर उतरायचं होतं.

एकदा ह्या हातानं वरची कडी पकड. त्या हाताला रग लागली की दुसरा हात...अशी माझी सर्कस चालली होती. आणि कुणीतरी हाक मारली.

" ललिता..."

मी वळून पाहृयलं. कुणीच ओळखीचं नव्हतं.

" हाक मी मारली !" कुणीतरी सांगितलं. मी वळून पाहृयलं.

एक रुबाबदार गृहस्थ उठून उभा राहृयला.

" मी विद्यानंद खेर."

मी पाहतच राहृयले.

" इथं उतरू या का ?"

त्यांनी प्रश्न विचारला आणि माझी संमती गृहित धरून, पाठ वळवून ते

चालायला लागले. कळसूत्री बाहुलीप्रमाणे मीही पाठोपाठ जात राहिले पुढच्याच स्टॉपवर आम्ही दोघं उतरलो.

बस गेली आणि त्यांनी टॅक्सीला हात केला.

"ह्या भागात एकही चांगलं हॉटेल नाही. वरळीला जाऊ या. चालेल ?"

मी मान हलवली.

आम्ही टॅक्सीत बसलो आणि मग मी स्वत:लाच विचारलं, 'तू हे काय करीत आहेस ?'

उत्तर नव्हतंच.

'विद्यानंद खेर' ह्या नावानं अशी काय किमया केली ?–पाहण्याचा सोहळा व्हायचा होता. एखाद्या वेळेस नकारही मिळाला असता. कोणत्याही नाजूक भावनांचा उगम झालेला नव्हता. तरी मी उतरले का ?–टॅक्सीत बसले का ?–मी कोण ? ते कोण ?

निर्माण झालेल्या प्रश्नांची उत्तरं मिळायच्या आतच टॅक्सी क्वॉलिटीसमोर उभी राहिली, आणि ह्या परक्या माणसाबरोबर मी हॉटेलात तरी का जायचं, ह्या नव्या प्रश्नाचं उत्तर न देता मी आत गेले.

आम्ही समोरासमोर बसलो.

त्यांनी त्यांच्या पाकिटातून माझा फोटो काढला. समोर टेबलावर ठेवला. मी हसले. मान आपोआपच खाली गेली.

"अरे वा...!"

मी पटकन् वर पाहयलं.

"आधुनिक जमान्यातल्या मुली इतकं छान लाजू शकतात ?"

तेवढ्यात वेटर आला.

"सॅण्डविचेस् और नेसकॅफे..."

"माझा आज उपवास आहे." मी गडबडीनं म्हणाले.

वेटर थांबला.

त्यांनी पुन्हा अधिकारवाणीनं सांगितलं,

"सॅण्डविचेस और नेसकॅफे."

मी गप्प बसले.

का?

तेवढ्यात ते समोर वाकले आणि अत्यंत मार्दवाने म्हणाले,
" आज अमावास्या. दिवस चांगला नाही ना ?"
थोडा धीर करीत मी विचारलं,
" आमच्या चिठ्ठीचा राग आला ?"
" कशाबद्दल ?"
" ते आपल्याला माहीत आहे."
" राग आला असता तर तुझा फोटो मी परत पाठवला असता आणि ' कर्तव्य नाही' असं छापील उत्तर कळवलं असतं."
" मग ?"
" मला माणसांची मनं दुखवायला आवडत नाही. देवधर्मापेक्षा मी समोरच्या माणसाला जास्त मानतो."
मी पुन्हा धीर केला. नजरेला नजर मिळवली.
" तुला आता हळूहळू माझी मतं, माझे विचार समजणार आहेतच."
लग्न पक्कं ठरल्याचं गृहीत धरून ते बोलत होते. मी त्यांना पसंत असेन. त्यात काय नवल ? नाकारण्यासारखं माझ्याजवळ आहेच काय ?—पण त्यांनी माझा होकार, माझी पसंती गृहीत का धरावी?"
मला नकार द्यायचा असेल तर ?
खरंच.
नकार द्यायचा झाला तर काय सांगता येईल ?
पदवी ?—आहेच.
ऐपत ?— आहेच.
रूप—बांधा चांगला आहे, केसांची वळणं, झुलपं...अगदी राजेश खन्ना, देव आनंद नाही, पण सौंदर्य काय तेवढंच असतं ? प्रत्येकाचं व्यक्तिमत्व निराळं, ठेवण निराळी. छाप पाडण्याइतपत रुबाब असला की आणखीन काय लागतं ?
आवाजही चांगला आहे.
' ललिता ' म्हणून कशी छान हाक मारली ?—वेटरला ऑर्डर दिली ती साहेबासारखी. म्हणजे जरब आहेच आहे, आणि मग हळूच म्हणतात,
" आज अमावास्या. दिवस चांगला नाही ना ?"

छे ! नकार कसा द्यायचा ? का द्यायचा ?

लग्न झालं आणि स्वभाव समजायला लागला.

स्वभावातली झलक तशी पहिल्या भेटीतच दिसली होती. टेबलावर सॅण्डविचेसची बशी आली. त्यांनी ती माझ्यासमोर सरकवली.

" आपण घ्या. माझा मंगळवार आहे."

" माहीत आहे. माझ्यासाठी घे."

" पण..."

" लग्नानंतर आपण अनेकदा असे हॉटेलात जाणार आहोत. खूप मजा करणार आहोत. लाईफ एन्जॉय करणार आहोत. पण प्रत्येक वेळी, पहिल्या-वहिल्या भेटीत, तू उपवास केलास आणि मी एकटयानं खाल्लं, हे आठवत राहील. पहिल्या भेटीची आठवण अशी असावी का ?"

मनातल्या मनात देवीला हात जोडीत मी सॅण्डविच् घेतला. ह्यांच्या चेहऱ्यावर मला समाधान दिसलं. ते 'थँक्स' वगैरे म्हणायच्या भानगडीत पडले नाहीत. तेही मला आवडलं.

ऐकायला लावलंच की नाही ?– असाही भाव नव्हता. होतं फक्त समाधान. ते मला आवडलं.

आणि मग सगळं आवडतच गेलं.

मतभेद होतेच. पण ते आयुष्याकडे पाहण्याचे दृष्टिकोन सर्वस्वी वेगळे होते त्यापायी होते. स्वभावात खडूसपणा नव्हता. गर्व नव्हता. मग मतभेद का ? कशांचे ?

त्यांच्या घरात देव नव्हते. तसबिरी पण नव्हत्या. गणपतीचं एक चित्र होतं. नर्तन करणाऱ्या त्या गणेशाच्या चित्रात एक लय होती, तोल होता, म्हणून ते चित्र तिथं होतं. मला ते काय माहीत ?

मी त्याला हार घातला. तो हार पाहून त्यांनी सांगितलं,

" ललित, ह्या सुंदर चित्राचं दैवत बनवायचं नाही !"

" घरात एकही तसबीर नव्हती, देवघरही नाही. मग काय करू ?"

" देवघर नाही ? नवल आहे. तुला दिसलं नाही ?"

" कुठाय ?" मी विचारलं.

" चल, आत्ता दाखवतो, दिवसभर काय पाहूचलंस मग ?"

कमालीचं आश्चर्य वाटून मी त्यांच्या पाठोपाठ गेले. त्यांनी मला सरळ ब्लॉकच्या बाहेर नेलं. दार लावून घेतलं.

" अहो, लॅच लागेल ना–"

" किल्ली आहे. घाबरू नकोस. बघ आत."

" काय पाहू ?"

" हे विद्यानंद आणि ललितचं घर. हे घर म्हणजेच देवघर." असं म्हणून त्यांनी दार उघडलं. आम्ही आत आलो मग ते पुढे म्हणाले,

" आणि आपण दोघं म्हणजे पुजारी. आता तू विचारशील, 'पूजा कशाची करायची ?' मी सांगेन 'गृहस्थाश्रमाची.' तू विचारशील, 'पूजेला साहित्य कोणतं ?' मी सांगेन, 'पंचेंद्रिये.' तू मग विचारशील, 'नैवेद्य कोणता ?–' मी सांगेन, 'प्रामाणिक कष्ट हाच नैवेद्य.' मग प्रश्न येईल 'आरती'चा. मी सांगेन, 'ह्या देवघरात राहणाऱ्या आणि येणाऱ्या सर्व माणसांबद्दल प्रेम, जिव्हाळा...हीच आरती.' शेवटी प्रश्न येईल 'प्रसादसेवनाचा.' मी सांगेन 'पंचेंद्रियं आणि अवयव प्रामाणिकपणे राबले असतील, तर त्यांच्या आवाक्यात असलेली प्रत्येक गोष्ट 'प्रसाद'च आहे. ह्या भक्तिमार्गात कुपथ्य कोणतं ?– तर जेहत्ते कालाचे ठायी, ललिताबाई, मनाला न पटणारी म्हणजेच प्रतारणा करायला लावणारी कृती हे कुपथ्य. समजी ?"

मी मंत्रमुग्ध झाले होते. बोलत-बोलत मला ते गॅलरीत घेऊन आले. त्याच मार्दवपूर्ण आवाजात ते म्हणाले,

" ललित, माझा देव फार निराळा आहे. तो माझ्यापासून लांब नाही. तो सारखा आसपास असतो. जाता येता दिसतो, तो माझ्यापेक्षा कल्पक आहे. माझ्यापेक्षा रसिक आहे. एकाच रूपात त्यानं स्वतःला अखडून घेतलं नाही."

मी बावचळून ऐकत होते. ते म्हणाले,

" त्याला कधी वाऱ्याची झुळुक व्हावंसं वाटतं, कधी संगीतातली एखादी लकेर व्हावंसं वाटतं. लताच्या आवाजात तो मला सतत गेले अनेक वर्षं भेटतोय्. आता ह्या क्षणी, तुझ्या स्पर्शातून तो मला भेटतोय. काल रात्री तो तुझ्या केसांतल्या मोगऱ्याच्या गजऱ्यात होता, आणि–इथल्या इथं तू आता लाजलीस ना, तिथंही तोच होता."

मी वर पाहिलं आणि पुढच्याच क्षणी त्या देवाला विद्यानंदही होता येतं हे मला समजलं.

"लल्या, ह्या घरात काही अर्थ आहे का ?–अग इथं माणसं राहतात की राक्षस ?"
आई का रागावली होती ते मला समजलं. ती मला तशी सोडणार नव्हती.
"काय ग, देवघर कुठाय् ?"
"अग सांगू का..."
"बोल समजुतीपुरतं."
"सगळं घर आता नवीन करायचं आहे, त्यात देवघराची व्यवस्था करणार आहेत."
"तोपर्यंत त्यांना कुठे गुंडाळून ठेवलं आहेस ?"
"आई आता..."
"काय ग पण लल्या, वीस–वीस वर्षं तुम्ही बापाच्या घरी राहता आणि लग्नानंतर एका रात्री बदलता ? काय म्हणायचं काय ?–बाकी तुला कशाला बोल लावायचा ?–पहिली भेट झाली तीच मुळी अमावास्येला..."
आई बोलत राहचली. मी मग गप्प राहचले. मन कुठेतरी खात होतं.
आईचा तळतळाट खोलवर कुठंतरी अस्वस्थ करीत होता. एक गोष्ट त्यातल्या त्यात बरी होती. विद्यानंद घरात नव्हते.

"काय म्हणते आई ?" विद्यानंदांनी विचारलं.
"देवघराची चौकशी केली."
"काय सांगितलंस ?"
"काय सांगणार ? अतिशय पंचाईत झाली. मग सांगितलं, आता सगळं घर नवं करणार आहोत तेव्हा देवघराची खास व्यवस्था करणार आहोत."
"घरात सुधारणा केल्यानंतर तिनं देवघराचं पुन्हा विचारलं तर ?"
"काहीतरी सुचेलच तेव्हा."
विद्यानंद एकाएकी गंभीर झाले. ते नंतर तासभर काही बोललेच नाहीत. जेवण चुपचाप झालं.

रात्री मी विचारलं,

" रागावलात ?"

" विचारात पडलोय."

" माझ्यामुळेच ना ?"

" होय."

" चुकले मी."

" आज नुसती चुकलीस, नंतर दुःखी होशील. काळजी त्याची वाटते, आणखी कशाची नाही."

" आईचं मन दुखवण्याचं जिवावर आलं म्हणून थाप मारली."

" आईचा विश्वास बसला असेल असं तुला अजून वाटतंय ?"

" पण..."

" ललित, स्वतःवर विश्वास नसला म्हणजेच थाप मारावी असं वाटतं. परमेश्वराच्या अस्तित्वावरचे माझे विचार तुला आवडले आहेत. मग जे आवडलंय, पटलंय ते स्पष्ट का करू नये ?"

त्यांचा प्रश्न खरा होता. आता सारवासारवी त्यांना आवडणार नाही. आपणही स्पष्ट बोलावं, असा विचार करीत मी म्हणाले,

" विद्यानंद, मला भीती वाटते."

" पुन्हा उपवास-पूजाअर्चा केल्यानं शांत वाटणार आहे का ?"

मी गप्प राहृयले.

" उद्यापासून सुरू कर."

" म्हणजे तुम्ही तुमचं मन मारणार ?"

" तू जर मला प्रिय असशील तर तुला आवडणाऱ्या गोष्टी मी सहन करायला हव्यात."

पूजा केली आणि शांत वाटलं. त्यांचा विश्वास नव्हता तरी वाटलं अर्धा नैवेद्य त्यांना द्यावा. मी वाटी घेऊन समोर गेले, तरी नैवेद्य घ्याल का ?— हा प्रश्न कसा विचारावा हा प्रश्न पडलाच. तेवढ्यात ते म्हणाले.

" नैवेद्य का ?—बहोत अच्छे ! आण."

उषा कधी घरी आली की वादविवादाला रंग चढायचा. तिचे उपासतापास

माझ्या चौपट. पूजाअर्चा, जपजाप्य, तीर्थयात्रा सगळ्याचाच सोस. ती घरी आली रे आली की विद्यानंद म्हणायचे--

" आज कुणीकडे ?"

" तुमच्याकडे."

" वैकुंठाहून विमान आलं की नाही अजून ?"

उषा तितक्याच तत्परतेनं विचारायची,

" तुमच्यासारख्या नास्तिकांना त्याची का एवढी काळजी ?"

" काळजी नाही, पण आमच्या एअरपोर्टला कळवून ठेवीन अगोदर. म्हणजे बाकीच्या फ्लाईट्स त्या दिवशी रद्द करायला बरं !"

" कशासाठी ?" उषा विचारायची.

" पुष्पकला लँडीग करणं सोपं जायला हवं."

एकदा असाच वाद रंगला. विद्यानंद म्हणाले,

" तुमचा देवच सगळ्या गोष्टी घडवतो ना ?"

" प्रश्नच नाही. बागेतलं फूल तुमच्या आज्ञेनं फुलत नाही." उषा तावातावानं म्हणाली.

" माझ्या बाबतीत अगदी तसंच घडलय. तुमच्या ललितच्या इच्छेपायी मला देवभक्त व्हावंसं नाही वाटणार."

" ते तुमचं दुर्दैव आहे, आमचं नाही." उषा ठामपणे म्हणाली.

" मी मजेत आहे."

" तुम्ही तसे सुटणार नाही. ह्या जन्मी नाही, पुढच्या जन्मी भोगाल."

" पुढचं पुढे ! ह्या जन्मी मी मजेत का ते सांगा."

" मागच्या जन्मीचं पुण्य."

उषाला आता नेमकं पकडायचं म्हणून विद्यानंद म्हणाले,

" पुढच्या जन्मात स्वभाव, वृत्ती बदलतात का ?"

" भरती-ओहटी असते ना ?"

" पण पाणी तेच ! गेल्या जन्मी मी जर पुण्य केलं असेन तर ह्या जन्मी असा नास्तिक का झालो ?"

" प्रारब्ध ! नलाला कली–बाधा नाही झाली का ?–तसंच तुमचं झालंय."

" असेल बुवा ! बरं, मी काय म्हणतो, माझं सोडा. तुम्ही इतकी वर्षं ही

साधना करीत आहात, त्याचं काय ? "

" माझी उद्धाराची वेळ त्यानं ठरवली आहे तेव्हाच येणार. मागच्या सात जन्मांचा हिशोब चुकवायचा असतो. ह्या मार्गाला जावंसं वाटणं, हीच प्रगतीची खूण आहे. "

" पण मग घरातली आजारपणं. तुमची ॲनिमिक कंडिशन... "

" अहो, देहानं जगायचं म्हणजे त्याचे दंड भोगूनच पार करावे लागतात. साधना करून हा देहदंड चुकवायचा प्रयत्न केला तर त्यासाठी मला पुनर्जन्म घ्यावा लागेल. जाऊ दे ! तुम्हाला ते कळायचं नाही. वेदसुद्धा ' नेति नेति ' म्हणत थकले, तिथं आम्हा पामराचं काय ? "

" अहो पण... "

" खेरसाहेब, जाऊ द्या. वापल्या वादविवादाला शेवट नाही. मला फक्त एकच सांगा, ललिताला माझ्याबरोबर शिर्डीला नेऊ का ? "

" ते तिनं ठरवावं. "

" तुमची हरकत ?"

" मुळीच नाही. "

" थँक्यू ! आज फक्त तेवढं विचारण्यासाठी आले होते. "

" कधी जाणार ? "

" माझा रामनामाचा एक लक्ष जप झाला की लगेच जाणार. "

" मी साईबाबांना ' वुईश ' केलंय म्हणून सांगा. "

" तुम्ही D.O. पाठवा. "

उषानं तोडीस तोड उत्तर दिलं.

" किती सोसते ही उषा ?" ती गेल्यावर मी म्हणाले.

" माझ्याइतकीच सुखी आहे पण एका बाबतीत. "

" कशी ? "

" देव नाही ह्यावर माझा ठाम विश्वास, तर तिचा तेवढाच देव आहे ह्यावर आहे. असं हवं. मधला माणूस कायम लटकलेला असतो. "

" म्हणजे तुम्ही माझ्याबद्दल बोलताय ? "

" तू असं नाही. (कोणत्याही दोन आग्रही भूमिकांच्या मधे लटकणाऱ्या

माणसांचं तू प्रतीक आहेस. अशा माणसांचे फार हाल होतात. कारण त्यांना दोन्ही भूमिका खऱ्या वाटतात."

" ह्यातून सुटायचं कसं ? "

" बुद्धीला प्रमाण वाटतील तेवढ्याच गोष्टी स्वीकारायच्या. "

विद्यानंदांना सांगायला काय जातं ? बुद्धीला आकलन न होणाऱ्या गोष्टी घडतात तेव्हा काय करायचं ?

शिर्डीला जायचं–जायचं म्हणताना मी शेवटच्या क्षणी बेत का बदलला ?– साईबाबांच्या दर्शनाला जाणाऱ्या उषाच्याच मोटारीला नेमका ॲक्सिडेंट का झाला ?

विचार करून करून मस्तक फुटायची वेळ आली. फुटलं का नाही ? हातापायांतली ताकदच गेली.

उषा–उषा–उषा...

एवढी तडकाफडकी का गेलीस ?

विद्यानंदांच्या बुद्धिवादावर जी उत्तरं नव्हती ती अखेरीस उषाचा विचारसरणीतच सापडली. मी जेवढी धाय मोकलून रडत होते, उद्ध्वस्त झाले होते. त्या मानानं उषाची आई शांत होती.

मी त्यांना धीर द्यायला गेले आणि स्वतःचं सांत्वन करून आले. त्या म्हणाल्या,

" पोर मुक्त झाली. ह्या जन्मीचं कार्य संपलं. पुण्यवान आहे. आमच्या अगोदर सुटली. "

" पण आई, शिर्डीला जाताना..."

" अग वेडाबाई, कान्होपात्रा नाही का गेली ?– हे असंच जाणं ठरलेलं होतं. "

आईनं माझ्या सगळ्या शंका फेडल्या तरी मनाचा आक्रोश थांबेना. घरी पूजा करायला उभी राहिले आणि डोळ्यांतलं पाणी खळेना. मी अकल्पितपणे वाचले याचा आनंदही उषाच्या जाण्यापुढे गौण ठरला. पूजेत मन लागेना. का करायची ?– हात यांत्रिकपणे हालचाल करीत होते.

नैवेद्य देण्यासाठी मी विद्यानंदांसमोर गेले आणि अश्रूंचा पूर आला. त्यांनी नेहमीसारखाच 'अरे वा, नैवेद्य का ? '– असं म्हणत त्याचा स्वीकार केला. आणि मग मला जवळ ओढली.

" ललित, मन शांत कर."

" कुठंही मन लागत नाही हो! पूजेतही."

" करू नकोस."

" पण असं का व्हावं ?"

" यात्रेला जाणारी अनेक माणसं अशीच गेलेली आहेत. होडी उलटल्याच्या बातम्या कमी का येतात ?– सांग, ही माणसं अशा चांगल्या कार्याला जात असताना का मरावीत ?"

" तेच कळत नाही."

" निरपराध माणसं दरवर्षी महापूर येऊन निर्वासित का व्हावीत ? एका पुढाऱ्याच्या गाढवपणापायी लाखो माणसं निर्वासित का व्हावीत ?– राजकारणाशी संबंध नसलेल्या पोटार्थी माणसांना, मूर्ख पुढाऱ्यापायी जिवंतपणी नरक का सोसावा लागतो ? केनेडींची हत्या का होते नाथ ? अकाली पैंका जातात ? स. गो. बर्वे का जातात ? दीनदयाळ उपाध्यायांचा खून होऊन पुढे प्रकरण दाबलं का जातं ? ह्यासारख्या असंख्य वाईट घटना घडतात. हजारो वर्षं हिंदूंची विटंबना होत आहे. स्वाऱ्या होत आहेत. ह्या सर्व प्रसंगी ' संभवामि युगे–युगे ' म्हणणारे श्रीकृष्ण कुठे आहेत ? तेव्हा असा विचार केलास तर तुझं दुःख संपणार नाही. देव असताना असं होऊ शकतं म्हटलं की मनस्ताप वाढतो. त्याच्या इच्छेनं हे चाललंय म्हटलं तर सारखे डाव उधळायला त्याला का आवडतं ह्याचंही उत्तर मिळत नाही."

" मग काय करू ?"

" काही करू नकोस. दुःख आपोआप कमी होईल. माणसाचा भरवसा नाही ह्यात वादच नाही. तेव्हा समोरच्या चालत्या-बोलत्या माणसाशी जितकं छान वागता येईल तितकं छान वागायचं. आपल्यामुळे दुसऱ्याचं आयुष्य दुःखी होत नाही एवढं माणूस नक्की सांभाळू शकतो."

त्या दिवशी मी केली ती पूजा शेवटची. मन लागत नाही तोपर्यंत पूजा बंद असं म्हणून मी देवांची उचलबांगडी केली.

पूजा करताना– उषाला ओढून नेणारा हाच–हा विचार येऊन द्यायचा नाही म्हटलं तरी यायचाच.

मग त्या पूजेत काय अर्थ होता ?

पुन्हा जेव्हा आई अशीच भेटायला आली तेव्हा देवपूजा, देवघर ह्याबाबत मी तिला कोणतीही थाप मारली नाही.

" उद्या आषाढी एकादशी. फराळाचं काय करू ?"
" इथं कोण लेकाचा उपास करणार ?"
" अहो पण उद्या आषाढी... "
" असेल. "
" उपास करणार नाही ?"
" नाही. "
" का ?"
" आता त्या बाबतीत काय वाटतं ऐकायचंय ?"
" सांगा. "
" पटत नाही म्हणून करत नाही. "
" काय पटत नाही ?"
" उपवासाला धन्यापासून होणारी कोथिंबीर चालते, धने चालत नाहीत. ह्यांचं स्पष्टीकरण करशील ?– तांबडा भोपळा चालतो, पांढरा चालत नाही. हा वर्णद्वेष कुणी पसरवला सांगशील ?"
मी अर्थातच गप्प बसले. त्यांचं सगळं पटायचं, पण माझे संस्कार जात नव्हते. कुठेतरी कायम टोचणी. जसं वागत आले. तसंच चालू ठेवावं तर बाजूची परिस्थिती इतकी बदललेली, त्यातही रस वाटायचा नाही. राजरोसपणे वाममार्गाने जाऊन माणसं गबर होताहेत, बायका फिरवताहेत, लाचलुचपत-वशिल्यांना ऊत आलाय. ह्या सर्व चित्राकडे डोळसपणे पाहायला लागलं की विद्यानंदांचा प्रत्येक शब्द पटायचा. ' कष्ट हाच नैवेद्य' हेच बरोबर वाटायचं. पण कुठंतरी ' एक मोठी शक्ती आहे ' याचाही आधार वाटायचा. विद्यानंदांनी तो आधार, सारख्या वैचारिक धडका देऊन खिळखिळा करून टाकला आणि त्यांनी त्याऐवजी समोर ठेवलेला आधार दिलासा देऊ शकला नाही, खरोखरच सोवळं सोडलं आणि ओवळं सापडत नाही—अशी अवस्था.
अशाच संभ्रमावस्थेत असताना ' पाहुण्या'ची चाहूल लागली. कोण असेल ? तो की ती ?

ती असेल तर उषाच पुनर्जन्म घेईल का ? मी एवढी भाग्यवान आहे का ? वाटेल ते विचार मनात यायचे.

संस्कार असा छळवाद मांडतात.

मला दिवस गेल्यानंतर मात्र विद्यानंदांनी माझे सगळे उपवास जबरदस्तीनं बंद केले. लग्न झाल्यावर त्यांनी माझं मन मोडलं नव्हतं, कोणत्याही पद्धतीनं जबरदस्ती केली नव्हती. पण दिवस गेले आणि मग त्यांनी आवाज चढवला. व्हिटॅमिन्स, प्रोटीन्स मिळावीत म्हणून फसवून नॉन–व्हेज पण खायला लावलं.

पत्ताच लागला नाही प्रथम प्रथम मग शंका आली, पण तोपर्यंत चटक लागली. मला प्रसन्न ठेवण्यासाठी ते आटापिटा करायला लागले. सांगेन ते ते ऐकायला लागले. सत्यनारायणाची पूजा करू या– असं आईनं सुचवल्यावर मात्र 'फक्त प्रसाद करा, तो ए वन् लागतो '– असं म्हणाले.

त्या नऊ महिन्यांच्या कालावधीत पिंड माझ्या पोटात होता, पण बाकी सगळी धावपळ त्यांची होती.

त्यांना ' आदर्श ' अपत्य हवं होतं. वैचारिक पातळी जाणणारं. डोळस, अंधश्रद्धेला डावलणारं, जाणवेल तेवढंच मानणारं असं मूल हवं होतं. त्यासाठी संस्कारांना प्रारंभ झाला होता. मुलगी– मुलगा ह्यात फरक नव्हता. संस्कार सारखेच होणार होते. महाभारत–रामायण ह्या धर्मग्रंथांना ते दीर्घकथा म्हणत. त्या दोन्ही कथा हे त्यांच्या हिशोबी केवळ ललित वाङ्मय होतं. पण अपवाद फक्त ' अभिमन्यूचा ' होता. गर्भावस्थेत संस्कार होऊ शकतात एवढाच फक्त कल्पनाविलास नव्हता.

मुलगा !

सगळ्यांनी श्वास सोडला.

मग रीतीप्रमाणे बारसं.

विद्यानंदांनी सुचविलेले नाव सर्वमान्य झालं.

भूपाल.

चिरंजीव खास त्यांच्या देखरेखीला वाढू लागले. मुलाच्या बाबतीत त्यांचा माझ्यावर विश्वासच नव्हता. रात्री–अपरात्री उठून बाटली आणि बाटलीचं

बूच ते त्यांच्या शास्त्रोक्त पद्धतीनं स्वतः धुणार. भूपाल साधारण केव्हा उठतो ह्याचं निरीक्षण करून ते पंधरा मिनिटं अगोदर उठून बाटली तयार ठेवणार.

अशी सेवा त्यांनी अखंड केली.

कामावर जाताना ते भूपालला सांगायचे, "मी हातात ही बॅग घेतली की कामावर जातो, हे समजायचं."

प्रथम भूपाल खूप खूप रडायचा. ते त्याला भरपूर रडून देत. मी म्हणायची;

"चुकवून का जात नाही त्यापेक्षा ?"

"तेच कधी करायचं नाही, फसवण्याचे हे अप्रत्यक्ष धडे मी त्याला देणार नाही."

आठ दिवस भूपाल रड–रड रडला.

आणि नंतर विद्यानंदांनी हातात बॅग घेतली की तो विचारायला लागला,

"तू हपी जातो ?"

"हो, तू रडणार का ?"

"मी गुदबॉय"–असं म्हणून तो आपण होऊन 'टाटा' करायला लागला.

मी विद्यानंदांना म्हणायची, "तुम्हाला हे नडेल."

आणि एकदा ते नडलंच.

कामावरून आल्यावर एका रिसेप्शनला जायचं होतं. विद्यानंदांनी भूपालला जवळ घेऊन सांगितलं.

"मी पानसुपारीला जातो. अर्ध्या तासात येतो."

भूपालने बोबड्या शब्दात विचारलं "हप्पी ? हप्पी ?'

"हप्पी नाही–पानसुपारी."

भूपालनं तारांगण सुरू केलं. विद्यानंदांना समोरून हलून दिलं नाही. शेवटी तासभर वेळ समजूत घालवण्यात गेला. विद्यानंदांनी मग मुकाट्यानं ऑफिस बॅग हातात घेतली. भूपालनं त्या क्षणी त्यांना 'टाटा' केलं.

त्याच रात्री मी म्हणाले,

"इच्छा असो–नसो, मुलांना फसवावं लागतंच."

"म्हणूनच फार जागरूक राहायला हवं आहे. तेही आपण दोघांनी" हे एक, आणि दुसरं म्हणजे तुझ्या–माझ्यात एकवाक्यता हवी. आईची आणि बापाची भाषा वेगवेगळी झाली की मुलांवर मानसिक ताण पडतो. मुलं बरोबर हेर-

तात. तेव्हा सगळं काटेकोरपणे ठरवायला हवं. "

" आखून काही उपयोग नाही आणि आखता यायचं नाही. "

" त्याला खरं काय ते सांगायचं ठरवलं की निराळं आखायची गरजच नाही."

" तुम्ही त्याला काय काय खरं सांगणार ? "

" ते वेळेवर अवलंबून आहे. "

आणि मग विद्यानंदांचे सत्याचे प्रयोग सुरू झाले आणि माझे हाल सुरू झाले. कितीतरी गोष्टी आपल्या अंगवळणी पडलेल्या असतात. संध्याकाळ झाली रे झाली की देवासमोर उदबत्ती, पूजा, प्रार्थना हे दृश्य घरी-दारी पाहण्याची सवय पडलेली. ह्यांच्या सहवासानं, विचारांनी देवाबद्दल मलाही आता पूर्वी-इतकी ओढ राहचलेली नव्हती. उपवासाचं आयुष्यातून कधीच उच्चाटन झालेल होतं. आजूबाजूला अन्याय, अनागोंदी कारभाराचं एवढं बोचरं दर्शन घडत होतं की खरोखरच देवाच्या अस्तित्वाविषयी शंका यायला लागली होती. ' कुणाशीही जाणून वाईट वागू नये आणि निर्भय राहावं ' हे विद्या-नंदाचे शब्द सारखे कानात घुमायचे. काही धार्मिक सणांचंही आता मला प्रयोजन समजेनासं झालं.

पण तरीही पटकन् एकदा मी म्हणाले,

" देवाला म्हणावं, मला चांगली बुद्धी दे. "

विद्यानंदांनी पटकन् माझ्याकडे पाहचलं. मी म्हणाले,

" अहो पण..."

त्यांनी मला थांबवून म्हटलं, " नंतर बोलू. "

भूपाल झोपल्यावर हे म्हणाले,

" त्याला देवाकडे काहीही मागायला शिकवू नकोस. "

" अंगवळणी पडलेले शब्द आले. "

" हे आडवळण आहे. " ते गंमतीने डोळे मिचकावीत म्हणाले.

मी पण हसले.

" अंगात मुरलेल्या सवयी, तोंडात बसलेले शब्द काढून टाकणं किती अवघड असतं नाही ?" मी विचारलं.

" म्हणूनच फार डोळसपणे एक जीव आपल्याला वाढवायचा आहे. आपला भूपाल सुदृढ आहे. त्याला देवाजवळ काही मागायला शिकवायचं नाही. स्वत:

कष्ट केल्याशिवाय काहीही मिळत नाही हे त्याला समजायला हवं. "
" ते त्याला आपोआप समजेल. "
" संस्कार ह्या वयापासून व्हायला हवेत आणि ते आपण दोघांनीं एकमुखानं करायला हवेत. तुझ्या माझ्यात वैचारिक विसंगती निर्माण झाली त्यात भूपाल त्याला सोयीची असलेली भूमिका घेईल. "
विद्यानंद आत्तापासून एवढ्या सूक्ष्म विचारांनी अस्वस्थ का होत आहेत हे मला कळत नव्हतं. पोरगं एवढंसं. इतका काय विचार करायचा ?
अर्थात ह्या असल्या प्रश्नात काही अर्थ नव्हता. ' विचार कर ' असं सांगितल्यानं माणूस विचार करीत नाही. त्याप्रमाणेच ' विचार करणं सोडून द्या ' म्हटल्यानं विचार करायचं कुणी सोडीत नाही.
विद्यानंदांचं आणि माझं इथंच जमत नव्हतं. त्यांनी थांबायला हवं होतं. आणि ते थांबणार नव्हते. मी त्या बाबतीत आता विरोधही करणं सोडून दिलेलं होतं.
पण तरी केव्हा असह्य व्हायचं. मुलाशी प्रतारणा करायची नाही हे ठीक, पण त्याला काही मर्यादा ?
कॉलनीतले अप्पासाहेब वारले. वय झालेलंच होतं. ' सुटले! '– असाच सगळ्यांचा शेरा. खाली अंत्ययात्रेचं सामान आलं. घरोघरीच्या मंडळींनी घरातल्या लहान लहान मुलांना कुठे ना कुठे पिटाळलं. हे आपले भूपालला घेऊन गॅलरीत उभे. बापलेकिची प्रश्नोत्तरं कानावर येत होती.
" डॅडी, आजोबांना काय झालं ?"
" ते वारले."
" वारले म्हणजे ?"
" मेले."
" म्हणजे काय ?"
" परवा झुरळाला तू काय केलंस ?"
" मारलं."
" मग काय झालं ?"
" ते उलटं पडलं. पाय हलवत नव्हतं. उठत नव्हतं."
" बरोबर. आता आजोबाही उठणार नाहीत, बोलणार नाहीत, काही नाही! "

" डॅडी, आजोबांना कुणी मारलं ?"

" आपोआप मेले."

" आपोआप ?"

" माणूस म्हातारा झाला म्हणजे मरतो."

" सगळे मरणार ?"

" हो !"

" तुम्हीसुद्धा मरणार ?"

" हो."

" आई पण ?"

" हो !"

" मीसुद्धा ?"

भूपालच्या ह्या प्रश्नावर ते जरा थांबले. आणि 'हो' म्हणाले, त्यानं लगेच विचारलं,

" केव्हा मरणार ?"

" म्हातारा झाल्यावर."

मला ते सगळं अशुभ वाटायला लागलं. मी त्याला आत हाक मारली.

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी अमृतमामा भेटायला आला. खूप वर्षांनी तो येत होता. म्हणजे भूपालला तर तो प्रथमच पाहत होता.

त्यानं भूपालला पाहताक्षणी दहा रुपये काढून हातावर ठेवले. भूपालनं नमस्कार केला. मला बरं वाटलं.

' नमस्कार करणं ' ह्यावरूनही झालेली चर्चा मला सारखी आठवत राहते. केव्हातरी मी म्हणाले होते.

" मुलानं कधीतरी हात जोडून शांत उभं राहावं असं वाटत राहतं, तेवढ्या-साठी तरी एखादं स्थान असावं."

' एकच ? अग अनेक आहेत.'

" तुम्ही आता काहीतरी वेगळं ऐकवणार. मला माहीत आहे सगळं."

माझा स्वर काहीसा त्रासिक झाला असावा. विद्यानंद पुढे काही बोललेच नाहीत. मलाच वाईट वाटलं. त्यांचा राग कसा काढायचा हे मला माहीत

होतं. 'मी चुकले' एवढे दोन शब्द त्यांना लगेच शांत करीत असत.

"काय सांगणार होता ?"

"सांगणार काहीच नव्हतो, विचारणार होतो."

"विचारा ना ¡"

"नमस्कार करायला लावण्यापूर्वी, त्यामागचं तुझं ऑब्जेक्टिव्ह सांग."

"एका वरच्या शक्तीची त्याला जाणीव असावी."

"जाणीव म्हणजे भीती ना ?"

मी गप्प बसले. कारण माझी भूमिका मलाच समजलेली नव्हती. त्यांनीच मग विचारलं,

"आपण त्याला कशालाही घाबरायला शिकवायचं नाही. कोणत्याही शक्तीला, कोणत्याही व्यक्तीला."

भीती वाटल्याशिवाय माणूस नम्र होणारच नाही."

"ललित, भीती केव्हा तरी नष्ट होते. त्यावेळी काय होईल ?"

"पण–"

"मी सांगतो ह्यात नक्की अर्थ आहे. (भीतीपायी माणूस लांब राहतो. अनुभवातून जाण्याचं तो नाकारतो. त्यापायी खऱ्या शक्तीची, व्यक्तीची ओळख होत नाही. भिणाऱ्या माणसाची वाढ होत नाही. भिणारा माणूस संशोधनही करत नाही.")

म्हणजे त्यानं वडीलधाऱ्या माणसांना कधीच नमस्कार करायचा नाही, असंच ना ?"

"नमस्कार जरूर करायचा, पण तो कृतज्ञ भावनेनं करायचा. मनाचा आणि आयुष्याचा आनंद वाढवणाऱ्या प्रत्येक गोष्टीशी त्यानं माणुसकीच्या दृष्टिकोनातून कृतज्ञ राहावं."

"हेच त्याला शिकवायचं कसं ?"

"ते माझ्यावर सोपव."

अमृतमामाला त्यानं नमस्कार केला. मला बरं वाटलं. नंतर तो शांतपण अमृतमामाकडे पाहत राहिला. विद्यानंद कामावरून आले होते. मी त्यांची ओळख करून दिली. त्या दोघांच्या गप्पा सुरू झाल्या. तोपर्यंत चिरंजीव

शांत उभे होते. तो शांत उभा होता पण तो शांत नव्हता. त्याच्या डोक्यात काहूर असावं.

मामानंच शेवटी लक्ष जाताच विचारलं.

"का रे बाळ, मघापासून तू असं नवलानं काय बघतोस ?"

मामांना उत्तर न देता भूपालनं ह्यांना विचारलं,

"डॅडी, मामा आता मरणार ना ?"

मामा विजेचा धक्का बसावा तसा बसल्या जागी उडाला. भूपालनं असा प्रश्न का विचारला ह्याचं ह्यांनी खूप समर्थन केलं. मामाचं समाधान त्या खुलाशानं झालं की नाही समजलं नाही. तो काही बोलला नाही, इतकंच.

हे सगळं समजण्यासारखं, विचार केल्यावर पटण्यासारखं होतं. पण भूपालनं जेव्हा "अप्पांना नंतर काय केलं ?"– हा प्रश्न विचारायला सुरवात केली, तेव्हा मी खरोखरच घाबरले. आता विद्यानंद कोणत्या टोकापर्यंत जातात तेच मला पाहायचं होतं.

"पहिल्या वेळी त्यांनी 'सांगेन केव्हातरी' म्हणून पुढे ढकललं. एक-दोन दिवसांनंतर भूपाल म्हणाला.

"डॅडी, अप्पांचं पुढे काय केलं ते मला समजलं."

"असं ? छान !"

"त्यांना देवळात नेऊन ठेवलं."

"असं ?"

"तिथून त्यांना देव स्वर्गात नेणार आहे."

हे काहीच बोलले नाहीत. भूपाल स्वस्थ बसणं अशक्य होतं. त्यानं विचारलं,

"डॅडी, त्यांना नंतर पापाचा आणि पुण्याचा हिशोब..."

"भूपाल तसं काही नसतं."

"अप्पा स्वर्गात नाही गेले ?"

"मी तुला सगळं सांगतो."

"त्यांना कुठे नेलं ?"

"झुरळ मेल्यावर नंतर तू काय केलंस ?"

भूपाल म्हणाला, "आलं लक्षात. अप्पांना पण कोपऱ्यात टाकलं असेल."

“ नाही.”

“ का ?”

“ झुरळ कोपऱ्यात टाकल्यावर नंतर काय झालं ?”

“ मुंग्या आल्या.”

“ तशा माणसांना आल्या तर चालतील का ?”

मी मध्येच म्हणाले,

“पुरे हो ! भूपाल तू मोठा हो, मग तुला सगळं समजेल.”

“ नाही आत्ताच सांगू दे. डॅडी सांगा.”

“ माणसांना मुंग्या आल्या तर नाही ना चालणार ?”

“ नाही.”

“ म्हणूनच माणसांना मेल्यावर जाळून टाकतात.”

भूपाल विद्यानंदांकडे पाहतच राहिला. पण काही क्षणच. त्यानं लगेच पुढचा प्रश्न विचारला,

“ कसं जाळतात ते दाखवाल ?”

“ दाखवीन.”

मी त्या भयानक प्रसंगातून दोघांना आवरू–थांबवू शकले नाही. भूपाल चार दिवस गप्प गप्प होता. त्याच्या एवढ्याशा मेंदूत काय काहूर माजलं असेल ह्याचा शोध घेता येत नव्हता. ह्याचं हसणं, बोलणं, खेळणं, सगळ्यावर एक कसली तरी सावली आहे असं वाटत होतं. एक-दोनदा माझ्याकडे तो पाहत असताना त्याची नजरही पूर्वीची राहिलेली नाही, असं मला वाटून गेलं. ‘आई काय ? एक दिवस मरणार !’– अशा काहीशा अर्थाची ती नजर होती.

“ अप्पांना देवळात नेऊन ठेवलंय.”– असं म्हटल तेव्हा तो आपल्या सवंगड्यांना म्हणाला, “ ते केव्हाच मेले, त्यांना जाळूनही टाकलंय्.”

केव्हा केव्हा मला वाटायचं, इतरांपेक्षा हा निराळा होणार. ह्याला सगळ्याची समज येईल. तीही लवकरच.

आणि तरी केव्हा केव्हा वाटायचं, हे का ?–कशासाठी ?– आयुष्याची ओळख त्याला आत्ताच व्हायला हवी का ?

जमिनीतून रोप वर न येता, एकदम फुलंफळं यावीत का ?–फळासाठी धड-

पडणाऱ्या माणसांना रोप नको असतं काय ? इतर अस्वस्थेमध्ये भ्रामकपणा असेल, अवखळपणा, हूडपणा, हेकटपणा, मूर्खपणा असेल. पण त्या त्या अवस्थेत ते सौंदर्य आहे. बोबडे बोल हा काय गुन्हा आहे ?– प्रवासातलं ते एक गोंडस वळण आहे. हे सगळं ह्या जिवाचं नष्ट व्हावं का ?

आणि अशा संस्कारात वाढलेल्या भूपालसमोर मीठ-मोहऱ्या घेऊन मी हात ओवाळायला लागले तर नंतर त्याला काय सांगू ? बेल वाजली म्हणून मी दार उघडलं.

माई आल्या होत्या.

मला दूर ढकलून त्या बडबडत आत गेल्या.

" तुम्ही हल्लीच्या मुली ! देवाला न मानणाऱ्या ! मीठ-मोहऱ्या उतरल्या तर जाळायला शेगडीही नसायची तुमच्या घरात. सोन्यासारखं पोर. करा त्याची आबाळ..."

असं म्हणत त्यांनी भूपालला उठवलं. बसता केला. त्याला हातातल्या मीठ मोहऱ्या हाखवल्या, आणि तोंडातल्या तोंडात पुटपुटत त्यांनी दोन्ही ओवाळायला प्रारंभ केला.

एकदा वाटलं त्यांना थांबवावं.

ह्या खुळचट गोष्टींनी ताप उतरत नाही म्हणून सांगावं. पण बोलले नाही. भूपाल बरा व्हायला हवा ' ह्या त्यांच्या सदिच्छेबद्दल शंका नव्हती.

मार्ग चुकीचा...नव्हे त्यांचा होता. तो वेगळा असणं स्वाभाविक होतं, आवश्यक होतं. आणि मला जरी ते शंभर टक्के पटत नव्हतं, तरी समोरच्या माणसांच्या भावना ह्याच देवापेक्षा मोठ्या...असा ललित्–विद्यानंदाच्या देवघराचा नियम नव्हता का ?

माई ओवाळीत होत्या.

देवाचं नाव घेत होत्या.

मी पाहत होते. शांतपणे. पटत नव्हते तरी.

☐

# मृदंग

मस्टर मिळालं,

जिवात जीव आला. सही ठोकता ठोकता निमकर मनाशी म्हणाला,

" आयुष्यातल्या असंख्य दिवसांपैकी एक दिवस संपला." का कुणास ठाऊक, सकाळी लेटमार्क न होता सही करायला मिळाली की आता आपण दिवसभर काहीही विपरीत न घडता नक्की जगणार असं निमकरला वाटायचं. हातात तांबडं बॉलपेन घेऊन बसलेला हेडक्लार्क त्याला यमासारखा वाटून त्याच्या दाढेखालून आपण एक दिवस सोडवून घेतला असं त्याला वाटायचं. सही करून निमकर आपल्या जागेवर आला. सकाळी घरातून साडेसात वाजता बाहेर पडल्यावर आऊटडोअर करून तो घरी गेला तेव्हा एक वाजला होता. बायको पुण्याला. तेव्हा घरची ओढ अशी नव्हती. एखादं पत्रं पडलंय का एवढंच पाहायचं आणि तडक ऑफिस गाठायचं.

वेळेचं बंधन तसं नव्हतं, पण तेही नियमापेक्षा ऑफिसरवर अवलंबून. नव्या खात्यात बदली होऊन अवघा महिनाच झालेला. महानगरपालिकेची हवा तशी नवीच नाही. पण पाणीखात्यात झालेली ही पहिलीच बदली. इथलं ' पाणी ' चाखायचं होतं. निमकर आपण होऊन पाणी चाखणार पण त्यापूर्वीच

हेडक्लार्कनं त्याला ते दाखवलं होतं.

" हेडक्लार्क आणि क्लार्क ह्यात फरक काय ?"–असा प्रश्न एका मुलाखतीत साहेबानं विचारला होता. त्यावर त्या उमेदवारानं, ' हेड असलेला क्लार्क ' असं उत्तर दिलं होतं. निमकरच्या मनात नेहमी यायचं, ' हेड ' च्या ठिकाणी ' हेल ' शब्दच चपखल बसतो.

निमकर जाग्यावर आला.

पोस्टमननं घरात टाकलेलं पत्र त्यानं पुन्हा एकदा खिशातून काढलं. पत्र सासऱ्याचं होतं. चारच ओळींचं ते पत्र.

प्रिय राजाभाऊ,

ह्यापूर्वीच्या पत्राप्रमाणे गुरुवार हाच दिवस सर्वांना सोयीचा आहे. शुभ आहे. तुम्हाला रजा मिळवणं कठीण जाणार आहे ह्याची कल्पना आहे. तरी प्रयत्न करावा.

आपला

बावासाहेब.

पत्र वाचून निमकरनं नुसताच सुस्कारा सोडला, आणि एकाएकी त्याच्या मनात एक विचार आला, की, प्रत्येक ठिकाणी चोख हिशोबी स्वभावानं वागणाऱ्या बावासाहेबांनी चार ओळींच्या मजकुरासाठी पाकीट कसं काय वापरलं ?

हा विचार मनात येताच निमकरनं ड्रॉवरमधे टाकलेलं पत्र पुन्हा बाहेर काढलं आणि त्या क्षणी त्याला उलगडा झाला. पाकिटात आणखी एक छोटासा कागद होता. वाजवीपेक्षा जास्त डिंक पाकिटाला लावला गेल्यानं त्यानं एका कागदाशी भलतीच सलगी केली होती. तो कागद आतच राहूयला होता. पाकिटाचा एक भाग झाला होता. पाकीट कापून निमकरनं आतलं पत्र सुटं केलं.

पत्र सुधाचं होतं.

माझ्या लाडक्या शाम,

मी ' यायलाच हवं ' असं म्हटलं की तुझी ओढाताण होणार ह्याची मला कल्पना आहे. म्हणून टाळत होते. पण पहिल्यावहिल्या बाळाच्या बारशाला तू नाहीस. मन लागायचं नाही. नोकरी प्रथम, तरी वाटतं तू हवास.

जमवशील का ?

तुझीच सुधा.

रजेचा विचारही करणं अशक्य होतं. निमकर विचारायलासुद्धा जाणार नव्हता. अनेक बाबतीत आजवर मन मारलं तसंच ते पुन्हा मारायचं.

आणि अशा काहीशा विचारात असतानाच समोर एक गृहस्थ येऊन उभा राहचला. निमकरांची विचारमाला आपोआपच तुटली.

" निमकर आपणच का ?"

" हो."

निमकराकडून होकार गेल्यावर परमेश्वर सापडल्याचा आनंद त्या माणसाच्या चेहऱ्यावर दिसला.

" काय काम आहे. बोला. कोणती सेवा– "

निमकरांचं वाक्य अर्धं तोंडीत तो गृहस्थ म्हणाला,

" पाच मिनिटं बसू का ?– थकलोय."

" अवश्य ! दहा मिनिटं बसा. पाचच कशाला ?"

पाच मिनिटं स्वस्थ बसण्याची परवानगी मागूनही तो गृहस्थ दुसऱ्याच मिनिटाला म्हणाला,

" अत्यंत तातडीचं काम आहे. कराल का ?"

" तातडीनं काम करण्यासाठी तर आहोत आम्ही. बोला."

" पाण्याचा नळ फुटलाय्. सकाळीच आलो होतो. कंप्लेंट ऑफिसर घाणेकरांना भेटलो. वॉर्ड ऑफिसरना पण भेटलो. दोघांनी थांबायला सांगितलं. तुमचं नाव दिलं. तेव्हापासून थांबलोय्."

एका दमात त्या गृहस्थानं सगळं सांगितलं. निमकर स्वस्थ बसून ऐकत होता. डोळ्यांसमोर तो अनोळखी माणूस आणि डोक्यात सुधाचं पत्र.

निमकरचं आपल्या बोलण्याकडे लक्ष नाही ह्याची त्या समोरच्या माणसाला लगेच कल्पना आली निमकरचा चेहरा एकदम निर्विकार होता. तो चेहरा पाहूनच दादरकरांना सकाळचा घरातला संवाद आठवला वडील म्हणाले होते, 'साहेबांना सगळी परिस्थिती सांग. घरात बारसं आहे, पाच-पंचवीस माणसं जेवायला यायची आहेत. पाण्याशिवाय कसं व्हायचं असा सरळ प्रश्न विचार. त्यांना पाझर फुटायला हवा, म्हणजे जिंकलास.'

शेजारचे गृहस्त म्हणाले, "म्युनिसिपालिटीतल्या आणि सरकारी नोकरांना पाझर फोडण्याचा एकच रामबाण उपाय आहे. अर्जाबरोबर एक शंभराची... सरकवून द्या."
त्यावर वडील म्हणाले,
"हाच उपाय असला तर एका शंभरानं भागेल का?"
"पाहा भागतं का! तुमची तक्रार ते इतक्या निर्विकार चेहऱ्यानं ऐकतात की वाटतं त्यांचं हियरींग एड् बंदच पडलंय."
निमकरचा चेहरा तसाच होता. सगळी परिस्थिती कानाआड घालायचीच असं ठरवून दादरकर म्हणाले, "निमकरसाहेब, नेहमीसारखी परिस्थिती असती तर एखादा दिवस आम्ही तसाच ढकलला असता. पण घरात उद्या फंक्शन आहे, पाण्याशिवाय भागवणं अशक्य आहे."
फंक्शन शब्द ऐकल्यावर निमकर जरासा हालला.
"कसलं फंक्शन?"
"बारसं आहे."
बारसं म्हटल्याबरोबर 'तिळा उघड' म्हटल्याप्रमाणेच झालं.
"कुणाचं?"
"बहिणीच्या मुलीचं."
सगळी मरगळ झटकून टाकून निमकर उठला.
"चला."
दादरकरांनी आपलं. पाकीट उघडलं शंभराची नोट जाग्यावर आहे ना ह्याची खात्री करून घेतली. निमकरनं आत्तापर्यंत तसं काही दर्शवलं नव्हतं. पण केव्हातरी नोट पुढे करावी लागेलच.
"पाहू आपण आजच्या आज काही जमतं का! माझ्याकडून मी सगळं करायचा प्रयत्न करीन. पण दुसऱ्या माणसाचा संबंध आला की काही करता येत नाही." निमकर जाता जाता म्हणाला.
दादरकरांना जाता येता सकाळचे संवाद आठवायला लागले.
"ही माणसं सरळ सरळ माझं काय बोला असं सांगत नाही. अगदीच जे तयार असतात ते बोलतात; पण ज्यांनी ह्या खाण्याच्या प्रांतात नुकताच प्रवेश केलाय् ती माणसं दुसऱ्याचा उल्लेख करतात."

दादरकर गडबडीनं म्हणाले,
" निमकरसाहेब, थोडीफार सोय मी भागवू शकतो, मग ती कुणाचीही असो."
पण ह्या वाक्याचा परिणाम भलताच झाला. निमकर चालता चालता मध्येच थांबला.
" तुम्ही काय बोलताय् ह्याचा अर्थ तुम्हाला समजतो का ? "
" तसं...म्हणजे...तसं... "
" त्या मार्गानं कामं करून घ्यायची असतील तर तुम्ही दुसऱ्या कोणत्याही माणसाला पकडा. "
" निमकर, रागवू नका. मी अडलेला माणूस आहे. काम व्हायला हवं म्हणून तोंडातून वाक्य गेलं. माफ करा. "
निमकर पुन्हा चालायला लागला. त्याचा राग खरा की खोटा ह्याचाही दादरकरांना अंदाज घेता येईना. 'पैसा खाणारा माणूस सर्वात जास्त सोवळेपणाचा आव आणतो. '—असंही विधान सकाळच्या गप्पात आलं होतं.
निमकरच्या पाठोपाठ दादरकर ऑफिसच्या बाहेर आले. इमारतीला वळसा घालून दोघं मागच्या बाजूला आले.
" तुम्हीं इथंच थांबा, मी आलोच. "
दादरकर उभे राहृयले. निमकर समोरच्या शेड्मध्ये गेला आणि दिसेनासा झाला.
पाच मिनिटं झाली. दहा...पंधरा... वीस.
दादरकर आता अस्वस्थ झाले. त्यांना काय करावं कळेना. प्रत्येक मिनिट त्यांची अस्वस्थता वाढवीत होतं. घरातून बाहेर पडून खूप वेळ झाला होता. अजून अनेक कामं व्हायची होती. काही महत्त्वाची आमंत्रणं उरकायची होती. बाजारहाट व्हायचा होता. सगळी जबाबदारी दादरकरांच्यावरच होती. मध्येच हे नळाचं सकट निर्माण होईल आणि आपला संपूर्ण दिवस त्यात जाईल ह्याची कल्पनाच नव्हती. इतर कामं कधी आणि कशी उरकायची ह्याचा विचार करीत दादरकर नुसते उभे होते.
आणखी दहा मिनिटं गेली आणि दादरकरांना वाटलं आपलं आज पाण्याचंही काम होत नाही आणि इतरही कामं होत नाही.
निमकरला शोधायचं ह्या विचारानं ते निघाले तेवढ्यात निमकर समोरून

येताना दिसला. दादरकरांच्या जवळ येत तो म्हणाला,
" तुम्ही पुढे व्हा, इतर काही कामं असतील ती करा. मी पाठोपाठ येतोच."
" निमकर, मी थांबायला तयार आहे."
" थांबून काय उपयोग पण ?"
" पाणी नसेल तर उद्या बारसं होऊ शकणार नाही."
" ते तुम्ही आता माझ्यावर सोपवा."
" तरी पण..."
" हे पाहा, मला जर तुमचं काम करायचं नसेल तर तुम्ही समोर उभे राहूच-लात तरी मी ते टाळू शकतो, आणि करायचं मनावर घेतलं तर तुमच्या अनुपस्थितीतही करू शकतो. तेव्हा..."
दादरकर न बोलता निघून गेले.

आमंत्रणं, भाजी, वाणी, किरकोळ खरेदी आणि सजावटीचं माफक साहित्य घेऊन दादरकर जेव्हा घरी रात्री नऊ वाजता पोहोचले तेव्हा निमकरनं दोन तासांत नळाचं काम संपवल्याची बातमी त्यांना समजली. एका पैची अपेक्षा न बाळगता कामं करणारी माणसं सरकारी कचेऱ्यांतून आहेत म्हटल्यावर दादरकरांचं मन भरून आलं.

सकाळी साडेसात वाजता निमकर कामावर आला तर समोर दादरकर उभे
" काय हुकूम आहे ?"
" विनंती करायला आलोय."
" बोला."
' दुपारी घरी जेवायला या."
" छे छे! भलतंच..."
" भलतंच वगैरे काही नाही. माझं आमंत्रण आहेच, शिवाय माझ्या वडिलांचा आग्रह आहे. तुम्ही त्यांचं मन दुखवू नका."
" अहो पण..."
" प्लीज, एवढी एकच रिक्वेस्ट ! आम्हाला आमचा आनंद व्यक्त करण्याची संधी द्या...तुम्ही नसतात तर आजचं फंक्शन होऊ शकलं नसतं."

" मी घरातलं कार्य समजून काम केलं."

" हो ना! मग घरातल्या माणसांनी केलेल्या आमंत्रणाला तुम्ही नाही म्हणाला असतात का ?"

" मान्य आहे. पण आता बघा, अशीच एक कंप्लेट बघायला जायचं आहे. पाण्याच्या सप्लाय अवर्समध्ये जायला हवं म्हणून जातोय. किती वाजतील सांगता येत नाही."

" कितीही वाजले तरी चालतील. मी आणि वडील जेवायचे थांबतो. तुम्ही या." दारदरांनी पेच टाकला.

निमकर हरला.

काम संपवून निमकर दादरकरांकडे गेला तेव्हा दादरकर वडिलांसहित जेवायचा थांबला होता.

जेवायला बसण्यापूर्वी निमकरांनी बाळ पाहायची इच्छा दर्शविली. पाळण्यातला तो एवढास्सा जीव पाहून त्याचं हृदय भरून आलं.

क्षणभर स्वतःच्या घरी गेल्यासारखं वाटलं.

मुठी चोखणारा तो एवढास्सा जीव डोळे न उघडलेले बाजूच्या विश्वाशी कर्तव्य नसलेला तो मुक्त जीव.

खरंच, आपणही बाप झालो आहोत. आपलं बाळ असंच असेल का ?

स्वतःच्याच अपत्याच्या बारशाला आपण आलो आहोत असं निमकरला वाटून गेलं. त्या चिमण्या हातात त्यानं दहाची नोट ठेवली.

जेवण जबरदस्त झालं. जोरदार आग्रह झाला.

निरोप घेऊन निमकर निघाला तेव्हा दादरकरांच्या वडिलांनी हातात एक डबी ठेवली.

इंगळी डसल्याप्रमाणे निमकर मागे सरकला.

" ह्या संकटात टाकू नका."

" माझं ऐका–नात्यातल्या सगळ्या जवळच्या माणसांना मी अशी भेट दिली आहे. तुम्ही घरातलेच ह्या भावनेनं देतोय्, घ्यावं लागल."

दादरकरांच्या वडिलांनी गळ घातली.

निमकर पुन्हा हरला.

ऑफिसात त्यानं प्रवेश केला तो प्रफुल्लित मनानं. दादरकरांच्या सोहळ्यात त्याला त्याचं घर भेटलं.

बाळसुद्धा !

भारावलेल्या मनानं भरून आलेल्या आवाजात निमकरनं खात्यातल्या सहकाऱ्यांना दादरकरांच्या मनाचा मोठेपणा वारंवार ऐकवला. बीसबावीस रुपयांचं चांदीचं, एका बाजूला श्रीगजानन मूर्ती आणि एका बाजूला असलेला 'श्री' कार, असं ते जड नाणं प्रत्येकानं हातात घेऊन पाहिलं.

दोन दिवसांनी साहेबांनी निमकरला बोलावलं.

साहेबाच्या खोलीत कुणी एक कॉर्पोरेटर बसला होता. निमकर आत जाताच कॉर्पोरेटर म्हणाला,

"आता ह्यांना विचारा सगळं."

साहेबांनी विचारलं,

"डायरी आहे का ?"

"आहे."

"परवा कुणाकडे गेला होतात ?"

"दादरकरांकडे."

"त्यांच्याकडे जेवलात का ?"

"होय."

"तुमचं त्यांचं नातं आहे ?"

"नाही."

"नुसती ओळख ?"

"होय."

"किती दिवसांची ?"

"एका दिवसाची."

"त्यांच्या नळाच्या कनेक्शनचं काम तुम्ही दोन तासांत केलं म्हणे ?"

"साहेब, फॉल्ट पटकन् मिळाला आणि गँग रिकामी सापडली म्हणून होऊ शकलं."

"म्हणून झालं की दादरकरांनी रौप्यपदक द्यायचं कबूल केलं म्हणून..."

" साहेब..."
" त्याशिवाय कुणी एवढी धावपळ करतं काय ?"
निमकर गप्प बसला.
साहेबांनी कार्पोरेटरला योग्य ती कारवाई करतो म्हणून आश्वासन दिलं.
निमकरची संध्याकाळी बदली झाली.
वॉर्ड बदलला, खातं तेच राहृयलं.
खातं तेच राहृयलं पण निमकर तोच राहृयलं नव्हता. तो आता बदलला होता.
म्हणूनच तासकर जेव्हा धापा टाकीत त्याचा शोध घेत आले तेव्हा त्यानं निर्विकारपणे विचारलं;
" तुमची बिल्डींग कोणत्या वॉर्डमधे येते ?"
" मला त्यातलं समजत नाही."
" म्हणजे जी साऊथ की जी नॉर्थ ?"
" ते सांगता येणार नाही."
" नवल आहे. स्वतःचा पत्ता तुम्हाला नीट माहीत नाही, मग आम्ही कामं कशी करायची ?"
" जी साऊथ असेल." तासकर अंदाजानं म्हणाले.
" ठीक आहे. उद्या या."
तासकर गेले.
निमकरनं त्यांचा अर्ज 'जी साऊथ'ला पाठवला.
'जी साऊथला' अर्ज पोहोचायला सहा दिवस लागले. तोपर्यंत तासकर खेपा घालून कंटाळले.
दहाव्या दिवशी त्यांचा अर्ज पुन्हा निमकरकडे आला. तासकरांची बिल्डींग नॉर्थमध्येच होती.
" उद्या या." निमकरांनी वायदा केला.
तासकर पुन्हा आले. निमकर निर्विकारपणे म्हणाला.
" आज गँग आली नाही. उद्या या."
पण दुसऱ्या दिवशी तुळशीपाईप रोडला मोठा पाईप फुटला.
त्यात तीन दिवस गेले.

पुन्हा तासकरांच्या खेपा सुरू झाल्या.

मग निमकर म्हणाला,

" पाऊण इंची पाईप संपले आहेत. स्टोअर्सकडून मागवले आहेत. आले की पहिलं काम तुमचंच करतो. "

त्यानंतर निमकरनं सरळ तीन दिवस ऑफिसला दांडी मारली.

ह्या ना त्या कारणानं निमकरनं तासकरला एकवीस दिवस झुकवलं.

मनात हेतू ठेवून काम झटपट करून दिलं असा आरोप होणं आता शक्यच नव्हतं.

बावीसाव्या दिवशी त्यानं एका तासात तासकरांचं काम करून दिलं.

त्याच दिवशी दुपारी साहेबांनी बोलावलं.

तिथं आणखी एक कार्पोरेटर बसला होता.

" निमकर, पाण्याचं कनेक्शन देण्यासाठी किती दिवस लागतात ?"

" साहेब, मटेरियल, पाईप, गँग, सगळं मिळालं तर एका दिवसात करता येईल. "

निमकरचं हे उत्तर ऐकताच, 'न' आणि 'ण' ह्यातला फरक न कळणारा तो कार्पोरेटर चढ्या आवाजात म्हणाला,

" आता तुम्हीच समजून बघा. तासकरांचं पाण्याचा णळ बसवायचं काम करायला, तुमचे हपीसर बावीस-बावीस दिवस लावत्यात. मणामंदी पैसं खान्याचाचा विचार आल्याबिगर कुणी घोळ घालतं का ? कार्पोरेशणमंदी हे मी बोललो तर तुमी कुटं जाल ?"

साहेबांनी त्या कार्पोरेटरला— जनतेच्या सेवका'ला शांत केलं आणि निमकरकडे पाहत ते म्हणाले,

" एन् वॉर्डमधे तुम्ही एका गृहस्थाला एका दिवसात नळ रिपेअर करून दिलात. का, तेही समजलं. तासकरांनी तसं काही कबूल केलं नाही म्हणून त्यांना तुम्ही रडवलंत्. I want your explanation. "

निमकर बाहेर आला.

संध्याकाळी त्याच्या हातात बदलीचा हुकूम पडला.

☐

# हनीमून

समोरच बसलेल्या त्या माणसाची सीमाला भीती वाटत होती. त्याच्या डोक्यावरचे पांढरे राठ केस पाहूनच तिला काहीतरी वाटायला लागलं होतं. लोखंडी तारेला पीळ देऊन, मधे केस अडकवून, बाटल्या धुवायचा जो ब्रश बनवतात, त्या कामासाठी त्याचे ते पांढरे, राठ, तारेसारखेच दिसणारे केस वापरत असतील असं तिला गाडीत बसल्यापासून वाटत होतं. शेजारीच अगदी चिकटून बसलेल्या विनयला तिला हे कधीच सांगायचं होतं. पण गर्दीनं भरलेल्या ह्या गाडीत, इतक्या लोकांच्या देखत, नवऱ्याशी कसं बोलायचं ?

त्यांना काय वाटेल ?

अजून स्वभाव समजलेला नाही.

लग्न होऊन किती बरं तास झाले ?– छे ! काहीच आठवत नाही. समोर हा राक्षस बसल्यानंतर, चांगल्या चांगल्या गोष्टी आठवतील तरी कशा ? सीमा मूळची भित्रीच. रस्त्यावरून जाणाऱ्या प्रत्येक वाहनानं आपल्यावरच नेम धरलाय् असं तिला चालताना वाटतं. आगीचा बंब जाताना पाहिला तर तो आपल्याच घराकडे जात नाही ना, ह्या विचारानं ती बेचैन होते.

युद्ध सुरू झालं तर तिची झोपच उडाली होती. सकाळी गावं सोडून पाकिस्तानी प्रथम अकोल्याला येणार. आपली गल्ली आणि आपलंच घर नेमकं हेरून, ते मार्जिनासारख्या फुल्या मारणार. अरेबियन नाइट्समधली मार्जिना दारावर फुली मारत होती म्हणून ते कळत तरी होतं. पाकिस्तानी विमानातून हल्ला करणार, तेव्हा फुली छपरावर मारलेली असणार.

एकूण सीमा ही अशी!

साहजिकच समोरच बसलेला माणूस, बोगदा आल्यानंतर अंधारात, नक्कीच हे नवं मंगळसूत्र खेचणार आणि नाहीसा होणार, हाच विचार ती करीत होती, आणि पदर वारंवार गळ्याभोवती लपेटून, मंगळसूत्र लपवायचा प्रयत्न करीत होती.

राठ केसांबरोबरच घारे डोळे, रुंद जिवणी आणि लिंबं मावतील अशा मिशा.

मिशा हा प्रकार तर फारच भयानक.

घरातल्या सगळ्या मंडळींनी विनयला जेव्हा पास केला तेव्हा तिनं मोठ्या भावाला एकच प्रश्न विचारला, "त्याला मिशा नाहीत ना ?"

दादाकंपनीकडून कधी सरळ उत्तर आलंय ? तो म्हणाला, "मिशा म्हणजे काय एखाद्या अवयव आहे ? अग त्या असल्या तरी कापता येतात."

विनयला प्रत्यक्ष पाहचलं तेव्हा सीमाला हायसं वाटलं.

मिशा नव्हत्या, आणि तो कधी ठेवणारही नव्हता.

तरीसुद्धा, माथेयानला पोहोचल्यावर, आज रात्री तो जेव्हा मिठीत घेईल तेव्हा त्याचं नाव घ्यायचं.

सरळ हाक मारायची, "नय..."

त्याला हे नाव नवीन वाटेल. त्याचं मूळचं लहानसं नाव आणखी लहान करता येतं हे त्यालाही माहीत नसेल.

तो म्हणेल, "बोल राणी."

मग सांगायचं, "मिशा कधी ठेवायच्या नाहीत."

तो म्हणेल, "टोचतात ना...?"

"तिच्यायला ! गाडीला 'फ्लू' झाला की काय ?"

सीमा भानावर आली.

गाडी केव्हाची थांबली होती. अगोदर गर्दी. माणसावर माणसं रचलेली. त्यात उकाडा. डब्यातले पंखे बंद. आणि गाडी मधेच उभी राहचलेली.

माणसं चिडली.

पण काय उपयोग ?

चिडून चिडून जातील कुठे ? परस्वाधीनांनी फक्त पिळून घ्यायचं. वाकून जगायचं. असह्य होईल तेव्हा उद्धार करायचा.

सीमाला पाहचल्याबरोबर विनयला प्रथम काही आवडलं असेल तर तिच्या डोळ्यांतला भित्रा भाव. त्या भित्र्या नजरेनं तिच्या सगळ्या सौंदर्यावरच एक तऱ्हेचा भाबडा रंग खुलवला होता. नॉर्मली सगळ्या सुंदर पोरींच्या चेहऱ्यावर एक सूक्ष्म फणकारा सुप्तपणे वावरत असतो. त्याचा लवलेशही इथं नव्हता. ह्या भित्र्या मुलीला हळूहळू खुलवण्यात जी आगळी लज्जत येईल तिची सर पृथ्वीतलावरच्या कोणत्या तरी सौख्याला येणार आहे काय ?

ती पहिलीवहिली रात्र आता काही तासांवर आणि काही मैलांवर आलेली आहे.

सहज आपण अकोल्याला जातो काय, ही पोरगी निसटती दिसते काय आणि आपल्या पहिल्याच हाकेला अनुकूल प्रतिसाद येतो काय ?

सगळीच परीकथा.

सीमा भेटल्यापासून, अक्षता पडेपर्यंत सगळी परीकथाच. लग्न कसं करायचं, कुठे करायचं, नंतर कुठे जायचं याबद्दल हजार बेत झाले. मित्रांनी छळून छळून हैराण केलं आणि एवढं करून लग्न झालं कुठे ? तर साताऱ्यात नागपूरचा मुलगा, अकोल्याची मुलगी आणि लग्न साताऱ्यात. केवळ आजोबांचा हट्ट म्हणून.

त्यात रजेचे वांधे.

मग प्रश्न निघाला हनीमूनचा. बँकेतल्या एका गुजराथी मित्रानं तोही प्रश्न सोडवला. माथेरानच्या एका बड्या हॉटेलात त्याचे वडील मॅनेजरच असल्यामुळे कोणताच प्रॉब्लेम उरला नव्हता. तिथं फक्त पोहोचायचं. बाकी तयारी जय्यत होती. आज एस. टी. नं काही गोंधळ केला नसता तर एव्हाना आपण

माथेरानच्या गाडीत असतो. कदाचित पोहोचलो असतो. ह्या परीच्या डोळ्यातली भीतीची बाहुली आपण ओठांनी काढून घेतली असती.

" तिच्यायला ! गाडीला फ्लू झाला की काय ?"

विनय भानावर आला. त्यानं सीमाकडे पाहृचलं. ती भ्यायलेली होती. समोरच्या आडदांड माणसाकडे पाहत होती. पुन्हा पुन्हा घाबरत होती. विनय तिच्या कानात पुटपुटला, " माणसासारखा माणूस, त्याला काय भ्यायचंय् ?"

" त्याचे डोळे बघा ना, कसे बाहेर आलेत. लाल आहेत प्यायल्यासारखे."

" एवढंच ना, मग तिकडे पाहू नकोस."

" गर्दी किती आहे, पाहृचलीत ?"

" गर्दीची पण भीती वाटते ?"

" भीती नाही, गुदमरल्यासारखं वाटत. पाणी पण नाही प्यायला."

" एवढंच ना ? ते मी आणतो."

" कुठून ?"

" दोन डबे सोडून पलीकडे रेस्टॉरंट कार आहे."

" जाल कसे ?"

" गाडी थांबलीय ना."

" सुटली म्हणजे ?"

" तू बघच."

" नको."

" भिऊ नको ग."

म. ग्रं. सं. ठाणे,

" तुम्ही गेलात की तो समोरचा माणूस..."

" एवढ्या माणसांत तो तुला काय करणार आहे ?"

सीमाची भीती जशी वाढायला लागली तशी विनयला तिच्यासाठी काहीतरी करून दाखवायची सुरसुरी आली.

" आता आलो " असं म्हणत तो उठला. त्यानं पिशवीतून ग्लास काढला आणि गर्दी कापीत, माणसांच्या शिव्या खात तो दरवाजापर्यंत पोहोचला. माणसं दारापर्यंत ठेचून भरलेली असल्यामुळे दरवाजा आत उघडणंही अशक्य

होतं. दरवाजाला चिकटून बसलेली माणसं त्याला दाराकडे फिरकून देईनात. मग तो इरेलाच पेटला.

त्यानं सरळ खिडकीतून बाहेर उडी मारली. सीमाचा जीव इकडे अर्धमेला झाला.

आता आपलं आयुष्य संपलंच. विनय आता परत येणार नाही. गाडी सुटेल. तो गाडीमागे वेड्यासारखा धावत सुटेल. त्याचा काय उपयोग होणार ? आणि समोरचा माणूस तर पाळत ठेवून आहेच.

काय होणार ?

काय होणार ?

" घे ग! " विनयची हाक आली. खिडकीजवळच्या माणसानं त्याच्या हातातला ग्लास घेतला.

" तुम्ही आधी गाडीत या." सीमा अधीर होत म्हणाली.

" आलोच." विनय म्हणाला.

बाहेरूनच माणूस येतोय् म्हटल्यावर दरवाज्याजवळची माणसं नाइलाजानं उठली.

विनय जाग्यावर येईतो, हातात ग्लास घेऊन, पाणी न पिता सीमा उभीच होती.

विनय जाग्यावर बसल्यावर तिनं ग्लास तोंडाला लावला. तिचं पाणी पिऊन झालं.

तहान भागल्याचं एक सात्त्विक समाधान आणि विनयबद्दलची कृतज्ञता सीमाच्या नजरेत तरळून गेली.

तिचं पाणी पिऊन झाल्यावर विनयनं तिला विचारलं,

" मघाशी माझं पैशाचं पाकीट मी तुला दिलं का ग ?"

" नाही."

" पाहा जरा."

" खरंच दिलं नाहीत."

" दिलं असं मलाही वाटत नाही, तरी बघ."

सीमानं तिच्याजवळच्या छोट्या पिशवीत हात घातला. त्यात पाकीट नव्हतं.

" आहे ?"

' नाही ना. "

" खाली सूटकेसमध्ये पाहा. "

राठ केसांचा, बटबटीत डोळ्यांचा आणि तानाजी, शेलारमामाच्या घराण्याशी इमान ठेवणाऱ्या मिशा असलेला तो माणूस त्या दोघांकडे बारकाईनं पाहत होता. गाडीनं पुणे सोडल्यापासून त्याचं त्या तरुण जोडप्याकडे लक्ष होत. तरुण कसलं ?– कोवळंच म्हणायला हवं.

दोघंही इतकी बालिश, भाबडी होती की असं वाटत होतं, दोघांच्या खांद्यावरच्या शाळेच्या पिशव्या नुकत्याच वडीलधाऱ्या माणसांनी काढून घेतल्या ाहेत आणि त्यांना सांगितलं आहे की, " जा, संध्याकाळचं घरात बसायचं नाही–जा, जरा फिरून या."

ती पोरगी तर आपल्याला टरकून आहे हे त्या माणसाला कधीच कळून चुकलं होतं. त्या पोरात पण काही दम नव्हता.

ती पोरंच होती. अक्षता पडल्या म्हणून तो गृहस्थ झालाय्.

सभोवतालच्या गर्दीला ती दोघं बुजलेली आहेत ह्यात वादच नाही. ती दाखवते, म्हणजे तिला ते लपवताच येत नाही. त्याला ते लपवायलाच हवं. त्या दोघात तोच कर्ता आहे. तेव्हा तेवढा तोल त्याला सांभाळायलाच हवा. दोघांच्या चेहऱ्यावरून ती पुण्या-मुंबईची नाहीत हे तर तात्काळ कळत होतं. त्यानं सांगितलं म्हणून ती पाकीट शोधतेय. पण त्यात काही अर्थ नाही. त्यानं तिच्याकडे पाकीट दिलेलंच नाही.

पिशव्या उलटया करून झाल्या. बॅगा पालथ्या करून झाल्या. पाकिटाचा पत्ता नव्हता.

आता डब्यातल्या इतर माणसांचं त्या हालचालीकडे लक्ष गेलं आणि मग शंका-कुशंकांची फेर झडली.

" तुम्ही घरून निघताना बरोबर घेतलं होतं ना?"– ह्यासारख्या मूर्ख प्रश्नांना उत्तरं देऊन विनय-सीमा कंटाळून गेली.

" तुम्ही मधाशी खिडकीतून उडी मारलीत ना, तिथं पाकीट पडलेलं असणार."

" ह्या शंकेसरशी विनय उठून उभा राहयला. अर्धा-पाऊण तास उभी असलेली गाडी अचानक सुरू झाली. सीमानं विनयचा हात धरून खाली

बसवल.
" आता काही उपयोग नाही."
विनय हतबुद्ध होऊन बसला.
" तिकिटं पण गेली काय ?"– सहप्रवाशांनी विचारलं.
" तिकिटं आहेत. वरच्या खिशात ठेवली होती."
" मग काही चिंता नाही. मुंबईला गेल्यावर टॅक्सी करायची. टॅक्सीवाल्याला पैसे घरी गेल्यावरच द्यायचे असतात."
" कुठे उतरणार ? दादर की व्ही. टी. ?"
" आम्हाला माथेरानला जायचं आहे." विनय म्हणाला.
" म्हणजे कर्जतला उतरणार ?"
" नेरळला."
" अरे, कमाल आहे. नेरळला कुणाकडे राहणार का ?"
" नाही, तिथं कुणीच नाही. आमचं. दुसरी गाडी पकडून तसेच माथेरानला जाणार."
" असे कसे जाल ?"
" का ?"
" कनेक्टिंग ट्रेन आहेच कुठे ?"

सीमा चक्क रडायला लागली. विनयला काय करावं कळेना. बायको रडायला लागली तर समजूत कशी घालतात हेही माहीत नाही. तो नुसताच ' ए, ए, खुळाबाई, ए, ए ' करीत राहयला.
" तुम्हाला पुण्याहून निघताना कुणी बोललं नाही ?"
" नाही." नव्यानं सुरू झालेल्या प्रश्नमालेतलं पहिलं उत्तर विनयनं दिलं.
" लग्न केव्हा झालं ?"
" परवा."
" मूळ गाव कोणतं ?"
" मी नागपूरचा. ही अकोल्याची."
" लग्न कुठं झालं ?"
" सातारला."

"असं कसं ?"
"आजोबांचा हट्ट म्हणून सातारला यावं लागलं. ते तिथं आजारी आहेत."
प्रश्न संपले तसं विनयचं लक्ष पुन्हा सीमाकडे गेलं. ती रडतच होती. पुन्हा तिचे हुंदके आणि विनयचं 'ए, ए' सुरू झालं.
मग प्रवाशांनी उपदेशाचे सर्गच्या सर्ग ऐकवले. विनय–सीमा ह्यांच्या आई-वडिलांचाही माफक निषेध झाला. विनय–सीमा थकून गेली. मग उपदेशकही पर्याय संपले म्हणून थांबले.
आणि मग एवढा वेळ बसलेला तो, मालुसऱ्यांच्या घराण्यातला प्रचंड पुरुष, गर्जना करीत विनयला म्हणाला, "सगळ्यांचं संपलेलं दिसतंय्. आता मी सांगतो तसं करा."
सीमा–विनयनी त्या माणसाकडे पाहुचलं आणि मग एकमेकांकडे पाहुचलं. त्याबरोबर तो माणूस करड्या आणि हुकमी आवाजात म्हणाला, 'एकमेकांची तोंडं पाहून तुमचा प्रश्न सुटणार नाही. मी सांगतो तसं करा. तुमच्याकडे पैसे आहेत ?"
विनयनं मानेनं नकार दिला.
"तिकिटं कुठली आहेत ?"
"नेरळची."
"ठीक आहे, अजून टी. सी. आलेला नाही. तो आला म्हणजे काय ते सांगतो."
विनय गप्प बसला. सीमा त्याच्या कानात पुटपुटली,
"त्याचं ऐकू नका हं, मला भीती वाटते."

तिकिट चेकर आल्याबरोबर विनयनं तिकिटं काढून दिली. त्याबरोबर समोरच्या माणसानं दहा रुपयांची नोट चेकरसमोर धरीत सांगितलं, मुंबई-पर्यंत ही तिकिटं वाढवून द्या."
सीमानं त्याच वेळी विनयला कोपरानं ढोसलं. विनय म्हणाला,
"हे बघ, आपल्या खिशात दमडा नाही. इतरांनी नुसते कोरडे उपदेश केले. पैसे पुढे करणारी माणसं कमी असतात. कमी म्हणजे एखादाच असतो."
"त्याच्या मनात काही तरी असेल." सीमा भीत भीत म्हणाली.
विनय म्हणाला, "बरोबर आहे. तो गृहस्थ आपल्याला मुंबईला नेणार. तिथून

वज्रेश्वरीच्या जंगलात. मला गुंगीचं औषध देणार आणि तुला पळवणार."
"अहो, असं काही तरी नका ना बोलू..."
सीमा कल्पनेनं थरथरायला लागली. ती पुन्हा रडेल आणि आपल्याला समजूतही घालता येणार नाही, ह्या विचारानं विनय गप्प बसला.
तोच पुन्हा तो करडा आवाज त्यांच्या कानावर पडला.
"तुमची तिकिटं मी आता माझ्याजवळच ठेवतो, म्हणजे हरवायला नकोत. समजे ?"
विनयनं मान हलवली. सीमा पुटपुटली, "आता पुरती वाट लागली."
तेवढ्यात तो गृहस्थ उठला आणि चालायला लागला. वाटेत बसलेली माणसं त्या माणसाला पाहून न बोलता बाजूला व्हायला लागली. ह्याच माणसांनी मघाशी पाणी आणायला गेलेल्या विनयकडे 'काय शिची कटकट आहे' अशा नजरेनं पाहयलं होतं.
तो दूर गेल्याबरोबर सीमाला हायसं वाटलं. आता काही काळ का होईना, त्याचं दर्शन टळलं, नजरकैद चुकली.
तरी तिनं विनयला विचारलंच, "तो तिकिटं घेऊन जायचा नाही ना ?"
विनय हसला.
लोणावळा आलं, पण तो माणूस आला नाही. तेव्हा विनयही घाबरला. खिशात पैसा नाही आणि आता तिकिटंही नाहीत. खरंच आपलं काय होणार ? इतर प्रवासी काही ना काही खायला–चघळायला घेत होते, आणि विनय–सीमाला पाहत राहण्यापलीकडे गत्यंतर नव्हतं.
गाडी हलली आणि समोरून तो येताना दिसला. त्याच्या पाठोपाठ हॉटेलचा पोऱ्या होता. तो गाडीतला वेटर होता की लोणावळा स्टेशनवरचा होता हे कळायला मार्ग नव्हता. त्या वेटरला त्या माणसानं खूण करताच हातातला ट्रे त्यानं विनय–सीमा समोर ठेवला.
"कशाला त्रास..."
"घर सोडून किती तास झाले ?"
"सहा तास."
"मग ह्या वयात, नॉर्मल प्रकृती असलेल्या, माणसाला सहा-सहा तासांनी भूक लागायला हरकत नाही. घ्या. तुम्ही दोघं आता माझ्या ताब्यात आहात,

" कळलं ?"

" ताब्यात म्हणजे ?"–गाडीतल्या गर्दीचा आधार वाटून विनयनं धीर केला.

" माझे पाहुणे आहात." मिशीला पीळ देत तो म्हणाला.

आपल्याबरोबर त्यानंही खाल्लं म्हणजे आपल्याला धोका नाही असा विचार करीत, सीमानं एक पॅटीस त्याच्यापुढं केलं.

" मी बाहेरचं काही खात नाही. प्रवासात तर नाहीच नाही."

सीमाचा तो प्रयत्न फसला.

विनयनं खायला प्रारंभ करताच मग मात्र तिनं विचार करणं सोडून दिलं. जे काही व्हायचं असेल ते दोघांचं एकदम होईल.

बोरीबंदर येईतो तो माणूस विनय सीमाशी एक अक्षर बोलला नाही. न बोलणाऱ्या किंवा कमी बोलणाऱ्या माणसाची एक प्रकारची भीतीच वाटते. त्याच्या मनात जरी सद्भाव असला तरी दहशत वाटते. तसंच इथं आलं होतं. तो अबोल तर होताच, शिवाय घाबरावं असा होता.

स्टेशन, ती गर्दी, स्पीकरवरच्या घोषणा, रंगीबेरंगी माणसं, वाहणारी समृद्धी, न्यूऑनमधल्या जाहिराती...सगळी मयसभाच होती. तो झपाझपा चालत होता.

मुंबईचे हे प्रथम दर्शन. पण मनापासून आश्चर्य व्यक्त करायलाही सवड नव्हती. तो चालत होता आणि आता फक्त त्याच्या गतीत स्वतःचा वेग लावायचा होता.

त्यानं टॅक्सी केली.

टॅक्सीवाल्याला त्यानं जो पत्ता सांगितला तो विनय–सीमाला समजलाच नाही. टॅक्सीवाल्यानं पटकन् मान हलवली तेव्हा सीमाला वाटलं, " हा त्याला सामील असेल का ?"

तेवढ्यात तो राक्षस म्हणाला, " आता सांगतो तसं करायचं. माझ्या घरी चला. एक रात्र मुक्काम करा. मी तुम्हाला पुढच्या प्रवासासाठी पैसे देतो. मग माथेरान, महाबळेश्वर, काय करायचं ते करा."

" ठीक आहे. तुम्ही सांगाल तसं करतो. तुमचे आमच्यावर..."

" That 's alright."

तो जवळ जवळ ओरडला.

विनय गप्प बसला.

"आपण त्याच्या घरी जायचं ?"–सीमा कानात पुटपुटली.

"जाऊ या. त्याची मुलं, बायको घरी असेलच की !"

एका महाकाय इमारतीसमोर टॅक्सी उभी राहिली. तो उतरल्यावर ती दोघं उतरली.

लिफ्टमध्ये शिरल्यावर त्या माणसानं आठव्या मजल्याचं बटण दाबलं.

आठव्या मजल्यावर आल्यानंतर त्यानं खिशातून किल्ल्या काढल्या.

सीमानं विनयकडे पाहिलं.

"घरात कुणी नाही ?"–विनयनं सीमाची नजर ओळखून त्याला प्रश्न केला.

"मी आहे ना ?" त्यानं उलट विचारलं.

दार उघडल्यावर त्यानं पहिल्यांदा त्या दोघांना आत चालण्याची खूण केली. ती घुटमळली तेव्हा तो म्हणाला, "Guests first."

दोघं आत येताच, मागच्या मागे दार लावीत तो म्हणाला, "That 's fine." मग मात्र पुढाकार घेत तो पुढे झाला. डाव्या हाताचा दरवाजा उघडीत तो म्हणाला, "ही तुमची खोली."

दोघं आत आली आणि दरवाजा आपोआप बंद झाला.

ती बेडरूम होती

डबल बेडवर एक सहा इंच डनलॉपची गादी होती. वर रंगीत जाहिरातीत छापतात त्या डिझाइनची बॉम्बे डाइंगची चादर होती. दोन डनलॉपच्याच उशा सेवेला हजर होत्या.

चारही भितींना वॉलपेपर लावलेले होते. पलंगाच्या बाजूला साईड टेबल्स, त्यावर मंद प्रकाशझोत टाकणारे, पडल्या-पडल्या बंद करता येण्यासारखे, रॉ सिल्कच्या शेडचे दिवे होते. एका भितीला भलामोठा आरसा होता. त्यावर नर्तकीप्रमाणे कमरेत लचकलेला एक दिवा होता. टेपरेकॉर्डर, त्याचे दोन स्पीकर्स, खोलीच्या दोन कोपऱ्यात रखवालदारासारखे उभे आणि एक भित संपूर्ण वॉर्डरोब्सनी व्यापलेली.

दोघांचा शिणवठा एका क्षणात नाहीसा झाला.

सातारा–पुणे प्रवास, बंद पडलेली एस्. टी.

मग गाडीतली गर्दी, हरवलेलं पाकीट, इतकंच नव्हे. तर ती उग्र नजरही.

ठरलेल्या वेळेपेक्षा दोन तास उशीरा संपलेला प्रवास, सगळं सगळं ह्या क्षणी खोटं वाटायला लागलं.

एकच भावना दोघांना व्यापून उरली, भुकेचाही विसर पडला.

एकच भावना. ती दोघं होती आणि खोलीत कुणी नव्हतं.

विजयनं तिचा हात हातात घेतला. दोघं आरशासमोर आली. विनयनं आरशावरचा दिवा लावला आणि सीमा पटकन् म्हणाली, "काय अवतार झालाय् माझा !"

"असू दे."

"मी आत्ता तोंड धुऊन येते. अय्या पण..."

"काय झालं ?"

"बाथरूम कुठे असेल ?"

"ते दार उघडून पाहू, ह्या बड्या लोकांच्या घरी बेडरूमला लागूनच बाथरूम असते म्हणे !"

विनयचा तर्क खरा ठरला. सीमापेक्षा आपल्याला काकणभर जास्त माहिती आहे याचा त्याला आनंद वाटला. त्यानं दार उघडलं.

बाथरुम कसली ? चक्क आरसेमहाल होता तो! पाण्याचा नळ इतका चक-चकीत असू शकतो हेच केवढं नवल होतं.

कल्हई दिली असेल का ?

सीमाबरोबर विनयही आत गेला. चकचकीत टाइल्स छताप्रमाणे लावलेल्या. त्यावरचं रंगीत डिझाईन तर प्रिंटेड वायलसारखं वाटत होतं.

आकाशी रंगाचं बॉश बेसीन. त्याला दोन्ही बाजूला नळ. इथंही एका भिंतीला मोठा आरसा. एक मोठा टब.

सीमा विलक्षण लाजली. तिनं टब तर पाहचलाच नव्हता.

"ह्यात कपडे धुतात का हो ?"

"नाही. ह्यात आंघोळ करतात. इथं झोपायचं आणि शॉवर सोडायचा."

सीमाला काही विलक्षण संवेदना झाल्या.

"बाथरूम एवढी मोठी ?"

"दोघांसाठी असली तर ?"

सीमानं हाताच्या ओंजळीत चेहरा लपवला. विनय बाहेर आला.

" दिवा बंद करा ना."

" नाही, राहू दे तसाच."

" मला लाज वाटते."

" म्हणून जास्तच छान दिसतेस."

" खरंच नको ना..."

आणि तेवढ्यात दार वाजलं.

दोघांना आत्ता जाणीव झाली. इतका वेळ सगळ्यांचं विस्मरण झालं होतं. ती भेदरून पाहत राहचली.

तोपर्यंत पुन्हा दार वाजलं.

विनयनं दार उघडलं.

" सॉरी तुम्हाला त्रास दिला."– असं म्हणत तो आत घुसला.

" त्रास काही नाही, आपलंच तर घर आहे."

ह्यावर उत्तर न देता त्यानं तिथलं कपाट उघडलं. आतून कॅमेरा काढला. त्या पाठोपाठ एक फ्लॅशगन काढली.

नंतर जी एक वस्तू काढली ती पाहून दोघं घाबरली. ती वस्तू म्हणजे एका काडतुसांचा पट्टा होता. तो त्यानं बेदरकारपणे पलंगावर भिरकावला. त्या पट्ट्याकडे दोघं पाहत असतानाच त्यानं ड्रॉवर उघडला. त्यातून एक रिव्हॉल्व्हर काढलं. एका खटक्यासरशी ते उघडलं. मग पट्टा हातात घेतला. त्यातून भराभरा गोळ्या काढल्या. रिव्हॉल्व्हरमधे काडतुसं भरली. बेदरकारपणे खट्कन् आवाज करीन ते बंद केलं आणि विनय–सीमाकडे पाहत तो म्हणाला; " तुम्हाला त्रास झाला, excuse me आता शांत झोपा. जीप मागवली आहे, तोपर्यंत विश्रांती घ्या."

तो बाहेर पडल्यावर दार आपोआप बंद झालं आणि बाहेरून कडी लावल्याचा आवाज दोघांनी स्पष्टपणे ऐकला.

अंगाचा थरकाप होत सीमा म्हणाली, " बघा, त्यानं बाहेरून दार लावलं."

आता विनयही घाबरला. इतका वेळ त्यानं सीमासाठीच तोल संभाळला होता. आता खरा प्रश्न होता.

डबडबलेल्या डोळ्यांनी सीमानं विचारलं.

" तो काय करील ? '

" कसं सांगणार ?"

" त्याचं नाव पण माहीत नाही."

" दारावर पाटीसुद्धा नव्हती. "

" कसं सुटायचं ? "

–विनय गप्प राहचला. कोपऱ्यातल्या फोनकडे लक्ष जाताच सीमा म्हणाली,

" फोन करू या ? "

" कुणाला पण ? "

–सीमा पुढे झाली. काय होतंय् पाहू या तरी, असा विचार करीत तिनं फोन उचलला आणि तोच कानावर शब्द आले, " काय हवंय ?"

सगळं बळ एकवटून सीमानं विचारलं, " तुम्ही बाहेरून कडी लावलीत ? "

" होय."

" कशासाठी ? "

" सर्जेराव प्रश्न विचारतो. प्रश्नांची उत्तरं देत नाही. "

" होय, पण... "

" योग्य वेळ येताच कडी काढली जाईल. "

फोन खाली ठेवला गेला.

सीमा विनयजवळ आली आणि तेवढ्यात ब्लॉकची बेल वाजली. दार उघडलं गेलं. त्याबरोबर सीमा–विनय दरवाज्याला कान देऊन उभी राहचली. तिघा–चौघांच्या बुटांचे आवाज कानावर आले.

" साहेब केव्हा आलात ? "

" पंधरा मिनिटापूर्वी. साली, भिकारचोट गाडी नेमकी लेट आली. "

सर्जेरावाचा आवाज विनय–सीमानं ओळखला.

" आम्ही थांबलो. मग बोरीबंदरला गेलो. गाडी नुकतीच आली हे समजलं. पुन: इकड आलो '–कुणीतरी म्हणालं.

" That 's fine "

" साहेब, काम झालं ? "

" शंभर टक्के. "

" आता काय करायचं सांगा. "

" प्रथम गुलाबरावाला फोन करू या. "
त्यानंतर शांतता पसरली आणि लगेच सीमा–विनयला त्यांच्या खोलीतला फोन वाजल्याचा आवाज एकू येऊ लागला.
विनय पटकन् म्हणाला, 'सीमा, आपल्याला त्यांचं संभाषण ऐकायला येईल. गप्प उभी राहा. "
विनयनं फोन उचलला आणि त्याला सगळं ऐकू येऊ लागलं.
" हॅलो... "
" हॅलो... "
" सर्जेरावसाहेब... "
" speaking "
" मी गुलाबराव. "
" बोला. "
मधेच सीमानं विनयच्या हातून फोन काढून घेतला आणि पुढचा संवाद ती एकू लागली.
" गुलाबराव, दोघं सापडली आहेत. "
" साहेब तुम्ही कमालच केलीत. "
सर्जेरावला आत्तापर्यंत अपयश माहीत नाही. "
" साहेब, तुमचे कष्ट तसे... "
" It's alright "
" पुढे काय साहेब ? "
" त्यांना धरून ठेवलंय. "
" साहेब दगाफटका. "
" Impossible ! बाहेरून कडी आहे. त्यांना पळता येणं अशक्य आहे. "
" बरं आता मी काय करू ? "
" मला तासातासानं फोन करायचा. "
" साहेब, तुमचा फोन जरा त्रास देतोय. "
" दुसरा फोन आहे, त्यावर करा. कारण ह्या फोनला बेडरूममध्ये..."
" मला माहीत आहे. "
" तिथं ऐकू जाणं ठीक नाही. "

" साहेब, आजची रात्र..."

" Don't worry. रतन्याला रिव्हॉल्व्हर देऊन जिन्यातच बसवणार आहे."

" मी येऊ ?"

" नको. फोन करीत राहा. "

" Yes boss ! "

हा संवाद सीमा–विनयनं आलटून पालटून ऐकला. दोघं अवाक् झाली. पांढरीफटक् पडली.

कुजबुजत सीमा म्हणाली, " काय करायचं ?"

" जे होईल ते आता फक्त बघायचं. आपण एकत्र आहोत तोच केवढा आधार आहे. खरं ना ?"

सीमाच्या डोळ्यांत पाणी आलं. तेवढ्यात बाहेर बोलणं सुरू झालं.

दोघं दाराकडे धावली.

" रतन्या, वेळ पडली तर बेलाशक गोळ्या झाडायच्या. "

" आणि बाबू, हा कॅमेरा. समोरच्याच इमारतीत जायचं. खिडकीसमोर गच्ची येते. तिथून जमतील तेवढे फोटो काढायचे."

" साहेब... "

" टेलिस्कोपिक लेन्स आहेच. फ्लॅश वापरलास तर शंका येईल. त्यांच्या खोलीत जेवढा लाईट असेल, तेवढ्यावर जो रिझल्ट मिळेल तो मिळेल. फिल्म वाया गेली तर गेली. ओ. के ?"

" Yes boss! "

पुन्हा बुटांचे आवाज आले. दार लावलं गेलं. पाय न वाजवता मग विनय खिडकीपाशी आला. पाहतो तो समोर गच्ची.

" सीमा, गच्ची समोरच आहे. दिवा बंद कर. "

" नको, मला भीती वाटते. "

" आपण पलंगावरची चादर, ब्लँकेट्स, पांघरूणं खिडकीवर टाकू या. "

" चालेल. "

दोघांनी भराभरा तसं केलं.

" आता काय ?"

" आपण झोपायचं नाही. रात्रभर जागे राहू या."
" पलंगावर पण बसू या नको."
" मग कुठे ?"
सीमानं दरवाजाकडे बोट केलं.
पलंगावरच्या उशा त्या दोघांनी दरवाजाजवळ ठेवल्या. हातात हात घालून दोघंजण रेल्वेत किंवा एस्. टी. त ताठ बसावं तशी बसून राहचले.
सर्जेराव जर आत्ता बेडरूमधे येऊ शकला असता तर त्याला एक केविलवाणं दृश्य दिसलं असतं.
एक तरुण जोडपं, नव्या नवलाईची पहिली रात्र, तो उत्कट स्पर्श, हुरहूर, अनामिक भीती, डनलॉपचा डबल-बेड, वैभव, हे सगळं सगळं विसरून जिवाच्या भीतीनं, दरवाज्याशी पेंगत पेंगत, एकमेकांना सावरत बसलेलं आहे.
साडेसहाच्या सुमारास दार वाजलं. दोघं खडबडून उठली. रात्र संपल्याची जाणीव किती सुखद होती हे त्यांना जाणवलं. आपण अजून तरी जिवंत आहोत. आता काय ?
दार वाजतच होतं.
दोघं भराभरा उठली. खिडकीवर टाकलेल्या चादरी त्यानी ओढून घेतल्या. उशा जाग्यावर ठेवल्या आणि नुकतीच जाग आली असा चेहरा करीत दार उघडलं.
नाईट गाऊनमधे, प्रसन्न हसत, सर्जेरावानं विचारलं, झोप लागली होती का?
" हो."
" चला, लवकर आटपा. ब्रेकफास्टला चला. तुमची गाडी आहे."
जामानिमा करून दोघं टेबलापाशी आली तेव्हा बिस्किटं, चीज, सॅण्डविचेस्, वेफर्स, टोस्ट आणि दोन किटल्या-टीकोझीसकट, ह्या जामानिम्यासकट टेबल सज्ज होतं.
" बसा, मोकळेपणी खा, कालपासून तुम्ही दोघं उपाशी आहात."
दोघांना काय बोलावं, काही कळेना.
" बसा, बसा, संकोच करायला वेळ अपुरा आहे, मलाही कामं आहेत."
" तुम्हाला फार त्रास..."

" त्याबद्दल तुमच्या वडिलांशीच मी बोलणार आहे."

दोघांनी चमकून पाहचलं तेव्हा तो गडगडाट करीत हसला. आपल्या देखत त्यांना मोकळेपणी खाता येणार नाही ह्याची कल्पना येऊन तो उठला आणि जाता जाता म्हणाला, "हे सगळं संपवल्याशिवाय उठायचं नाही."

मग मात्र दोघांनी मनसोक्त खाल्लं.

भूक, जागरण, भय ह्या सगळ्याचा पगडा होताच. आता उजाडलं होतं. प्रकाशाचा माणसाला किती आधार वाटतो हे त्यांना नव्यानं जाणवलं.

खाणं संपल्यावर सीमा टेबल आवरायला लागली तेव्हा समोर येत तो म्हणाला, " हे सगळं करायला गडी आहेत, तुम्ही इकडे या."

बैठकीच्या खोलीत ती आली. कोचावर बसली.

सर्जेरावानं शंभराच्या तीन नोटा विनयसमोर केल्या.

" हे ठेवा. प्रवासात लागतात. चार पैसे जास्त असावेत. नागपूरला जाल तेव्हा सावकाश परत पाठवा."

विनय-सीमानं खाली वाकून नमस्कार केला.

" रात्रभर तुम्हाला त्रास झाला असणार."

" छे ! तसं काही नाही." विनय म्हणाला.

तिकडे दुर्लक्ष करीत सर्जेराव म्हणाला, " ऑफिसच्या भानगडी मी बाहेरच्या बाहेर निपटतो. पण कालची गोष्ट निराळी होती. आमची मंडळी सगळी बाहेरगावी गेली आहेत."

" आपण काय करता ? " सीमानं विचारलं.

" सध्या क्राईम ब्रँचला आहे. मिसाची कामं आहेत. एका खास कामासाठी काल पुण्याला गेलो होतो. एका जोडीला पकडायचं होतं, त्यांना पकडलं. राहचलेलं काम काल रातोरात इथं उरकायचं होतं, म्हणून तातडीनं आलो. गाडीत तुम्ही भेटलात. तुम्हाला आपलं इथं. घरात कुणी नाही असं भासवायचं म्हणून काल तुम्हालाही कोंडून ठेवावं लागलं. घाबरलात का ? "

विनय खांदे उडवीत म्हणाला, " छे, त्यात घाबरायचं काय ? "

सर्जेराव हसला. मग तिघंही हसले.

वेळच्या वेळी जीप आली.

पुनः वाकून नमस्कार करताना विनय-सीमाच्या डोळ्यांत पाणी आलं. सर्जेराव म्हणाला, " पैसे सावकाश पाठवा, सुखरूप पोचल्याचं पत्र मात्र तातडीनं यायला हवं. "

जीप हलली.

विनय-सीमा हसली. श्वास भरभरून मोकळेपणो.

हसता हसता पुन्हा त्यांचे डोळे भरून आले. मग पुन्हा ती हसायला लागली.

" का हसलीस ? "

" तुम्ही का हसलात ? "

" तू सांग. "

" तुम्ही सांगा. "

जरा वेळ थांबून, तिच्या कानात विनय म्हणाला, " वाटलं की..."

" काय ? "

" कालची ती बेडरूम, एकच, आजची, म्हणजे एकदाच, म्हणजे एकच रात्र..."

" पुन्हा मिळायला हवी, असंच ना ? "

IRBK 0120599

IRBK-0120599

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. ...२०५८८ नों. दि ...........
वि. ......नाटक...... क्र. ...२५९१८८......